# भारतातील
# शैक्षणिक पुनर्रचना

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १३८५

झाकिर हुसैन

REFBK-0011509

नॅशनल बुक ट्रस्ट पुस्तक

राष्ट्रीय ग्रन्थ निधीचें पुस्तक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 33000 दि:
क्रमांक नों. दि.

# भारतांतील शैक्षणिक पुनर्रचना

(पटेल स्मारक व्याख्यान माला, १९५८)

लेखक
डॉ० झकीर हुसेन

११५०९

अनुवादिका
सौ० कमलाबाई गद्रे

REFBK-0011509

प्रकाशन विभाग
माहिती व नभोवाणी मंत्रालय
भारत सरकार

भाद्र, १८८३ (Bhadra, 1883)
सिप्टेंबर, १९६१ (September, 1961)

*By kind permission of*
*the author and All India Radio, New Delhi*

किमत : ०.७५
Price : 0.75

EDUCATIONAL RECONSTRUCTION IN INDIA
*(Marathi)*

प्रकाशक : डायरेक्टर, पब्लिकेशन्स डिव्हिजन, दिल्ली–६.
मुद्रक : एलबियन प्रेस, काश्मीरी गेट, दिल्ली–६

# पटेल स्मारक व्याख्यानमाला

भारताला स्वतंत्र करून त्या स्वातंत्र्याची मजबूत पायावर उभारणी करण्यांत सरदार वल्लभभाई पटेल यांचा फार मोठा हात होता; आणि स्वतंत्र भारताच्या माहिती व नभोवाणी खात्याचे ते पहिले मंत्री होते. त्यांची स्मृति जागृत ठेवण्याकरतां भारतीय नभोवाणीनें १९५५ सालापासून एक व्याख्यान-माला सुरू केली आहे. ही व्याख्यानमाला दरवर्षी गुंफिली जाते आणि तिच्या-द्वारें एखाद्या विशिष्ट विषयावरील ज्ञानांत भर टाकण्याचा आणि प्रचलित समस्यांचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक वर्षी ज्ञानाच्या अगर सामाजिक कार्याच्या एखाद्या विशिष्ट क्षेत्रांतील अभ्यासू व विचारवंत अशा नामांकित विद्वानाला भारतीय नभोवाणीच्या द्वारें आपल्या अभ्यासाचें व अनुभवाचें सार जनतेला सुलभ शब्दांत समजावून सांगण्याकरतां निमंत्रण दिलें जातें.

या व्याख्यानमालेंतील पहिलें पुष्प १९५५ सालीं श्री. चक्रवर्ती राज-गोपालाचारी यांनी गुंफिलें. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'कार्यक्षम अधिकारी' असा होता. दुसरें पुष्प १९५६ सालीं डॉ. के. एस्. कृष्णन्, एफ्. आर्. एस्. यांनी गुंफिलें. त्यांचा विषय 'विज्ञानाचें नवीन युग' असा होता. 'जीवनांतील साम्य व वैचित्र्य' या विषयावरील तिसरें पुष्प १९५७ सालीं प्रो. जे. बी. एस्. हाल्डेन, एफ्. आर्. एस्., यांनी गुंफिलें.

१९५८ सालीं या मालेंतील चौथें पुष्प गुंफण्याकरतां भारतीय नभो-वाणीनें नामवंत शिक्षणतज्ज्ञ डॉ. झकीर हुसेन यांना निमंत्रण दिलें. १९३७ सालीं वर्धा येथे भरलेल्या प्रथम राष्ट्रीय शिक्षण परिषदेने नियुक्त केलेल्या शैक्षणिक समितीचे ते अध्यक्ष होते. आणि याच नात्याने त्यांनी महात्मा गांधींच्या बुनियादी शिक्षण योजनेला साकार रूप दिलें. ते दिल्ली येथील 'जमिया मिलिया'चे व अलिगढ विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु होते. राज्यसभा, वृत्तपत्र-आयोग आणि विश्वविद्यालय अनुदान आयोग यांचे ते सदस्य होते. सन १९५७ सालापासून डॉ. झकीर हुसेन बिहारचे राज्यपाल आहेत.

डिसेंबर १२, १३ व १४, १९५८ रोजीं विज्ञान भवन, नवी दिल्ली, येथें दिलेली आणि नंतर भारतीय नभोवाणी द्वारें प्रसारित केलेली सरदार वल्लभभाई पटेल व्याख्यान माला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९२४०९
मराठी ग्रंथ ... वि: ...
अनुक्रम ३३५७७ ... नों: दि: ...
क्रमांक ९३८५ ...

[ १ ]

भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्याने पटेल स्मारक व्याख्यान मालेतर्फे तीन पुष्पें गुंफण्यास मला आमंत्रण दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे. माझ्या व्यावसायिक जीवनांतील बरींचशीं वर्षें दिल्लींतच व्यतीत झालीं असल्यामुळे दिल्लीस येण्याकरिता मला फारसा आग्रह करण्याची गरज पडत नाही. उलटपक्षीं येथें आल्यानें मला स्वगृहीं आल्याचा आनंद होतो. आजच्या प्रसंगीं सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतीस श्रद्धांजलि अर्पण करण्याची संधि लाभत असल्यामुळें तर मला विशेषच आनंद होत आहे. सरदार पटेल यांच्याशी माझा घनिष्ट परिचय होता व त्यांच्याविषयी माझ्या मनांत पराकाष्ठेचा आदर आहे. ते भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामांतील एक शूर व धाडसी योद्धे होते. त्यांनी एकसूत्री राज्यकारभाराच्या भक्कम पायावर भारताच्या भव्य भवितव्याची उभारणी केली. साडेपांचशे पेक्षाहि अधिक देशी संस्थानांना भारतांत विलीन करून देशाच्या विस्कळित राज्यकारभारांत सुसूत्रता आणण्याचें श्रेय केवळ सरदार पटेल यांच्या कणखर मुत्सद्दीपणालाच द्यावें लागेल. हा थोर मुत्सद्दी आपलें अंगीकृत कार्य पार पाडीत असताना त्यांच्या ठायीं वसणारे अनेक गुण प्रकर्षानें प्रकट झाले. त्यांची दूरदृष्टि नेहमी अचूक ठरत असे; त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता; तपशीलांत शिरण्याची त्यांची वृत्ति तर कित्येकांना भेडसावून टाकीत असे; हातीं घेतलेल्या कोणत्याहि कामावरील त्यांची पकड पोलादासारखी बळकट होती; व्यक्तीची आणि व्यवहारांची परीक्षा ते फार चतुराईने करीत असत; आणि उच्च आदर्शासंबंधी वाटणारी कळकळ त्या आदर्शाप्रत नेणाऱ्या साधनां-मध्यें ओतण्याची त्यांची हातोटी अलौकिक होती. या आणि असल्याच गुणां-मुळे त्यांना अंगीकृत कार्यांत भरीव यश आलें व आपल्या राष्ट्रनिर्मात्यांच्या तारांगणांत त्यांना अढळपद प्राप्त झालें आहे. त्यांच्या स्मृतीस आपण आपली आदरयुक्त व कृतज्ञतापूर्ण श्रद्धांजलि अर्पण करूं या.

तथापि सरदार पटेल यांचा गौरव करीत असतांना आपण एक गोष्ट विसरतां कामा नये. राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला पूर्णविराम माहीत नाही.

हें कार्य अखंड चालू असतें; विकसित व वृद्धिंगत होत असतें. त्याच्या ढोबळ आराखड्यांत अंगोपांगांची आंखणी सतत करावी लागते. राष्ट्रजीवनांतील असंख्य अवयवांना सदैव समतोल राखावें लागतें, कारण हे सर्व अवयव परस्परावलंबी व परस्परपूरक असतात. केवळ राज्यकारभाराचें एकीकरण केल्याने राष्ट्रीय जीवनांत एकात्मता निर्माण होत नाही. राष्ट्राच्या एकीकरणाचे प्रयत्न अविरत केले पाहिजेत. कारण आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षाचा जो आराखडा आपण स्वीकारला आहे त्यांत या प्रयत्नांना फार महत्त्व आहे. आपण भारतांत धर्मनिरपेक्ष लोकशाही निर्माण करण्याचें ठरविलें आहे. त्याच–प्रमाणे आपणांस येथे समाजवादी पद्धतीची रचना करावयाची असल्यामुळें येथील लोकशाहीला समाजवादाचें वळण लावावयाचें आहे. अशा लोकशाहींत शिक्षणाला, यथार्थ शिक्षणाला, जिवंत शरीरांतील श्वासोच्छ्वासाइतकें महत्त्व आहे.

मी नुसतें शब्दांचें अवडंबर करीत आहे असें कोणाला वाटेल; परंतु थोडासा विचार केला तर वरील विधानांत अतिशयोक्तीचा लवलेश नाही हें लक्षांत येईल. लोकशाही समाजवादाशी निगडित नसलेल्या समाजांची गोष्ट निराळी आहे. केवळ वरिष्ठ वर्गांच्या शिक्षणाची व्यवस्था केल्याने त्यांचें काम पूर्वी भागूं शकलें, आणि यापुढेही भागूं शकेल; मग बहुजन समाजाने आपली सोय जशी जमेल तशी करून घ्यावी. लोकशाही आणि समाजवाद यांचें सोयरसुतक नसलेल्या समाजांत शिक्षणाची व्यवस्था आणखी एका पद्धतीने केली जात असे व केली जाऊं शकते. समाजांतील निरनिराळ्या वर्गांच्या व दर्जांच्या लोकांकरिता वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षणाची सोय केली जात असे व केली जाऊं शकते. राजे-रजवाडे, सरदार-दरकदार, उद्योगश्रेष्ठी, व्यापारी अथवा इतर भद्र लोकांच्या शिक्षणाचीं उद्दिष्टें जवळ जवळ ठरलेलींच असत; आणि कित्येकदा हीं विविध उद्दिष्टें समान धार्मिक श्रद्धेवर आधारलेलीं असत; शैक्षणिक उद्दिष्टांच्या विविधतेंत धार्मिक श्रद्धेची एकता आढळून येत असे. परन्तु धर्मनिरपेक्ष समाजांत एका विशिष्ट धर्माच्या पायावर शिक्षणाची उभारणी करणें शक्य नाही. आपल्या सर्वसंग्राहक समाजांत अनेक जमातींचे, अनेक पंथांचे, अनेक पेशांचे लोक समाविष्ट आहेत आणि त्यांच्यांत धार्मिक ऐक्य नाही, तेव्हां पुरातन शैक्षणिक उद्दिष्टें उराशी बाळगून या सर्व प्रकारच्या लोकांना एकाच ठशाचें शिक्षण देणें अगदीं अशक्य होईल. लोकशाही समाजांत

असला प्रयत्न करणें सुद्धा मूर्खपणाचें आहे. कारण कोटयवधि स्वभावप्रवृत्त्यांची जोपासना व वाढ करून त्याद्वारें स्वयंप्रज्ञ व स्वयंशासित स्वभावाच्या वैचित्र्यपूर्ण व्यक्ति निर्माण करण्याचें कार्य येथील शिक्षणाला करावयाचें आहे.

वरवर पाहतां ही परिस्थिति अत्यंत कठीण वाटेल. परंतु माझ्या मतें शिक्षणशास्त्राला मिळालेली ही एक सुवर्णसंधि आहे. आजपर्यंतचें शिक्षण साचेबंद झालें होतें; आजपर्यंतच्या शिक्षणाचीं उद्दिष्टें आणि पाठ्यक्रम आगाऊ ठरलेले असत. आता लोकशाही युगांतील शिक्षणतज्ज्ञाला या जुनाट व चुकीच्या कल्पना गुंडाळून ठेवण्याची संधि प्राप्त झाली आहे. शिक्षण म्हणजे कुंभारासारखीं मडकीं तयार करणें अथवा एकाच सांच्यांतून सर्व मनें ओढून काढणें नव्हे; तर प्रत्येक मनाचें अगदी वेगळें व विशिष्ट व्यक्तिमत्त्व मान्य करून त्याला सहज व स्वतंत्र विकास करण्यास मदत करणें हें शिक्षणाचें खरें कार्य आहे याची जाणीव आजच्या परिस्थितींत शिक्षणतज्ज्ञांना होऊं शकते. धर्मनिरपेक्ष समाजवादी लोकशाहींत शिक्षणाची पुनर्रचना करण्याकरिता नवीन शिक्षणविषयक तत्त्वें व विचार प्रस्थापित करण्याची संधि व आव्हान आजची परिस्थिति आजच्या शिक्षणतज्ज्ञांना देत आहे. भारतीय शिक्षणाला ज्या तत्त्वांचें व ज्यां विचारांचें अधिष्ठान असेल त्यांचेवर आपल्या राष्ट्राचें भवितव्य पुष्कळ अंशीं अवलंबून राहील. शिक्षणाद्वारें लोकशाही जीवनाची वाढ व सुधारणा झाली, व्यक्तित्वाच्या विकासाला पूर्ण वाव मिळाला, सुविकसित व्यक्ति समाजहितरत बनल्या, सकल जनांना अंतरात्म्याची ओळख पटली आणि स्वार्थत्यागांतील गूढ आनंद त्यांना उपभोगतां येऊं लागला तर आपल्या राष्ट्राचें भवितव्य उज्ज्वल झाल्याशिवाय राहणार नाहीं.

हें शिक्षणाचें अपरिमित महत्त्व आपणां सर्वांना मान्य आहे असें मी धरून चालतों. तेव्हां केवळ शैक्षणिक कारभारांत कांही जुजबी सुधारणा केल्याने, उदाहरणार्थ, शालेय शिक्षणांत एक वर्षाची भर घातल्याने अगर कॉलेज शिक्षणांतील एक वर्ष घटविल्याने, अभ्यासक्रमांतील एखाद दुसरा विषय कमी जास्त केल्याने, पाठ्यक्रमांतील वाईट पुस्तकें बदलून शक्य तर त्यांचेपेक्षाहि निकस पुस्तकें नेमल्याने, चालू शाळांचीं केवळ नांवें बदलल्याने अगर यासारख्या आणखी कांहीं जुजबी सुधारणा केल्याने, आजच्या युगाला अनुकूल अशी शैक्षणिक पुनर्रचना करण्याचें प्रचंड आव्हान स्वीकारलें जाणार नाहीं. आज चालू असलेल्या शिक्षण संस्थांच्या केवळ संख्येंत भर घातल्यानेहि आजचे प्रश्न

सुटणार नाहीत. शिक्षणाचीं वास्तविक उद्दिष्टें व ध्येयें काय असावींत याची पूर्ण व स्पष्ट जाणीव झाल्याशिवाय आणि या ध्येयांचीं व्यावहारिक धोरणांशी नीट सांगड घातल्याशिवाय आजची जटिल शिक्षण समस्या सुटणार नाही. शिक्षण व लोकशाही यांच्या स्वरूपाचें व कार्याचें सखोल व व्यापक निरूपण केल्याशिवाय आपल्या शिक्षणमंदिराची सुडौल पुनर्रचना करणें शक्य नाहीं.

शिक्षणाच्या स्वरूपाचा आपण प्रथम विचार करूं. शिक्षण म्हणजे रिकाम्या डोक्यांत माहिती कोंबणें अशी जी रूढ समजूत आहे ती आपण आपल्या डोक्यांतून आधी काढून टाकली पाहिजे. शिक्षण ही कांही वरकरणी सजावट नव्हे अगर कोऱ्या पाटीवर केलेली लिखावट नव्हे. एखाद्या राजकीय विचारसरणीच्या आदेशानुसार अगर एखाद्या औद्योगिक अथवा आर्थिक अहवालांत केल्या गेलेल्या शिफारसीनुसार किंवा तसल्याच कांही तात्पुरत्या कारणाकरितां निवडलेली आणि मारून मुटकून गळीं उतरवलेली शिकवण, तालीम अथवा पोपटपंची म्हणजे शिक्षण नव्हे. लहान मुलाच्या स्वतंत्र व्यक्तित्वाचा आदर हें लोकशाहींतील शिक्षणाचें आधारभूत तत्त्व असलें पाहिजे. लोकशाहीचें भवितव्य लहान मुलांवर अवलंबून आहे. कारण तेच पुढे देशाचे नागरिक होणार आहेत. त्यांचा सर्वांगीण विकास झाला आणि समाजाच्या सर्व व्यवहारांत ते समंजसपणें व आस्थेवाइकपणें भाग घेऊं लागले तरच लोकशाहीला अभिप्रेत असलेली न्याय-नीतीची चाड वाढीस लागूं शकते. अखेरीस लोकशाही म्हणजे तरी काय आहे ? प्रत्येक नागरिकानें स्वतःच्या योग्यतेनुसार स्वतःसंबंधीचीं आणि समाजासंबंधीचीं कर्तव्यें पार पाडलीं तरच समाजांत लोकशाही नांदूं शकेल, आणि नागरिकाची योग्यता वाढवायची असेल तर त्याची सहजप्रवृत्ति ओळखून शिक्षणाद्वारें तिचा विकास घडवून आणणें आवश्यक आहे.

हें कसें शक्य होईल ? हें शिक्षणाचें ध्येय आपणांस कसें साध्य होईल ? याविषयीं मी आपले विचार थोडक्यांत आपणांपुढें मांडणार आहे. मानवी मन सुशिक्षित अन् सुसंस्कृत बनण्याची क्रिया आणि मानवी शरीराच्या वाढीची क्रिया यांच्यांत मला विलक्षण साम्य आढळून येतें. बाल्यावस्थेपासून प्रौढावस्थेपर्यंत शरीराची संपूर्ण वाढ होण्याकरितां तुष्टिदायक व पुष्टिदायक आहार, विहार व व्यायामाची आवश्यकता असते. त्याचप्रमाणें मूळस्वभावापासून सुसंस्कृत व्यक्तित्वापर्यंत मानवी मनाचा संपूर्ण विकास होण्याकरितां मानसिक आहार, विहार व अभ्यासाची आवश्यकता असते. शरीराची वाढ पदार्थ-

विज्ञानाच्या व रसायनशास्त्राच्या नियमानुसार होते तर मनाचा विकास मानसशास्त्राच्या नियमानुसार होतो.

ज्या मनाला शिक्षण द्यावयाचें तें व्यक्तीचें मन होय, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आपण कधीहि विसरतां कामा नये. त्या मनाच्या अवतीभोवती वसणाऱ्या संस्कारयुक्त वातावरणांतून त्याला स्वतःच्या संवर्धनाकरितां व जोपासनेकरितां आवश्यक असलेला आहार प्राप्त होतो. संस्कार म्हणजे मानवी तपश्चर्येने धारण केलेलें साकार रूप होय. मन आणि संस्कृति यांचे परस्पर संबंध समजून घेण्याकरितां बाल्यावस्थेपासून मानवी मनाची वाढ कशी होते याची स्थूल रूपरेषा आपण लक्षांत घेतली पाहिजे.

प्रत्येक व्यक्ति जन्मास येते तेव्हां तिचें मन म्हणजे अनेक सहजप्रवृत्तींचें गांठोडें असतें हें आपणांस सांगायला नको. सुरुवातीला तें शारीरिक गरजानुसार फक्त शारीरिक व्यापार करूं लागतें, परंतु पुढे लवकरच आपल्या मानसिक प्रवृत्त्यांच्या व प्रेरणांच्या अनुषंगाने तें मानसिक व्यापारहि करूं लागतें.

हे शारीरिक व मानसिक व्यापार करीत असतांना लहान मुलाला संतोषाचे व आशाभंगाचे पहिले अनुभव येऊं लागतात. त्याला कांही कृति व कांही वस्तु आवडू लागतात. त्यांची किंमत तें आपल्या परीने ठरवूं लागतें; आणि त्यांचेसंबंधी कांही निष्ठा त्याच्या मनांत आकार घेऊं लागतात. आपल्या प्रारंभिक अनुभवांना आवड-निवडीची कसोटी लावून त्यांचें मूल्यमापन करण्याची ही क्रिया मानसिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. मानसिक वाढींत या सुरुवातीच्या अनुभवांना फार महत्त्व आहे. मुलाच्या स्मृतींत जेव्हां अशा अनुभवांचा सांठा होतो तेव्हां तें आपल्या मानसिक वाढींतील एक महत्त्वाचें पाऊल टाकतें; त्याचे ठायीं साध्यसाधनविवेक निर्माण होतो.

ज्या कृति व ज्या वस्तु मुलाला आवडलेल्या असतात आणि ज्यांचें मूल्य त्याने जाणलेलें असतें त्या मिळविण्याकरितां त्याची धडपड सुरू होते. लहान मूल आपल्या अल्पशा परंतु सतत वाढणाऱ्या अनुभवाच्या आधारावर आपलें साध्य मिळविण्याकरितां वेगवेगळ्या साधनांचा प्रयोग करूं लागतें. हीं उद्दिष्टें साध्य झालीं म्हणजे त्यांचेविषयीं मनांत रुजूं लागलेल्या निष्ठा बळावतात. ज्या उद्दिष्टाचे ठायीं निष्ठा जडली आहे अशा उद्दिष्टांची संख्या हळूहळू वाढूं लागते. वांच्छित उद्दिष्टें प्राप्त करण्यास जीं साधनें उपयोगी पडलेलीं

असतात त्यांचेविषयीहि मनाला गोडी वाटूं लागते; त्यांचा मनाला छंद लागतो. अशा प्रकारें निष्ठा-उद्दिष्ट-छंद यांची त्रिगुणात्मक गुंफण मनांत आकार घेऊं लागते. प्रत्येक वाढत्या व्यक्तीच्या मनाला जो विशिष्ट पीळ असतो त्याचा उगम या निष्ठा-उद्दिष्ट-छंद यांच्या त्रिगुणात्मक गुंफणींतून होतो.

तथापि विकासाच्या प्रारंभिक अवस्थेंत मानवी मनाला ज्या जीवन-मूल्यांचा अगर निष्ठांचा प्रत्यय येतो ती केवळ प्राकृतिक व देहनिष्ठ मूल्यें असतात. या मूल्यमापनाच्या प्राथमिक तराजूंत कोणतीहि गोष्ट सुखदायक आहे कीं तापदायक, सोयीची आहे कीं गैरसोयीची, शरीराला स्वैर वावरूं देणारी आहे कीं बंधनकारक, इंद्रियांना सुख देणारी आहे कीं पीडादायक आहे, एवढेंच तोललें किंवा मापलें जाऊं शकतें. तात्पर्य काय कीं निष्ठा-उद्दिष्ट-छंद यांचें हें प्राथमिक त्रैराशिक शारीरिक अथवा प्राकृतिक पातळीवरील समस्या सोडवीत असतें. या पातळीवर पशुकोटींतील कित्येक उन्नत प्राणी कमी अधिक प्रमाणांत माणसाची बरोबरी करूं शकतात.

परंतु शारीरिक व मानसिक पातळीखेरीज मानवी मनोव्यापार आणखी एका तिसऱ्या क्षितिजापर्यंत विकास पावूं शकतात. या क्षितिजाला बौद्धिक अथवा आत्मिक पातळी असें नांव देतां येईल. या पातळीवरील मनो-व्यापारांच्या तृप्तीने सुद्धां मानवी मनाला कांहीं जीवननिष्ठा सफल झाल्याचा आनंद प्राप्त होतो. परंतु या निष्ठा आणि नुकत्याच वर्णन केलेल्या प्राथमिक निष्ठांमध्यें जमीन-अस्मानाचें अंतर आहे. या दोन पातळ्यांवरील निष्ठांचा केवळ नामनिर्देश केला तरी त्यांच्यांतील अंतर स्पष्ट होईल—सत्य, शिव, सुंदर अन् पवित्र या बौद्धिक आणि आत्मिक निष्ठा आहेत; तर आरोग्य, शरीरसुख, सांपत्तिक लाभ अन् वैषयिक प्रेम या दैहिक निष्ठा आहेत. बौद्धिक अथवा आत्मिक निष्ठांच्या ठायीं चिरंतन व अतीव तृप्ति सांठवलेली असते. आणि त्यांचें अस्तित्व कोणत्याहि बाह्योपचारावर अवलंबून नसतें. या निष्ठा समा-जांत आणि व्यक्तीच्या जीवनांत आपला साक्षात्कार घडवून आणण्याचें आवाहन सतत देत असतात. एकदां या निष्ठांनी आपल्या मनाची पकड घेतली म्हणजे आपल्या जीवनमूल्यांच्या यादींत त्यांना सर्वश्रेष्ठ व निर्णायक स्थान प्राप्त होतें. त्यांच्या प्रखर प्रकाशांत इतर दैहिक निष्ठा साहजिकच फिक्या पडतात. बौद्धिक व आत्मिक निष्ठांच्या अंगीं माणसाची जीवनदृष्टि

आमूलाग्र बदलून टाकण्याची किमया असते. ज्या शिक्षणामुळे शिष्याला या स्वयंभू नैतिक व बौद्धिक निष्ठांचें दर्शन घडण्यास साहाय्य होईल त्यालाच वास्तविक अर्थानें शिक्षण म्हणतां येईल. या निष्ठांचें दर्शन घडलें म्हणजे स्वतःच्या शक्त्यनुसार समाजांत व स्वतःच्या जीवनांत त्या निष्ठांचा साक्षात्कार घडवून आणण्याची ओढ शिष्याच्या मनाला सतत लागून राहील. क्षणभंगुर आणि वैयक्तिक निष्ठांचा पाठपुरावा करीत असतांना माणसांतील पशु-प्रवृत्ति प्रकट होते; परंतु माणसांतील नैतिक आणि आत्मिक अंश त्याला चिरंतन सामाजिक निष्ठांची उपासना करण्यास प्रवृत्त करतो. या उच्च निष्ठांमुळे मानवी जीवनाला अर्थ आणि हेतु प्राप्त होतो. पशूच्या दृष्टीने विचार केला असतां त्याच्या स्वतःच्या जीवनामागे कांहीं प्रयोजन अथवा स्वतः अंगीकारिलेलें उद्दिष्ट नसतें. पशु आपलें जीवन शरीरधर्मानुसार कंठीत असतात. उलटपक्षीं माणसाला या स्वयंभू नैतिक निष्ठांचें दर्शन घडलें म्हणजे त्याच्या जीवनाला एक नवीन आशय व हेतु प्राप्त होतो आणि या निष्ठांच्या उपासनेंत जीवन व्यतीत करण्याची ओढ त्याला लागते. या निष्ठांमुळे मानवाच्या जीवनरूपी बुडबुड्याला सागराची शाश्वतता प्राप्त होते.

मानवी मनावर अवतीभोंवतीच्या वातावरणांतून जे संस्कार घडत असतात त्यांच्या द्वारेंच त्याला या अंतिम निष्ठांचें दर्शन घडूं शकतें. पण हें संस्कार तरी येतात कोठून ? इतर व्यक्तींनी अथवा समुदायांनी या निष्ठा आचरणांत आणण्याकरितां जी उपासना केलेली असते तिचेंच मूर्त स्वरूप म्हणजे हे श्रेष्ठ संस्कार होत. मानवी समाजाच्या संस्कृतींत त्याचें शास्त्र-विज्ञान, कलाकौशल्य, यंत्रतंत्र, धर्मपंथ, चालीरीति, नीतिकल्पना, कायदेकानून, सणसमारंभ, साधुमहात्मे, पाठशाळा, विद्यापीठें आदि सर्व गोष्टींचा समावेश होतो. या सर्व सांस्कृतिक उपकरणांचा उगम वैयक्तिक अथवा सामुदायिक मनाच्या बौद्धिक व नैतिक बळांतून झालेला असतो. या उपकरणांच्या द्वारें मानवी मनांतील बौद्धिक व नैतिक निष्ठांना दृश्य आकार प्राप्त होतो. मानवी मनांतील नैतिक व आत्मिक अंशाला मानवी संस्कृतीच्या द्वारें मूर्त स्वरूप प्राप्त होतें.

मानवी मनाच्या शैक्षणिक विकासाला चालना देण्याचें कार्य या सांस्कृतिक उपकरणांद्वारेंच केलें जाऊं शकतें. मानवी मनाच्या परिपोषणाकरितां तोच एकमेव आहार होय. मानवी मनावर हे संस्कार घरांतील वातावरणांतून,

शाळा-कॉलेजांद्वारें, सार्वजनिक संस्थांमार्फत आणि सर्वव्यापक राजकीय चळवळींतून व घडामोडींतून होत असतात. वाढीस लागलेलें मानवी मन प्रथम अजाणतेपणीं आणि नंतर अधिक डोळसपणें सर्व संस्कार टिपून घेत असतें. आणि आपल्या विशिष्ट गरजांनुसार या संस्कारांचा उपयोग करून घेत असतें. या संस्काराचा असा उपयोग केला जातो तेव्हां त्यांना शैक्षणिक महत्त्व प्राप्त होतें. समाजाचें सांस्कृतिक धन सुसंस्कृत मनांच्या तपश्चर्येतून संकलित होतें आणि त्यांनी निर्माण केलेल्या संस्कारांतून नवीन मनें सुसंस्कृत बनतात, सुशिक्षित बनतात.

मात्र एक गोष्ट विसरतां कामा नये. प्रत्येक मन स्वतःच्या वाढीकरतां एकाच ठशाचे संस्कार टिपून घेऊं शकत नाहीं. प्रत्येक व्यक्ति जन्मापासून आपल्या विशिष्ट मूळ स्वभावानुसार भोंवतालच्या व्यक्तींशी व वस्तूंशी व्यवहार करीत असते. या विशिष्ट मूळ स्वाभावाचा उगम त्या त्या व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक प्रकृतींतून झालेला असतो. विविध भावना, आकांक्षा, आचार व विचार यांच्या द्वारें प्रकट होणाऱ्या या विशिष्ट मूळ स्वभावांत फारसा फरक घडवून आणणें शक्य नसतें. उलट याच मूळ स्वभावावर अवतींभवतींच्या सांस्कृतिक उपकरणांच्या द्वारें चांगले संस्कार घडवून एका अधिक विकसित व्यक्तित्वाची मूर्ति कोरावयाची असते. अधिक विकसित व्यक्तित्वाच्या या कल्पनेला स्प्रेंजर नामक विद्वानाने जीवन-आकृति (Lebensform) असें नांव दिले आहे. समाजाने संकलित केलेल्या संस्कृतीचा वैयक्तिक पुनर्प्रत्यय शिक्षणाद्वारें प्राप्त होतो. शिक्षणाद्वारें संस्कृतीच्या बाह्य व व्यक्त रूपाचें व्यक्तीच्या अंतःकरणावर प्रतिबिंब पडतें. माणूस ज्या वातावरणांत वाढत असतो त्यांत त्याला अनुभवतां येणाऱ्या साकार संस्कारांच्या साहाय्यानें त्याच्या चित्तांत जागृत केल्या गेलेल्या निष्ठा-परंपरेला शिक्षण असें नांव देतां येईल.

शिक्षणाच्या स्वरूपाची अगर ध्येयाची वरीलप्रमाणें व्याख्या केल्यानंतर दोन प्रकारच्या सिद्धान्तांकडे आपणांस लक्ष पुरविलें पाहिजे : (१) कोणत्याहि शिक्षणाला लागू पडणारे सिद्धान्त; आणि (२) समाजांतील सर्व घटकांना द्यावयाच्या शिक्षणाची व्यवस्था करतांना ध्यानांत ठेवण्याजोगे सिद्धान्त. प्रथम मी पहिल्या प्रकारच्या सिद्धान्तांची, अर्थात कोणत्याहि प्रकारच्या शिक्षणाला लागू पडणाऱ्या सिद्धान्तांची चर्चा करतों.

आपण आतांपर्यंत शिक्षणाची जी कल्पना रेखाटली आहे तिच्यापासून

ओघानेच कांहीं तत्त्वें निघतात. या सर्व तत्त्वांपैकीं स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचें तत्त्व लोकशाही समाजव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यधिक महत्त्वाचें आहे. परंतु सर्वच शिक्षण-संस्थांतून बहुधा या तत्त्वाकडे डोळेझाक केली जाते. तसें पाहतां शिक्षणांतील हें मूलभूत तत्त्व अगदीं उघड आहे. या तत्त्वानुसार, ज्या सांस्कृतिक उपकरणांची अंतः प्रवृत्ति एखाद्या व्यक्तीच्या मूळस्वभावाशी पूर्णतः अगर निदान अंशतः मिळतीजुळती असेल त्याच संस्कारांद्वारें त्या व्यक्तीच्या मनाचा उत्तम विकास होऊं शकतो. शिष्याची स्वतःची निष्ठा-उद्दिष्ट-छंदाची त्रिमूर्ति त्याच्या मूळ स्वभावावर म्हणजेच त्याच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वावर आधारलेली असते. ही त्रिमूर्ति साहजिकच आपल्यासारखीच अंतःप्रवृत्ति, निष्ठा, उद्दिष्टें व छंद असणाऱ्या संस्कारांकडेच वळते. प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणांत वास करणारी ही निष्ठा-उद्दिष्ट-छंदाची त्रयी म्हणजेच त्या व्यक्तीचा संपूर्ण स्वभाव होय. आपल्या मूळ स्वभावाचें अथवा स्वधर्माचें पालन करीत असतांना व्यक्तीच्या अंगीं वसणाऱ्या सर्व सुप्त गुणांचा विकास होतो. ही उपासना करीत असतांना माणूस संस्कृतीच्या आपल्या विशिष्ट क्षेत्रांतील सूक्ष्मातिसूक्ष्म क्षितिजांवर आरोहण करतो आणि त्याचें मनोबल क्रमाक्रमाने वाढत जातें. विकासाच्या या क्रियेचा परिपाक असा होतो कीं एका विषयाचा व्यासंग करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या वटवृक्षाला नवनवीन फांद्या फुटूं लागतात, त्याला नवनवीन विषयांत गोडी वाटूं लागते. कित्येकदा तर या नवीन फांद्यांमुळें धरून जोमाने वाढूं लागतात आणि त्या व्यक्तीच्या अंगींच्या अष्टपैलू गुणांचा विकास घडवून आणतात. खटपटी मुलांत सुरुवातीला केवळ तांत्रिक, व्यावहारिक रूपाने वसणारी हौस वाढतां वाढतां तात्त्विक, कलात्मक आणि अखेरीस धार्मिक छंदापर्यंत विकसित होण्याचा संभव असतो; परंतु सर्वसाधारणपणें असेंच म्हणावें लागेल कीं ज्या मुलाचा अथवा मुलीचा स्वाभाविक कल तत्त्वदर्शनाकडे असतो त्याच्या अथवा तिच्या मनाचा विकास ज्ञानमार्गानेच होऊं शकतो; आणि त्याला अगर तिला संस्कृतीच्या इतर क्षेत्रांत शिरकाव करून घ्यावयाचा असेल तर मुख्यत्वेंकरून ज्ञानमार्गानेच वाटचाल करावी लागते. ज्या शिष्याची मूळ प्रवृत्ति कलात्मक असते त्याच्या मनाचा खरा विकास केवळ कलेच्या उपासनेनेंच होऊं शकतो. त्याला ज्ञानमार्गावर अथवा कर्ममार्गावर फरफटत नेऊन त्याचा विकास करूं पाहणें व्यर्थ आहे. केवळ कलेच्या अथवा भक्तीच्या मार्गानेच त्याच्या विकासाचें अथवा मुक्तीचें द्वार खुलूं शकेल. एकदां

शिष्याच्या विशिष्ट प्रवृत्तीची कळ हेरुन त्याच्या विकासाचें द्वार खुलें केलें कीं मग संस्कृतीच्या विविध दालनांमध्ये त्याला अनिर्बन्ध संचार करतां येईल. संस्कृतीच्या मंदिरांतील मनोरे विभक्त नसून अनेक मार्गांनी ते परस्परांशी जोडलेले आहेत. कलेपासून विज्ञान व शिल्पापर्यंत, विज्ञानापासून कला व शिल्पापर्यंत आणि शिल्पासून विज्ञान व कलेपर्यंत पोहचण्याचे सहस्रावधि लहान मोठे मार्ग उपलब्ध आहेत. परंतु एखाद्या विद्यार्थ्याच्या मनांत एखाद्या विषयाची जर अजिबात आवड नसेल तर त्या विषयाची गंगा त्याच्या शिरावर ओतल्याने फक्त पालथ्या घड्यावर पाणी टाकण्याचें श्रेय पदरीं पडेल. ज्या माणसाला संगीताची मुळीच गोडी नाहीं तो माणूस राग-तालांच्या मैफलींत रंगूं शकणार नाहीं. आणि तेथें त्याच्या आत्म्याला तुष्टि व पुष्टि लाभणार नाहीं. ज्या माणसाच्या डोळयांत रंगभेद जाणण्याची शक्ति नाहीं त्याला कुशल चित्रकारांच्या महान कलाकृति दाखवून काय लाभ होणार ? याप्रमाणेंच लहान मुलें हातपाय हलवून कांही तरी करण्याकरितां घडपडत असतांना आपण मात्र बौद्धिक पाठांच्या द्वारें त्यांच्या मनाचा विकास करण्याची व्यर्थ खटपट करीत असतों. सहानुभूति, प्रेम, विश्वास आणि आदर यांसारख्या संवादी भावनांचा आश्रय घेतल्याविना थोर संतमहात्मेसुद्धां समाजाच्या सांस्कृतिक विकासाला हातभार लावूं शकत नाहींत. अखेरीस थोर पुरुष सुद्धा आपल्याशी आपल्याच भाषेंत बोलूं शकतात. आपल्या अंतरात्म्याला अगर आपल्या विशिष्ट मनोरचनेला जी भाषा रुचते तीच भाषा आपल्याला सहजपणें समजूं शकते. एखाद्या थोर पुरूषाचें कार्य आपल्या आवाक्यापलीकडे असेल तर त्या पुरुषाचा आपल्यावर कांहीं एक प्रभाव पडणार नाही. परंतु ज्या थोर पुरूषाच्या कार्यासंबंधी आपल्याला जिव्हाळा वाटत असतो त्याचा आपल्यावर विलक्षण पगडा बसतो आणि आपल्या बौद्धिक, नैतिक व आत्मिक विकासास त्याचें फार मोठें साहाय्य होतें. शिष्यांचा मनोधर्म व त्यांचेवर केले जाणारे संस्कार यांचे दरम्यान साम्य व तादात्म्य असलें पाहिजे हा शिक्षणशास्त्रांतील स्वयंसिद्ध नियम आहे. **सिम्मेल** नामक विद्वानाने काढलेले पुढील उद्‌गार अगदी सार्थ आहेत. तो म्हणतो : "संकुचित एकतेपासून विस्तृत विविधतेपर्यंत व तेथून पुढें विकसित एकतेपर्यंत होणाऱ्या मानवाच्या प्रवासाला संस्कृति हें नांव देतां येईल."

वैयक्तिक मनोरचनांच्या वर्गीकरणासंबंधी करण्यांत आलेल्या अत्यंत उपयुक्त आणि चित्तवेधक प्रयोगांसंबंधी माहिती सांगून मी आपला अधिक वेळ

घणार नाही. कारण ती फार लांबण होईल, आणि व्याख्यानांत लांबण लावल्याने मनोरंजक विषय सुद्धा कंटाळवाणा होऊं शकतो. परंतु **जॉर्ज केर्श्चेनस्टिनर** नामक विख्यात जर्मन शिक्षणतज्ज्ञाने सुचविलेलें वर्गीकरण नमूद केल्याशिवाय मात्र माझ्याच्याने राहवत नाही; आणि तें नमूद करण्याचें मुख्य कारण म्हणजे माझ्या पुढील व्याख्यानांत त्याची कांहीं परिभाषा मी वापरणार आहे. त्याच्या प्रयोगांसंबंधी आपल्या देशांत विशेष माहिती नाही. थोडेसें व्यक्तिगत बोलायचें झाल्यास, माझ्या शैक्षणिक विचारसरणीचा आराखडा मी त्याचेकडूनच उचलला आहे. पुढें गांधीजींच्या चरणापाशी बसण्याचें आणि त्यांच्या शैक्षणिक प्रतिभेला प्रयोगात्मक रूप देण्याचें भाग्य मला लाभलें, त्यामुळें माझ्या कल्पनेंत रुजलेल्या कच्च्या आराखड्याला स्थैर्य, गांभीर्य आणि समृद्धि प्राप्त झाली. गांधीजींच्या सहवासामुळें कविकल्पनांना दृढ प्रतिज्ञांचें रूप प्राप्त झालें. असो.

**केर्श्चेनस्टिनरने** सुरुवातीलाच व्यक्तीच्या मनोरचनेचे दोन मूलभूत प्रकार नमूद केले आहेत : (१) चिंतनशील स्वभाव आणि (२) क्रियाशील स्वभाव. केवळ चिंतनपरायण माणूस बाह्य सृष्टींत कांहीं परिवर्तन घडवून आणण्याच्या अगर तिच्यांत कांहीं भर घालण्याच्या भानगडींत पडत नाही; पण त्याचा अर्थ असा नाही की चिंतन ही एक निश्चेष्ट, जड, अचेतन अवस्था आहे. बाह्य सृष्टींतून टिपलेल्या अनुभवावरच चिंतनाचे प्रयोग चालू असतात. चिंतन म्हणजे केवळ बाह्य सृष्टीचें जड चित्रण नाही. चिंतनशील माणसाचीं कर्मेंद्रियें निष्क्रिय दिसलीं तरी त्याचें मन क्रियाशील असतें. तें बाह्य सृष्टींतून अनुभव गोळा करतें. त्यावर साधक-बाधक आणि सर्वांगीण विचार करतें; आणि त्या विशिष्ट अनुभवांना सामान्य सिद्धान्ताच्या सूत्रांत गोवण्याचा प्रयत्न करतें. चिंतन ही एक अर्थपूर्ण अथवा सप्रयोजन निरीक्षणाची वृत्ति आहे; चिंतन ही कल्पनेच्या क्षेत्रांतील सृजनशील क्रिया आहे. चिंतनामध्यें खरोखर पराकाष्ठेची मानसिक क्रियाशीलता भरलेली आहे. परंतु ज्या अर्थानें आपण इतर माणसांना क्रियाशील म्हणतों त्या अर्थानें मात्र चिंतकाला क्रियाशील म्हणतां येणार नाहीं. ज्या मूलभूत स्वभावाला **केर्श्चेनस्टिनरने** क्रियाशील असें नांव दिलें आहे तो स्वभाव बहिर्मुख असतो, आणि बाह्य सृष्टींतील घडामोडींमध्यें भाग घेऊं इच्छितो. चिंतनशील प्रवृत्ति आणि क्रियाशील प्रवृत्ति या दोन्ही प्रवृत्त्या मुख्यतः अनुकरणशील असूं शकतात अगर सृजनशील असूं शकतात. चिंतनांतील अगर क्रियाशीलतेंतील अनुकरण

एक तर पूर्णपणें यांत्रिक असूं शकतें अथवा त्या अनुकरणांतहि कांहीसा विचारीपणा अथवा डोळसपणा असूं शकतो.

ध्येय, उद्दिष्ट आणि हेतु यांच्या आधारावर चिंतन आणि क्रियाशीलता यांचे आणखी प्रत्येकी दोन पोटभेद केले जाऊं शकतात. चिंतनाचा विषय केवळ भौतिक वस्तु असूं शकतो; म्हणजेच केवळ इंद्रियगोचर सृष्टींतील एखाद्या विषयासंबंधी अथवा तिच्या अंगोपांगासंबंधी विचार केला जाऊं शकतो; अगर त्या भौतिक वस्तूंचा इंद्रियातीत सृष्टीशी असणाऱ्या संबंधाचा विचार केला जाऊं शकतो. अर्थात चिंतनाचा हेतु अथवा उद्दिष्ट एक तर व्यवहारिक असूं शकतें अगर व्यवहारातीत असूं शकतें. सृष्टि कशी आहे, सृष्टिक्रम कसा चालतो, वस्तूंची उत्पत्ति, स्थिति अगर लय कोणत्या नियमांनुसार होतात, इत्यादि गोष्टींचा विचार ज्याप्रमाणें माणूस करूं शकतो त्याचप्रमाणें सृष्टींतील घडामोडींचा उद्देश काय, त्याचा अर्थ काय व त्यांचें महत्त्व काय या विषयांचाहि विचार केला जाऊं शकतो. या दोन्ही प्रकारच्या विचारांना तत्त्वचिंतन म्हणतां येईल. पहिल्या प्रकाराला यथार्थ चिंतन हें नांव देतां येईल व दुसऱ्या प्रकाराला भावार्थ चिंतन म्हणून संबोधतां येईल. मानवनिर्मित विविध शास्त्रें व विज्ञानें हीं या दोन प्रकारच्या चिंतनाची फलनिष्पत्ति होय. या दोन्ही प्रकारच्या चिंतनांत कर्ता व कर्म अर्थात विचार करणारी व्यक्ति व तिच्या विचारांचा विषय, या दोहोंत असलेल्या भेदाची स्पष्ट जाणीव असते; इतकेंच नव्हे तर ज्या वस्तूंसंबंधी विचार चालू असतो त्या वस्तूंचे सामान्य गुणधर्म आणि त्यांचें वैचित्र्यपूर्ण विशेष गुणधर्म यांचेमध्यें असलेल्या भेदाचीहि स्पष्ट जाणीव असते.

जेव्हां वस्तूंच्या अंतिम आधाराचा ध्यास न धरतां केवळ त्यांच्या अंतर्बाह्य गुणांवर माणसाची दृष्टि केंद्रित होते तेव्हां कर्ता व कर्म यांचेमधील भेद कायम राहिला तरी सामान्य आणि विशेषामध्यें असलेला भेद लोप पावतो. अशा वेळीं विशेषाचें प्रतिबिंब बाह्य सृष्टींतून टिपून घेण्याची गरज शिल्लक राहत नाहीं, तर मानवी मनाला त्याची प्रत्यक्ष अनुभूति प्राप्त होते. याच अवस्थेला सौंदर्योपासना म्हणतात. या उपासनेची फलनिष्पत्ति म्हणजेच गायन, वादन, नृत्य, चित्र आदि मानवनिर्मित विविध कला होत.

वस्तूंच्या अंतिम स्वरूपाचा विचार करून त्यांच्या मौलिकतेची तुलना करण्यांत रमून जाणाऱ्या चिंतनाला धार्मिक चिंतन म्हणतां येईल. धार्मिक चिंतनाची पराकाष्ठा झाली म्हणजे केवळ सामान्य आणि विशेष यांचेमधील

आडपडदा सुद्धा नाहींसा होतो. साक्षात्काराचे समयीं संतांचा अहंकार लुप्त होतो व ते सकल सृष्टीशी तादात्म्य अनुभवतात. धार्मिक उपासनेंतून निर्माण होणारी फलनिष्पत्ति धर्म, पंथ, पोथ्या, पुराणें, पुण्यस्थानें, जत्रा, मेळे व विशेषेंकरून संत-महात्मे आदि रूपाने समाजांत वावरते. जेव्हां कोणा पुण्यश्लोक मानवाला निर्भेळ धार्मिक साक्षात्कार घडतो तेव्हां त्याच्या हृदयांतून दिव्य तेज प्रकट होतें आणि त्या तेजापासून आसपासच्या सर्व संसारी जीवांना प्रेम व प्रकाश प्राप्त होतात.

आतापर्यंत आपण चिंतनशील स्वभावाचा अधिक विचार केला. आता थोडें क्रियाशील स्वभावाकडे बघूं या. या प्रवृत्तीचेहि तिच्या उद्दिष्टानुसार दोन पोटभेद पडूं शकतात. माणसाच्या कार्याला ज्या मूल्याचें अधिष्ठान असेल त्यावरच त्याच्या कार्याचें उद्दिष्ट अवलंबून असतें. कोणत्याहि कार्यापासून एक तर स्वतःला लाभ होतो म्हणून किंवा इतरांना लाभ होतो म्हणून कोणीहि तें कार्य करण्यास प्रवृत्त होतो. दुसऱ्या शब्दांत बोलायचें झाल्यास क्रियाशील प्रवृत्ति ही एक तर स्वार्थपरायण असूं शकते अथवा परार्थ परायण असूं शकते. स्वार्थपरायण प्रवृत्तीचेहि दोन प्रकार असूं शकतात. भौतिक सुखसाधनांचा संचय, सांभाळ आणि वाढ करूं पाहणारी; आणि स्वतःचा बौद्धिक विकास व उन्नति करूं पाहणारी. पहिलीला भौतिक स्वार्थपरायणता म्हणतां येईल तर दुसरीला आदर्शवादी स्वार्थपरायणता म्हणून संबोधतां येईल. स्वार्थपरायण क्रियाशीलतेचा उगम स्वसंरक्षणाच्या व आत्मप्रौढीच्या प्रेरणेंतून होतो. परार्थी क्रियाशीलतेचा उगम करुणेच्या व सहानुभूतीच्या प्रेरणेंतून होतो. परार्थी क्रियाशीलतेचीं तीन उद्दिष्टें असूं शकतात : (१) स्वतःखेरीज इतर कोण्या व्यक्तीला अथवा स्वतः चा समावेश नसणाऱ्या कोण्या गटाला होणारा आनंद; ह्याला परोपकारी क्रियाशीलता म्हणतां येईल. (२) स्वतःचा ज्यांत समावेश आहे अशा जनसमुदायाचा आनंद; हिला सामाजिक क्रियाशीलता हें नांव देतां येईल. (३) याखेरीज क्रियाशीलतेचा एक तिसरा प्रकार आहे जिचा उद्देश कोणा एका व्यक्तीला अगर गटाला आनंद देण्याचा नसून, केवळ त्या क्रियेपायीं होणारा आनंद हाच तिचा उद्देश असतो. या प्रवृत्तीला निरपेक्ष क्रियाशीलता असें नांव देतां येईल.

अशा रीतीने **केश्चेंनस्टीनरने** चिंतनाचे तीन प्रमुख प्रकार पाडले आहेत—शास्त्रोपासना, सौंदर्योपासना, आणि धार्मिक उपासना; आणि क्रिया-

शीलतेचेहि तीन प्रमुख प्रकार केले आहेत––तात्विक, कलात्मक व धार्मिक. या प्रत्येकाचें पुन्हा चार उपप्रकार आहेत ते असे: (१) स्वार्थपरायण, (२) समाजाभिमुख (३) परोपकारी आणि (४) निरपेक्ष. खरी गोष्ट अशी आहे कीं यांपैकीं कोणताहि प्रकार विशुद्ध स्वरूपांत क्वचितच आढळून येतो. व्यक्तीची मनोरचना केवळ वरील प्र ुख प्रवृतिप्रकारांपैकीं एक वा अनेकांच्या प्रादुर्भावा-बरच अवलंबून नसते तर प्रस्तुत प्रवृत्तिप्रकारांच्या कमी अधिक प्रखरतेवरहि अवलंबून असतें.

एका प्राथितयश शिक्षणतज्ज्ञाने केलेल्या व्यक्तिस्वभावांच्या वर्गीकरणाचा हा त्रोटक सारांश किंचित कंटाळवाण झाला असेल अशी मला भीति वाटते. परंतु कंटाळवाणें प्रवचन झोडणाऱ्या वक्त्याला आपल्या अपरा-धाची निदान जाणीव आहे हें ऐकून कंटाळलेल्या श्रोत्यांना कांहीसा दिलासा मिळेल. खुद्द वक्त्यालाच आपल्या वाग्गंगेचा ओघ कसा वाहतो आहे याचें भान राहत नसेल तर मात्र श्रोत्यांचा निरूपाय होतो. माझ्या श्रोत्यांचें सांत्वन करण्या-करितां मी एक गोष्ट सांगू शकतों कीं कंटाळवाणीं प्रवचनें ऐकण्याची पाळी मजवरहि पुष्कळदा आली आहे आणि अशा प्रसंगीं अहेतुकपणे येणारी जांभई वगळली तर मी अगदीं धैर्याने आत्मसंयम दाखविला आहे. आपण सुद्धा तितक्याच धैर्याने आत्मसंयम दाखविला आहे. हें मला ताबडतोब मान्य केलें पाहिजे.

विनोद सोडला तर माझें असें स्पष्ट मत आहे कीं विविध प्रकारांच्या मनोरचनांचा व 'निष्ठा–उद्दिष्ट-छंद' त्रयींचा शोध लावणे आणि विविध प्रकारांच्या संस्कारांचें शैक्षाणिक महत्त्व निर्धारित करणें हें शिक्षणशास्त्राचें व सांस्कृतिक मानसशास्त्राचें अत्यंत उपयुक्त कार्य आहे. या क्षेत्रांत बरेचसें काम आधीच झालेलें आहे. भारतीय शिक्षणतज्ज्ञांना व मानसशास्त्रज्ञांना या क्षेत्रांत नवनवीन संशोधन करतां येणें जरी सहज शक्य असलें तरी इतरांनी आधींच लाबून ठेवेलेल्या शोधांचा सदुपयोग करण्याचें अधिक निकडीचें परंतु कमी भपक्याचें काम त्यांनी सध्या अंगीकारावें.

स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या तत्त्वाची विस्तृत चर्चा केल्यानंतर आता मी दुसऱ्या शैक्षणिक तत्त्वाकडे वळतों.

व्यक्तिमत्त्वाच्या तत्त्वांतूनच निष्पन्न होणारें आनुषंगिक तत्त्व हें आहे कीं शिक्षण देतांना विद्यार्थी व्यक्तिगत विकासाच्या कोणत्या अवस्थेप्रत पोचला

आहे याचा उचित विचार झाला पाहिजे. शिक्षण ही एक अव्याहत चालणारी क्रिया आहे. या क्रियेमध्यें मुक्कामाला जितकें महत्त्व आहे तितकेंच प्रवासालाहि आहे. कारण गंमत अशी आहे कीं या प्रवासांत कोणी कधी मुक्कामाला पोहोंचतच नाही. या प्रवासांतील प्रत्येक मजल आपापल्या परीनें महत्त्वाची व उपयुक्त असते. परंतु या प्रवासांत मजल दरमजल कूच करीत करीत अखेरीस कोणता तरी मुक्काम गांठायचा आहे ही समजूत पूर्ण चुकीची आहे. शैक्षणिक प्रगतींतील एक प्रारंभिक व प्राथमिक मजल म्हणजे पदवी परीक्षा होय. या परीक्षेला अथवा पुढे एखाद्या विषयांत पांडित्य प्राप्त करून घेण्यालाच शिक्षणाचें अंतिम उद्दिष्ट मानलें तर ती एक फार मोठी चूक होईल. ही मजल गांठल्यानंतर माणूस जर तेथेंच तळ ठोकून बसला तर शिक्षणाच्या अजरामर साहसांतील सारें स्वारस्य नाहीसें होईल. शिक्षणरूपी प्रवासांतील प्रत्येक मजल गांठतांना माणसाचें मन उल्हसित होऊन त्याचें बळ वाढूं शकते आणि त्या वाढत्या बळाच्या जोरावर तो अधिक साहसपूर्ण सफरीकरितां आगेकूच करूं शकतो. परंतु एखादा टप्पा गांठल्यानंतर जर प्रवाश्याने हातपाय गाळले तर त्या प्रवासांतील सारी मौज पूर्णपणें नष्ट होईल. शिक्षणाच्या मंदिरांतील शिखराकडे लक्ष देऊन पायरीची उपेक्षा केली तर त्यामुळे शिखराचीच हानि होईल. या प्रवासाची तयारी अगर सिद्धता करण्यांत मनाला समाधान लाभलें पाहिजे; आणि हें समाधान हीच पुढील प्रवासाची सिद्धता होय असे **श्लीअरमार्चर** नामक एका महान् जर्मन शिक्षण पंडिताने म्हटलें आहे तें अगदी योग्य आहे.

प्रत्येक सुसंचालित शिक्षणव्यवस्थेंत विद्यार्थ्याच्या मानसिक प्रगतीला फार जलद चालना देण्याचा खटाटोप न करण्याची काळजी घेतली गेली पाहिजे. शाळा म्हणजे कारखाना नव्हे आणि माणूस म्हणजे ठराविक कामें पार पाडणारें कळसूत्री बाहुलें नव्हे. शाळा हें विद्येचें मंदिर आहे; आणि तेंच वातावरण टिकविण्याचा तेथे प्रयत्न झाला पाहिजे. विद्यार्थ्याच्या विकासांतील प्रत्येक अवस्था तेथे परिपक्क होऊं शकली पाहिजे आणि पुढच्या अवस्थेकडे जाण्या-करतां तेथे फुटणाऱ्या अंकुरांची काळजीपूर्वक जोपासना झाली पाहिजे. शिक्षणाच्या क्षेत्रांत खेंचाखेंची अगर ढकलाढकली केल्याने भयकर दुष्परिणाम होऊं शकतात.

**केर्श्चेनस्टिनरने** आपल्या Theorie der Bildung नांवाच्या ग्रंथांत मनोविकासाच्या प्रारंभिक काळाचे तीन भाग पाडले असून प्रत्येक भाग सात

वर्षांचा कल्पिला आहे. पहिल्या सात वर्षांच्या काळाला त्यानें क्रीडेचें वय म्हटलें आहे. सातव्या वर्षापासून १४ व्या वर्षापर्यंतच्या काळाला त्यानें स्वार्थी उद्योगाचें वय हें नांव दिले असून १४ व्या वर्षापासून २१ व्या वर्षापर्यंतच्या तिसऱ्या काळाला परार्थी उद्योगांचें वय म्हणून संबोधिलें आहे. प्रत्येक वयोमानांतील स्वाभाविक प्रवृत्तींचें यथार्थ कौतुक केलें गेलें पाहिजे आणि केवळ पुढच्या प्रगतींतील एक पायरी म्हणून तिची उपेक्षा केली जातां कामा नये. क्रीडाशील बाळमनाच्या उत्स्फूर्त आनंदाला व निर्हेतुक स्वच्छंदतेला अडसर घालून त्याला क्रीडाकौशल्य शिकवण्याच्या भरीस पडूं नये. क्रीडा हेंच क्रीडेचें उद्दिष्ट आहे. खेळकर मुलाला खेळाखेरीज इतर कसलीच गोडी नसते. खेळ चांगला खेळतां यावा ही ईर्षा सुद्धा त्याचें मनांत वास करीत नाही. आपण नुसते वयानें मोठे न होतां कांही शहाणपणा शिकलों असूं तर खेळकर मुलाच्या खेळांना आपण असें वळण देऊं शकतों कीं आपोआप व हंसत खेळत त्याच्या अंगीं क्रीडाकौशल्य निर्माण होईल. पुनरावृत्ति ही कौशल्याची गुरुकिल्ली आहे. या अगर इतर उपायांनी मुलांत क्रीडाप्रावीण्य निर्माण होऊं शकतें. या प्रावीण्याचा उपयोग पुढील उद्योगशील वयांत स्वतः निवडलेल्या उद्दिष्टांच्या पूर्तिकरितां केला जाऊं शकतो. आणि त्याच हेतूनें मूल प्रावीण्यसंपादनाकडे प्रवृत्त होऊं शकतें. मात्र क्रीडेला कामाचें स्वरूप कधींहि येऊं देऊं नये.

क्रीडेच्या वयांतून स्वार्थी उद्योगांच्या वयाचा उद्भव अगदीं नकळत होतो. या दुसऱ्या अवस्थेंतहि मुलाची प्रवृत्ति क्रियाशीलच असते. पण आतां त्याच्या हालचालींत सहेतुकतेची व व्यवहारीपणाची झांक मारूं लागते. ही नवीन प्रवृत्ति कांही अंशीं तंत्रात्मक व कांहीं अंशीं समाजाभिमुख असते. कांहीं अपवादात्मक उदाहरणें सोडून दिलीं तर या वयोमर्यादेमध्यें तात्त्विक अथवा कलात्मक विषयांची गोडी वाटूं शकत नाही. वयाच्या ७ व्या वर्षापासून १४ व्या वर्षापर्यंत शाळेनें मुलांच्या व्यवहारी व क्रियाशील प्रेरणांना पोषक अशी साधनसामग्री पुरविली पाहिजे. शाळेंतील कार्यक्रम आंखतांना मुलांच्या व्यवहारी, तंत्रात्मक व समाजाभिमुख प्रवृत्तींना भरपूर वाव तर दिलाच पाहिजे. परंतु हें करीत असतांना पुढच्या आयुष्यांत जो तात्त्विक व चिंतनप्रधान अभ्यास करावयाचा आहे त्याची पूर्वतयारीहि झाली पाहिजे. बहुतेक शाळांमध्यें दोन परस्परविरोधी खटपटी चाललेल्या आढळून येतात. हुशार विद्यार्थ्यांना कोवळ्या वयांत फार अभ्यास करावयास लाविलें जातें.

अशा मुलांचे अतिशिक्षित आईबाप या खटपटीला उत्तेजन देतात. त्यांना वाटतें कीं लवकर लवकर अभ्यास करून आपल्या मुलाने निरनिराळ्या क्षेत्रांत होणाऱ्या चढाओढींच्या परीक्षांत जास्तींत जास्त भाग घ्यावा. ही एक खटपट झाली. याच्या उलट सर्व मुलांवर एकसारखी शिस्त लादण्याची नोकरशाही खटपट सुद्धा बहुतेक शाळांत दिसून येते. सश्याला कासवाच्या चालीने चालविण्याचा हा प्रयत्न सर्वत्र केला जातो. या दोन्ही खटपटींत विद्यार्थ्यांच्या विकासाच्या वास्तविक अवस्थेची सारखीच उपेक्षा केली जाते.

आतां मी शिक्षणाच्या तिसऱ्या सामान्य तत्त्वाकडे वळतों.

आतांपर्यंत आपण ज्या दोन तत्त्वांचा विचार केला त्या तत्त्वांत आपण असें गृहीत धरलें आहे कीं शिक्षण म्हणजे अंतर्गत विकास आहे; बाहेरून केलेली जोडणी नव्हे. विद्यार्थ्यांचा वैयक्तिक मूळ स्वभाव आणि त्याच्या विकासाची विशिष्ट अवस्था यासंबंधी नमूद केलेलीं हीं दोन तत्त्वें आपणांस आठवत असतीलच. कोणत्याहि शिक्षणव्यवस्थेंत निरनिराळ्या प्रकारच्या शाळांची संघटना व वर्गवारी करतांना या दोन तत्त्वांना फार महत्त्व द्यावें लागेल. यापुढें जें तिसरें व चवथें तत्त्व मी आपणांसमोर मांडणार आहे त्यांचा संबंध शैक्षणिक क्रियेच्या परिणामाशी आहे. हीं तत्त्वें समग्रता आणि क्रियाशीलता अशा नांवांनी ओळखलीं जातात. मला वाटतें आज मला यापैकी फक्त पहिल्याच तत्त्वाचा–समग्रतेचा–थोडक्यांत समाचार घेण्याची सवड आहे. क्रियाशीलतेच्या शैक्षणिक तत्त्वाची चर्चा मी पुढील व्याख्यानांत करीन.

समग्रतेच्या तत्त्वानुसार शैक्षणिक क्रियेचा परिणाम विद्यार्थ्यांच्या समग्र चरित्रावर झाला पाहिजे. शैक्षणिक उपचारांचा रोख मनाच्या सर्वांगीण विकासाकडे असला पाहिजे; मनाच्या एखाद्याच अंगाचा अगर शक्तीचा विकास करण्याची मर्यादित मनीषा शिक्षणाने ठेवूं नये. पेस्टालोझी नामक महान् शिक्षकाने घसा कोरडा करून सर्वांना बजाविलें आहे कीं शैक्षणिक क्रियेमध्यें सजीव एकता असली पाहिजे. त्याच्या मतें शैक्षणिक क्रियेमध्यें मुलाच्या मूलभूत बौद्धिक, नैतिक आणि शारीरिक शक्तींचा एक समयावच्छेदेकरून विचार केला पाहिजे. किंवा सोप्या भाषेंत बोलायचें झाल्यास शिक्षणाद्वारें विद्यार्थ्यांच्या बुद्धीची, मनाची व शरीराची बरोबर वाढ झाली पाहिजे. आपल्या देशांत **गांधीजींनी** या शैक्षणिक तत्त्वाचें प्रतिपादन करण्याकरितां आपल्या महान् तपश्चर्येची सर्व पुण्याई खर्ची घातली. या समग्रतेच्या तत्त्वा-

बरोबर क्रियाशीलतेच्या तत्त्वालाहि गांधीजींनी पाठिंबा दिला. गांधीजींनी बालस्वभावाचें फार आपुलकीने व बारकाईने निरीक्षण केलें होतें. गांधीजी मुलांमध्यें मूल बनून अकृत्रिमपणें वावरूं शकत. मुलांचें अंगीं वसणाऱ्या सुप्त शक्तींची गांधीजींना चांगलीच जाणीव होती. त्यामुळेंच गांधीजींनी समग्रतेचें व क्रियाशीलतेचें शैक्षणिक महत्त्व ओळखलें. परंतु इतकें असूनहि सर्व जगभरच्या शाळांमध्यें आणि खुद्द आपल्या देशांतील लक्षावधि शाळांमध्यें देखील तेच ते पाठ्यक्रम अजूनहि चालू आहेत; जणू कांही गांधीजी व पेस्टालोझी जन्माला आले होते कीं नव्हते याची सुद्धा आमच्या शाळांना दखल नाहीं. अजूनहि विद्यार्थ्यांच्या डोक्यांत माहिती कोंबण्याची तीच धडपड सर्वत्र आढळून येते. विद्यार्थ्यांच्या केवळ बुद्धीची वाढ होऊन त्यांच्या हृदयांत मोठेपणाची घमेंड मूळ धरीत आहे. कारण शिक्षणाऐवजी माहिती देणें एवढेंच आपलें कर्तव्य आहे अशी शाळाचालकांची भावना बनलेली आहे. विद्यार्थ्याला एखादें कसब अथवा हुन्नर शिकविलें म्हणजे काम झालें. माणुसकीचे तथाकथित दुय्यम अथवा गौण गुण विद्यार्थ्यांत वाढीस लागले आहेत किंवा नाहींत या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जात आहे. या विचारसरणीचा अर्थ असाच होईल कीं शाळेने विद्यार्थ्याला फक्त लिहिण्याची कला शिकवावी, पुढे तो विद्यार्थी त्या कलेचा उपयोग एखादें अमर काव्य लिहिण्याकरितां करतो कीं काळ्याबाजाराकरितां खोटेनाटे दस्तैवज बनविण्याकरितां करतो याचा विधिनिषेध बाळगूं नये. शाळेने विद्यार्थ्याला वाचनाची कला शिकवावी; पुढे तो विद्यार्थी महाकाव्यें वाचतो की अश्लील चिटोरीं वाचतो याची काळजी शाळेने वाहूं नये. ज्या परीक्षेने विद्यार्थ्यांची खरीखुरी व भरवंशाची चांचणी होत नाही अशा एखाद्या परीक्षेकरितां विद्यार्थ्यांची ठाकठीक तयारी करून दिली म्हणजे शाळेची जबाबदारी संपली; मग पुढे तो विद्यार्थी प्रामाणिक व सत्यनिष्ठ बनला आहे कीं नाहीं, समाजांत सहकार्याने व सहानुभूतीने जगण्याची वृत्ति त्याने आत्मसात केली आहे कीं नाही, कलेंतील नि निसर्गांतील सौंदर्य त्याला आकर्षित करतें किंवा नाही, समष्टीच्या हिताकरिता स्वतःचे हितावर पाणी सोडण्यास तो कधीं तयार होतो कीं नाही, या गोष्टींकडे शाळेने लक्ष देऊं नये, अशी ही उफराटी विचारसरणी आजच्या शालेय शिक्षणाचे पाठीशी लपून बसली आहे. परंतु आपण केलेल्या व्याख्येनुसार, शिक्षणाचा संबंध केवळ व्यक्तीच्या एकटदुकट शक्तींशी नसून त्याच्या समग्र चारित्र्याशी आहे. निरनिराळें कसब तर मुलांना

शिकवायचेच असतात. परंतु त्याबरोबरच त्या कसबांचा उपयोग कोणत्या उद्दिष्टांकरितां करावा याचाहि विचार त्यांना शिकावयाचा असतो. शिक्षणानें विद्यार्थ्यांच्या समग्र चारित्र्याला आकार दिला पाहिजे. अर्थातच जी शाळा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व नैतिक विकासाचा प्रयत्न करीत असेल तिचें ध्येय सिद्ध होण्याकरितां तिने विद्यार्थ्यांच्या समग्र चारित्र्याची पकड घेतली पाहिजे. त्याच्या 'निष्ठा–उद्दिष्ट–छंद' रूपी समग्र जीवनाचें शाळेंत मंथन झालें पाहिजे. असा प्रयत्न शाळेंत जितका जास्त होईल तितक्या प्रमाणांत शाळेचा विद्यार्थ्यांच्या विकासावर समग्र परिणाम होईल. हा परिणाम सुलभतेने करण्या-करितां शाळा म्हणजे केवळ अध्यापनाचें केन्द्र राहून चालणार नाही; तर तेथे विद्यार्थ्यांचें सूक्ष्म निरीक्षण करून त्याचा स्वाभाविक कल हेरण्याचें नाजुक कामहि सतत करावें लागेल. निरनिराळ्या पद्धतींच्या शाळांकरितां शिक्षक तयार करतांना त्यांना विद्यार्थ्यांचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची दृष्टि दिली पाहिजे. त्यामुळें आपल्या विद्यार्थ्यांचे स्वभाव ओळखून त्यानुसार शिक्षणाचे संस्कार घडवून आणण्याची हातोटी त्यांच्या अंगवळणीं पडेल. परंतु ही गोष्ट केवळ शिकवून शिकतां येणार नाहीं. त्याकरितां शिक्षकांनी व त्यांच्या विद्या-र्थ्यांनी खेळाच्या पटांगणावर अथवा सहलीमध्यें आस्थेने, प्रेमाने व गुणग्राहकतेनें परस्परांच्या सहवासांत आलें पाहिजे; शाळेंत आणि शाळेबाहेरील कार्यांत व जीवनांत एकरसता निर्माण करून परस्परांना उपयोगी पडणारीं भरीव कामें केली पाहिजेत. त्यामुळें शिक्षकाला प्रत्येक विद्यार्थ्याचें वास्तविक कल्याण कशांत आहे याची ओळख पटूं शकते. जेव्हां शाळेच्या संघटनेंत विद्यार्थ्यांच्या विविध अभिरुचींना आणि विशिष्ट वयांतील विद्यार्थ्यांच्या सामान्य आवडींना योग्य तो वाव देण्याची व्यवस्था केली जाईल तेव्हांच या नवीन दृष्टीचा उपयोग त्या विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाकरितां होऊं शकेल.

मला वाटतें माझें भाषण आज मी येथेंच थांबवावें. कारण आतांपर्यंत आपणांस शिणविण्यांत मला पूर्ण यश आलें नसलें तर वेळेच्या अभावीं आतां तसा प्रयत्न करणें कठीण आहे. तो प्रयत्न उद्यां मी पुन्हा करून पाहीन.

आजच्या व्याख्यानाच्या प्रारंभी दोन गोष्टी मी जमेस धरणार आहें. त्याबद्दल आपण मला क्षमा कराल, अशी आशा आहे. या गोष्टी धरून चालण्यांत माझी मनचे मांडे खाणारी वृति आणि दुर्दम्य आशावाद तेवढा प्रकट होतो. मी असें धरून चालतों कीं माझें पहिलें व्याख्यान ऐकल्यानंतर पुन्हा दुसरें व्याख्यान ऐकण्यास येण्याचें धाडस आपल्यापैकीं कांही लोक तरी करीत आहेत. अशी आशा करणें म्हणजे खरोखर आपल्या सहनशक्तीचा व चिकाटीचा अंत पाहणेंच आहे. दुसरी गोष्ट मी जमेस धरून चालणार आहे ती तर अधिकच बिकट आहे; ती अशी कीं माझ्या मागच्या व्याख्यानांत मी काय सांगितलें हे आपणांस आठवत असेल. येथे मी आपल्या स्मृतीला चालना देऊं शकेन. शिक्षणाच्या स्वरूपासंबंधीचे माझे विचार मी आपणां समोर मांडले होते. त्यानंतर शिक्षणाच्या ह्या स्वरूपापासून ओघानेच प्राप्त होणाऱ्या कांहीं तत्त्वांची चर्चा मी सुरूं केली होती. प्रत्येक विद्यार्थ्याचें वेगळें व्यक्तिमत्त्व, या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची विशिष्ट अवस्था आणि शिक्षणाद्वारें ज्या चारित्र्याला आकार द्यावयाचा असतो त्याची सजीव एकता अथवा समग्रता या तीन महत्त्वपूर्ण तत्त्वांचें कांहींसें विस्तृत विवेचन मीं केलें होतें. आणि क्रियाशीलतेच्या तत्त्वाचा केवळ ओझरता उल्लेख केला होता. आजच्या माझ्या व्याख्यानाच्या प्रारंभीं ह्याच तत्त्वाचें विवेचन व स्पष्टीकरण करण्याचा माझा विचार आहे.

तसें पाहतां कोणत्याहि युगांतील कोणत्याहि शाळेंत विद्यार्थ्यानें स्वतः कांही ना कांही हालचाल केल्याशिवाय विद्यार्जन घडलें असें ऐकिवांत नाही. साधें लेखन, वाचन व आंकडेमोडीचे प्रारंभिक पाठ मान मोडेपर्यंत गिरवितांना आणि इतरांनी गोळा केलेल्या माहितीचें पोपटासारखें पाठांतर करीत असतांना सुद्धा विद्यार्थ्याला थोडीफार तरी बौद्धिक हालचाल करावी लागतच असे. अर्थात् ह्या हालचालीला अगर क्रियाशीलतेला दुसऱ्या कांहीं साध्याचें दुय्यम साधन एवढेंच स्थान होतें. क्रियाशीलतेला शिक्षणाचें एक महत्त्वाचें उद्दिष्ट लेखले गेले नाहीं. शैक्षणिक आचारविचारांत या तत्त्वाला मौलिक स्थान

प्राप्त करून देण्याचें श्रेय **पेस्टालोझी** नामक स्वित्झर्लॅण्ड मधील महान् शिक्षकाला द्यावें लागेल असें मला वाटतें. आता या तत्त्वाला जागतिक मान्यता प्राप्त झाली आहे, असे म्हणावयास हरकत नाहीं. परंतु आपल्याला रोजच्या अनुभवानें हें माहीतच असेल कीं तत्त्वाला मान्यता मिळाल्यानेच कित्येकदा त्याचा अपमृत्यु घडू शकतो. त्या तत्त्वाचे अतिउत्साही पाठीराखे शब्दांची पूजा करून अर्थाचा बळी देतात; आणि केवळ स्वतःच्या मतलबाकरितां तत्त्वांची तोंडपुजी प्रशंसा करणारे धूर्त लोक त्या तत्त्वाची अशी कांहीं ओढाताण करतात कीं त्याचें मूळ स्वरूप ओळखणें सुद्धां अवघड होऊन बसतें. त्यांच्या दृष्टीने कोणत्याहि तत्त्वाचा बोजवारा उडविण्याचा हाच सर्वांत सोपा उपाय आहे. "नामाचा जप करा, पण रूपाला हात लावूं नका" हाच त्यांचा परवलीचा चोरटा मंत्र असतो. खुद्द आपल्या देशांतहि अनेक चांगल्या तत्त्वांची अशाच प्रकारें गळचेपी झाली आहे. असो. क्रियाशीलतेच्या या तत्त्वाचा प्रसार युरोप व अमेरिकेतील शाळांत मागील शतकांत झाला. अर्थात तेव्हां क्रियाशीलतेला शाळेंतील इतर कार्यक्रमांच्या मानाने बहुधा अगदी गौण स्थान दिलें जाई. विद्यार्थ्यांकडून निर्बुद्ध घोकंपट्टी करवून घेणें हेंच शाळांचें प्रमुख कार्य असे. क्रियाशीलतेची माफक मात्रा देखील विद्यार्थ्यांवर एक प्रकारें लादलीच जात असे. शाळेंत प्रविष्ट होणाऱ्या लहान मुलाला सृष्टींतील घडामोडी समजून घेण्याची, त्यांच्यांतील कार्यकारण संबंध हेरण्याची, त्या घडामोडींत भाग घेण्याची, त्याद्वारें कांहीं इष्ट कार्य साधण्याची आणि अशा प्रकारें आपल्या आवडीनिवडीनुसार कांहींतरी स्वच्छंदपणें करीत राहण्याची मनस्वी ओढ लागलेली असते. ही गोष्ट तत्कालीन शिक्षणतज्ज्ञांनी पूर्णपणें मान्य केली नव्हती. शिक्षण म्हणजे मनावर बाहेरून लादलेले संस्कार अथवा अलंकार नसून विद्यार्थी मनापासून जें आत्मसात करतो त्यालाच वास्तविक अर्थानें शिक्षण हें नांव देतां येईल ही गोष्ट मान्य करणें शिक्षणाधिकाऱ्यांना अजून सुद्धा जड जातें. परंतु नेमकी हीच गोष्ट **पेस्टालोझीला** अभिप्रेत होती. **पॉल नातोर्प** नांवाच्या **पेस्टालोझीच्या** एका विख्यात व विचारवंत चरित्रलेखकाने क्रियाशीलतेच्या तत्त्वाला 'स्वयंप्रेरणेचें तत्त्व' असे नांव दिलें आहे.

अलिकडे शिक्षणविषयक विचारसरणीचा ओघ उलट दिशेनें वाहूं लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. पुस्तकी ज्ञानाऐवजी क्रियाशील ज्ञानाला अधिक महत्त्व देण्याची अथवा शाळेला "सहकारी समिति" समजण्याची प्रवृत्ति

आढळूं लागली आहे. ही प्रवृत्ति वस्तुतः हितकर आहे. परंतु कित्येकदा या हितकर प्रवृत्तीचा अतिरेक होत असल्याचीं उदाहरणेंहि आढळून येत आहेत. मी माझा स्वतःचा अनुभव सांगतों. बुनियादी शाळांतील शिक्षण एखाद्या व्यवसायाभोवती विणलेलें असतें, असें समजलें जातें. पण मी अशा बुनियादी शाळा पाहिल्या आहेत कीं जेथें व्यवसायाचा अगर उद्योगाचा मागमूसहि आढळून येत नाहीं. त्याचप्रमाणें क्रियाशीलता व व्यवसाय हा शालेय शिक्षणाचा प्राण असल्यामुळे आपल्या शाळेंत सर्व प्रकारच्या पुस्तकांवर बंदी आहे असें अत्यंत तळमळीने व कांहीशा अभिमानाने सांगणारे बुनियादी शिक्षकहि मला भेटले आहेत. अशा प्रसंगीं मी जास्त खोलांत शिरलों नाहीं व त्यांच्या शाळेंत कोणते धंदे शिकविले जातात याची विचारपूस केली नाहीं हें मी कबूल करतों. या माझ्या समजूतदारपणाबद्दल आपण मला बोल लावणार नाहीं, अशी मला आशा आहे. अशाच थाटाचें आणखी एक उदाहरण मला माहीत आहे. एका विख्यात जर्मन शिक्षणतज्ज्ञाने पहिल्या जागतिक महायुद्धानंतरच्या काळांत शिक्षणक्षेत्रांत मोठमोठे प्रयोग चालू असतांना स्वतःच्या शाळेंतील प्रयोगासंबंधाने पुढील उद्गार काढले होतेः "माझ्या शाळेंतील विद्यार्थिनीच सर्व कांहीं करतात. शालेय जीवनांत शिक्षकांना काडीचेंहि स्थान नाहीं. शिक्षणाच्या सर्व अवस्थांमध्यें केवळ स्वयंस्फूर्त क्रियाशीलतेचाच आविष्कार झाला पाहिजे, असा माझा आग्रह आहे. शिक्षणाचीं उद्दिष्टें ठरविणें, शाळेंतील पाठ्यक्रम नेमून देणें, नेमलेल्या क्रमानुसार अभ्यास चालला आहे कीं नाहीं याविषयीं दक्षता बाळगणें, विविध गुंतागुंतीच्या प्रसंगीं निर्णय करणें, प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका तपासणें, परीक्षांचे निकाल लाविणें, यासारख्या सर्व महत्त्वाच्या बाबी मी पूर्णपणें माझ्या विद्यार्थिनींवर सोंपवितों." परंतु माझ्या मतें वीरश्रीच्या आवेशांत ही अतिशयोक्तीची भाषा शोभून दिसली तरी खुऱ्याखुऱ्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या विकासाकरितां बरेंच मार्गदर्शन आवश्यक असतें हें विसरून चालणार नाहीं. ज्या शाळेंत कोणत्याहि प्रकारचें मार्गदर्शन नाहीं व कोणाचाहि वचक नाहीं ती शाळा म्हणजे केवळ हास्यास्पदच नव्हे तर निष्फळ खटाटोप ठरण्याचा संभव आहे. जगांतील सारी स्वयंस्फूर्ति एकवटली तरी केवळ कोळयाप्रमाणे स्वतःभोंवती जाळें विणीत राहिल्याने व्यक्तीचा शैक्षणिक विकास कधींहि होऊं शकणार नाहीं. व्यक्तीचें ठायीं वसणाऱ्या सुप्त शक्तींना प्रकट रूप द्यावयाचें असल्यास समाजाचें आणि समाजाने निर्माण केलेल्या संस्कृतीचें साहाय्य घेण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

समाजाशी व संस्कृतीशी सावकाश व सावध संपर्क स्थापन करून त्यांच्या गर्भी वसणारें ज्ञानकण आपल्या रुचिनुसार तन्मयवृत्तीने टिपून घेण्याच्या क्रियेंतूनच व्यक्तीला आपल्या सुप्त शक्तींची ओळख पटूं शकते. बालकाचें ठायीं वसणाऱ्या स्वयंस्फूर्त व सृजनशील प्रवृत्तींची मशागत व जोपासना करीत असतांना भूतकाळांतील अनुभवांचा व अनुष्ठानांचा खतपाण्यासारखा वापर केला पाहिजे.

या क्षणीं मला असें वाटतें कीं स्वयंस्फूर्त क्रियाशीलतेच्या कल्पनेसंबंधी अतिरेक अथवा अपसमज कसा केला जाऊं शकतो हें सांगण्याला सुरुवात करण्याची मी थोडी घाई केली. स्वयंस्फूर्त क्रियाशीलतेच्या शैक्षणिक तत्त्वाचा मी स्वतः काय अर्थ करतो हे मी आधीं स्पष्ट करावयास हवें होते.

या संदर्भांत चार प्रकारच्या क्रिया माझ्या डोळ्यासमोर उभ्या राहतात. मनोरंजक क्रीडा, स्पर्धायुक्त खेळ, नैमित्तिक व्यवसाय व नित्याचा उद्योग. मनोरंजक क्रीडा ही केवळ क्रीडेकरतांच असते, त्यांत दुसरें कांहींच साधायचें नसतें. मनोरंजन हाच तिचा उद्देश असतो. ह्या क्रीडेद्वारें बालकाला बाहेरच्या जगांतील कांही फळ मिळवायचें नसतें अगर बालकाच्या अंगींच्या कोणत्याहि गुणाचा विकास करावयाचा नसतो. क्रीडा हेंच क्रीडेचें फळ आहे. जेव्हां बालमनाची केवळ कल्पनाविहाराची अवस्था संपून त्यांत उद्दिष्टांचे अंधुक तरंग उमटूं लागतात तेव्हां सुद्धा तीं उद्दिष्टें बाह्य सृष्टींत अवतरलींच पाहिजेत असा त्याचा आग्रह नसतो. क्रीडाशील बालकाची कल्पनाशक्ति सृष्टीच्या नियमांना सहज झुगारून देते. बालकाच्या कल्पनासृष्टींत कोणतीहि वस्तु दुसऱ्या कोणत्याहि वस्तूचें काम चालवूं शकते. उदाहरणार्थ, मूल स्वतः मास्तर बनून आईला विद्यार्थी बनवूं शकतें, आणि आगकाडीचा उपयोग मास्तरांच्या छडीप्रमाणे केला जाऊं शकतो. ह्या साऱ्या काल्पनिक वस्तू आपलें नियोजित कार्य उत्तम प्रकारें पार पाडतात आणि मूल त्यांत रमून जातें.

स्पर्धायुक्त खेळ ही मनोरंजक क्रीडेच्या पुढची पायरी आहे. त्यांतील उद्दिष्ट स्पष्ट असतें. शरीराच्या हालचाली अधिक चपलतेने करून प्राविण्य मिळविणें हा खेळांतील उद्देश असतो. परंतु खेळांत सुद्धा इतर बाह्य उद्देश कांहींच नसतो. अजिंक्यपद मिळविणें अगर उच्चांकाचा विक्रम करणें हीच खेळाचीं उद्दिष्टें असूं शकतात. पैसे मिळविण्याकरिता जर कोणी खेळूं लागला तर त्या खेळाला धंद्याचें रूप प्राप्त होईल, आणि शरीरबळ कमविण्याकरिता जर कोणी खेळ खेळूं लागला तर खेळाला व्यायामाचें रूप प्राप्त होईल.

क्रीडा व खेळ या दोन क्रिया वगळल्या तर नैमित्तिक व्यवसाय व नित्याचा उद्योग या दोन्ही क्रियांमध्यें स्पष्ट व निश्चित उद्देश असतात, आणि ते उद्देश बाह्य सृष्टींत साध्य करून घ्यायचे असतात. या दोन्ही क्रिया स्वावलंबी अगर स्वतःसिद्ध नसतात. या क्रियांच्या द्वारें संकल्पित उद्दिष्टांना बाह्य सृष्टींत साकार रूप द्यायचें असतें. नैमित्तिक व्यवसायांत अगर हौशीच्या कामांत फळाइतकेंच कर्मालाहि महत्त्व असतें. हौशीखातर आपण जें काम करतों तें अगदीं अव्वल दर्जाचें झालें पाहिजे अशी आपली अपेक्षा नसते. त्या कामांत गोडी वाटेनाशी झाली म्हणजे आपण त्याचा नाद सोडून देतों; किंवा त्या कामांत आपणास थोडेंफार यश आलें म्हणजे आपला त्याविषयींचा हुरूप ओसरतो. ज्या कृतींचा आरंभ हौशीपायीं होतो आणि केवळ नैमित्तिक व्यवसाय म्हणूनच ज्यांच्याकडे पाहिलें जातें त्या कृतींमधूनच कलावंतांची निपज होते. मात्र शिक्षणाचा उद्देश केवळ हौशी कलावंत निर्माण करणें हा नसून विद्यार्थ्यांतील स्वाभाविक क्रियाशीलतेला नित्याच्या उद्योगापर्यंत प्रगत करणें हा आहे.

येथें मी आपला कांहीं अधिक वेळ घेणार आहे. उद्योग हें शिक्षणाचें एकमेव नसलें तरी निदान सर्वांत महत्त्वाच्या साधनांपैकीं एक साधन आहे हें मी कांहीशा विस्तारानें सांगणार आहे. 'सर्वांत महत्त्वाचें साधन' हे शब्द सुद्धा आपणांस फाजिल अतिशयोक्तीचे वाटण्याचा संभव आहे. परंतु त्यामुळें एक मोठें काम होईल. उद्योगाला मी शिक्षणाचें साधन मानतों हें आपल्या लक्षांत येईल; आणि सर्वच उद्योगांना मी सरसहा शिक्षण म्हणतों असा गैरसमज होणार नाहीं. आपल्या देशांतील बहुसंख्य लोकांना अतोनात काबाडकष्ट करावे लागतात. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं केवळ सततोद्योगामुळें अथवा काबाडकष्टांमुळें ते सर्वच लोक सुशिक्षित आहेत असें म्हणतां येणार नाहीं. अर्थात् फसव्या पुस्तकी पोपटपंचीमुळें स्वतःला सुशिक्षित समजणाऱ्या बहुतेक लोकांपेक्षा कित्येक अडाणी व कष्टाळू लोक अधिक सुसंस्कृत असतात ही गोष्टहि तितकीच खरी. असो. सांगण्याचा मतितार्थ असा कीं उद्योग हें शिक्षणाचें सर्वांत महत्त्वाचें साधन असलें तरी सर्वच उद्योगांना शैक्षणिक महत्त्व नाहीं. या माझ्या विधानांत कोणाला विसंगतीचा भास होईल. म्हणून शिक्षणदायी उद्योग कशाला म्हणायचे, कोणत्या उद्योगामुळें मनाच्या विकासाला मदत होते आणि चारित्र्याला व व्यक्तिमत्त्वाला घडण मिळते यासंबंधीचीं माझीं मतें विशद करूण सांगणें अवश्य आहे.

पहिल्या प्रथम एक गोष्ट आपण स्पष्टपणें समजून घेतली पाहिजे कीं शारीरिक परिश्रमाचें काम कितीहि उत्सुकतेने, आवडीने व लक्ष देऊन केलेलें असलें तरी त्याच्या मुळाशी कांहीं बौद्धिक पूर्वतयारी नसल्यास त्या उद्योगाचें शैक्षणिक महत्त्व शून्य म्हणावें लागेल. बौद्धिक चालना ही शैक्षणिक उद्योगाची अनिवार्य अशी पहिली पायरी आहे. ज्या उद्योगांत अशी बौद्धिक पूर्वतयारी आवश्यक असते त्या उद्योगांचा उपयोग शिक्षणाकरितां केला जाऊं शकतो. आधी आंखलेल्या बौद्धिक योजनेंत कामाच्या अधिकाधिक अनुभवानुसार फेरफार अथवा सुधारणा केली जाऊं शकते; परंतु कोणत्याहि शैक्षणिक उद्योगाच्या आरंभीं कांही ना कांही बौद्धिक योजना असलीच पाहिजे. डोक्याला कांहीहि शीण न देतां केवळ यंत्रासारखें काम केल्याने काडीचाहि शैक्षणिक लाभ होऊं शकणार नाहीं. केवळ आंधळया अनुकरणाने सुद्धा शिक्षणाला कांही हातभार लागूं शकत नाहीं. आपण कशाचें अनुकरण कां करीत आहोंत याची नीट कल्पना नसेल तर तें अनुकरण यांत्रिकच ठरेल.

शैक्षणिक उद्योगाच्या साधारणपणें चार पायऱ्या असतात: (१) काय करायचें आहे याची निश्चित व स्पष्ट कल्पना; (२) कामाची योजना, साधनांची निवड व कामाचे टप्पे; (३) प्रत्यक्ष परिश्रम; (४) केलेल्या कामाची योजिलेल्या उद्दिष्टाच्या कसोटीवर सडेतोड चांचणी. यांनाच 'वास्तवीकरणाच्या चार पायऱ्या' असेंहि नांव देण्यांत आलें आहे.

शैक्षणिक उद्योगांत वरीलपैकीं प्रत्यक्ष परिश्रमाची तिसरी पायरीच काय ती शारीरिक चलनवलनाची आहे; बाकीच्या तिन्ही पायऱ्या बौद्धिक स्वरूपाच्या आहेत. प्रत्यक्ष परिश्रम करतांना, अथवा सदसद्विवेक करतांना अथवा तात्त्विक प्रमेयें सोडवितांना जी बौद्धिक कसरत करावी लागते तिचा मनाच्या विकासास फार उपयोग होतो. भावी आयुष्यांत तसले प्रश्न सोडविणें सोपें जातें व मनाचा आत्मविश्वास बळावतो. त्यामुळे मनाला तर्कशुद्ध विचार करण्याचें वळण लागतें. साऱ्या शिक्षणाचें सारसर्वस्व जरी यांत सांठविलेलें नसलें तरी शिक्षणाच्या प्रगतींतील ही एक फार मोठी पायरी आहे. विचारसरणीचा विकास हा झालाच पाहिजे. बाळपणीं आपण ज्या पातळीवर विचार करतों त्याच पातळीवरून प्रौढपणींहि विचार करणें इष्ट नाहीं. लहान मूल आपल्या परीने विचार करीतच असतें व आपल्याला येणाऱ्या वाढत्या अनुभवांचा कांही ना कांही अर्थ लावीतच असतें. वाचा फुटण्यापूर्वी आणि

वस्तूंच्या व कल्पनांच्या शाब्दिक खुणा ओळखूं लागण्यापूर्वी देखील लहान मूल आपल्या अल्पबुद्धिनुसार वस्तूंची तुलना करून त्यांच्यांतील सारखेपणा व वेगळे-पणा शोधून काढण्याचा प्रयत्न करीत असतें. ही आपली सहजस्फूर्त धडपड कशाकरितां चालू आहे याची जेव्हां त्याला जाणीव होते तेव्हांच त्याला साध्य व साधन यांच्यांतील भेद समजूं लागतो. केवळ साध्य-साधन संबंध समजून त्याचें समाधान होत नाहीं; तर पुढें कार्य व कारण, आंतर व बाह्य, अंश व पूर्ण, इत्यादि संबंधांचें गूढ उकलण्याचें कुतुहलहि त्याच्या ठायीं निर्माण होतें. आपल्या अनुभवाच्या आधारावर कल्पिलेले हे संबंध त्रिकालाबाधित आहेत कीं नाहींत, या किंवा असल्या प्रकारच्या शंकाकुशंका बालमनाला सतावीत नाहींत. त्याच्या मनांत काय, कोठें, कां, कशाला, आदि प्रश्नांचा जो ससेमिरा सुरू असतो त्याचें तात्पुरतें समाधान अगदीं तुटपुंज्या उत्तरांनी सुद्धा होऊं शकतें. त्याला कांही ना कांहीं उत्तर हवें असतें; कारण आपल्या अनुभवांचा कांहीतरी अर्थ लाविण्याची त्याची धडपड सतत चालूं असते. लहान मूल स्वतःचीं मतें बन-वीत असतें व त्यापासून कांही निष्कर्ष काढीत असतें. हे निष्कर्ष बरोबर किंवा योग्य आहेत कीं नाहींत हें तपासून पाहण्याची त्याला घाई नसते. लहान मुलाच्या विचार करण्याच्या पद्धतीला अजून वळण लागलेलें नसतें. तिला अधिक तर्क-शुद्ध व सत्यशोधक बनवायची असते.

हा झाला विचारसरणीचा एक प्रकार. त्यांत मानवी बुद्धि सृष्टींतील घटनांचा अर्थ लावीत असते. यापेक्षा निराळी अशी एक विचारपद्धति आहे. तिचा प्रयोग गणितशास्त्रांत व तर्कशास्त्रांत होतो. या विषयांतील प्रमेयें कांही स्वयंसिद्ध सिद्धांतांच्या आधारें सोडवायचीं असतात. या दोन्ही शास्त्रांच्या विषयांचा बाह्य सृष्टीशी कांहीं संबंध नसतो; त्यांचे संकेत मानवी मनानें निर्माण केलेले व म्हणूनच असंदिग्ध असतात व त्यांचीं मूलतत्त्वें स्वयंसिद्ध असतात.

परंतु गणित अथवा तर्कशास्त्रासारखीं कांही शास्त्रें वगळलीं तर ज्ञानाच्या इतर क्षेत्रांत माणसाचा संबंध केवळ मनोनिर्मित संकेतांशी न येतां बाह्य सृष्टींतील घडामोडींशी येतो. या घडामोडी अनेकविध असतात व त्यांचा अनुभव माणसाला हळूहळूं येत असतो. या घडामोडींचा उपयोग आपल्या हिताकरितां करून घ्यायचा असेल तर त्यांचा परस्पर संबंध समजून घेतला पाहिजे. त्याकरितां तर्कशुद्ध विचारशक्तीचा विकास झाला पाहिजे. वस्तूंमधील

सारखेपणा व वेगळेपणा ओळखूनच भागणार नाहीं तर त्यांच्या संयोग-वियोगाचे परिणामहि अचूकपणें हेरतां आले पाहिजेत. त्याकरतां बुद्धीला वस्तुनिष्ठ विचार करण्याचें वळण लागलें पाहिजे. कोणत्याहि तुटपुंज्या उत्तराने खूष होणाऱ्या बालिश विचारसरणीचा विकास करून तिला तर्कशुद्ध बनविणें अगत्याचें आहे. कारण माणसाच्या बुद्धीला अखेरीस कांहीं ना कांही वळण लागणारच. तिला तर्कशुद्ध बनविलें नाहीं तर ती उथळ, उतावळी व धांदरट बनल्याशिवाय राहणार नाही. एखाद्या सिद्धांताची सत्यासत्यता पडताळून पाहीपर्यंत त्यासंबंधी निश्चित मत न देण्याची वृत्ति अंगीं बाणली नाही तर पुढे सहज फसविला जाणारा भोळसर माणूस अथवा फाजील शंकेखोर व्यक्ति निर्माण होईल. कोणत्याहि प्रश्नाचा सावधपणाने, सातत्याने व साकल्याने विचार करण्याचा गुण वाढीस लावायचा असेल तर तसा विचार करण्याची संधि मुलांना वारंवार दिली गेली पाहिजे. या बौद्धिक कसरतीकडे दुर्लक्ष होऊं शकते. हल्लीच्या पुस्तकी शाळांतून या बौद्धिक कसरतीकडे दुर्लक्ष केलें जात आहे. शाळांच्या कागदी कार्यक्रमांत पुस्तकें अथवा उद्योग यांपैकी कोणत्याहि गोष्टीवर भर दिलेला असला तरी जोंपर्यंत वरील बौद्धिक कसरतीची भरपूर व्यवस्था तेथें होत नाहीं तोपर्यंत तिला शिक्षणसंस्था हें नांव शोभून दिसणार नाही.

या अत्यंत आवश्यक अशा बौद्धिक व्यायामाचो व्यवस्था करणें ही आपली सर्वांत महत्त्वाची जबाबदारी आहे. याची जाणीव आजकाल बहुधा कोणत्याच शाळेला नाही—मग ती शाळा पुस्तकी असो वा उद्योगी. आपणांपैकी पुष्कळ जण शिक्षण संस्थांमध्यें काम करीत असाल. आपणांस कदाचित माझी मतें ऐकून धक्का बसेल. माझें हें मत मी पूर्वींच प्रतिपादन केलें आहे. तेंच मी पुन्हा एकदा अधिक स्पष्ट करून मांडतों. माहिती, हुन्नर अगर कलाकौशल्य म्हणजेच शिक्षण असें समीकरण मांडणें चुकीचें आहे. या माझ्या विधानामुळे आपणांस धक्का बसला तरी हरकत नाहीं; कारण हीच गोष्ट मला आग्रहाने सांगायची आहे. केवळ माहिती अथवा हुन्नर यांच्या आधाराने एखाद्या व्यक्तीच्या शिक्षणाचें निश्चित मोजमाप करणें सुद्धा कठीण आहे. त्यांचा तसा उपयोग करण्यापूर्वी आपणास कांही गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. ज्ञान दोन प्रकारचें असूं शकतें ही गोष्ट आपण ताबडतोब मान्य कराल. दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने तपश्चर्या करून मिळविलेलें ज्ञान कर्णोपकर्णीं माहितीच्या रूपाने आपल्या पर्यंत पोहचतें. हा झाला ज्ञानाचा पहिला प्रकार. याशिवाय

आपण आपल्या अनुभवाच्या आधाराने व आपल्या तपश्चर्येने कांही ज्ञान प्राप्त करूं शकतो. अशाच तऱ्हेने हुन्नराचे किंवा कलाकौशल्याचे दोन प्रकार पाडतां येतील. आधींपासून उपलब्ध असलेल्या कित्याचें पुनःपुन्हा अनुकरण करून निर्माण होणारें यांत्रिक कौशल्य; आणि नवीन नमुने निर्माण करूं पाहणारें स्वयं-प्रेरित प्रावीण्य. दुसऱ्या प्रकारचें ज्ञान व कौशल्य आंतून वाढलेलें असतें. पहिलें अनुषंगिक आहे तर दुसरें अंतर्गत विकासाचें व परिवर्तनाचें प्रतीक आहे. पहिल्याला पढविणें म्हणतां येईल पण दुसऱ्याला वास्तविक अर्थानें शिकविणें म्हणतां येईल. पहिल्या प्रकारानें बहिरंगाला उजाळा मिळतो तर दुसऱ्या प्रकारांत आंतरिक संस्कार घडतात. कांही शाळांतून पहिल्या प्रकारचे पाठ मिळतात तर कांहींतून दुसऱ्या प्रकारचें शिक्षण मिळतें. ज्या प्रकारची बौद्धिक कसरत स्वखुषीने केल्याने सूक्ष्म व सर्वांगीण विचार करण्याची सवय लागते अशा कसरतीची हेळसांड करणारी शाळा पहिल्या वर्गांत मोडेल व तिची तरतूद करणारी शाळा दुसऱ्या वर्गांत समाविष्ट होईल.

आपणांस आठवत असेल कीं स्वयंप्रेरित क्रियाशीलतेच्या या चौथ्या तत्त्वाची चर्चा सुरुं करतांनाच याची अतिशयोक्ति केली जाऊं शकते असा इशारा मी दिला होता. शाळेंत केवळ स्वयंप्रेरित क्रियाशीलतेलाच वाव देण्यांत यावा आणि परंपरागत ज्ञान व यांत्रिक कौशल्यावर बहिष्कार घालण्यांत यावा असा हट्ट धरणें हें फाजील अतिशयोक्तीचें द्योतक आहे. हा हट्ट चुकीचा आहे. कारण अखेरीस प्रत्येक मूल हें सुसंस्कृत समाजवृक्षाला लागलेलें फळ आहे, या गोष्टीकडे काणाडोळा करून चालणार नाहीं. परंपरागत ज्ञान व यांत्रिक कौशल्यापासून पुष्टि प्राप्त करूनच माणसांतील स्वयंप्रेरित क्रियाशीलतेचा विकास होऊं शकतो. स्वयंप्रेरित क्रियाशीलतेच्या आकर्षणानें माणूस कितीहि भारावून गेला तरी परंपरागत ज्ञानाच्या व कौशल्याच्या सामाजिक संचयापासून जर तो विन्मुख राहिला तर त्याची कर्तबगारी लंगडी पडेल. बाराखड्या गिरविल्या-खेरीज व पाढे पाठ केल्याशिवाय विद्यार्थ्यांची प्रगति होऊं शकणार नाही. अर्थात परंपरागत ज्ञानाला व कौशल्याला शिक्षणांत महत्त्वाचें स्थान आहे. परंतु त्याचा उपयोग स्वयंप्रेरित ज्ञानलालसेच्या अथवा प्रावीण्य-संपादनाच्या प्रवृत्तीला पोषक व पूरक झाला पाहिजे. स्वयंप्रेरित उद्योगाचें खरें शिक्षण देतांना परंपरागत ज्ञानकौशल्याची उपेक्षा करून चालणार नाहीं.

या ठिकाणीं मी आणखी एक महत्त्वाची व अनिवार्य समस्या आपणांसमोर

अनुक्रम ...२०८०....... दि. २...
क्रमांक ...२३०५....... नों. दि. ३...



मांडतों. उद्योगाच्या शैक्षणिक महत्त्वाचें वर्णन मी केलें आहे. अशा उद्योगामुळें विद्यार्थ्याला सूक्ष्म व तर्कशुद्ध विचार करण्याची मौलिक संधि प्राप्त होते; व त्याच्यांतील विचार करण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीला वळण व शिस्त लागते असा दावा मी केला आहे. परंतु ज्या उद्योगामुळे विद्यार्थ्यांत अशा प्रकारचें बुद्धिचातुर्य वाढीस लागेल त्या उद्योगाला संपूर्ण अर्थानें शिक्षण म्हणतां येईल काय ? या प्रश्नाचें उत्तर मी "होय" म्हणून देऊं शकत नाही. ज्ञान, कौशल्य आदि गुण स्वत: संपादन केले असले आणि त्यांचा उपयोग समाजाच्या नि:स्वार्थ सेवेकरितां केला जाऊं शकला तरच त्या गुणांना वास्तविक अर्थानें शिक्षण असें नांव देतां येईल. तर्कशुद्ध विचार करण्याची हातोटी जर एखाद्या स्वार्थी मनुष्याच्या ठायीं निर्माण झाली तर तिचा काय उपयोग ? जो माणूस स्वार्थाचें कवच फोडून बाहेर पडला नाही, ज्याला उदात्त कल्पनांचें दर्शन घडलें नाहीं, ज्याच्या मनाला नि:स्वार्थ आदर्शांची ओढ लागलेली नाहीं आणि ज्याचें हृदय प्रेमाच्या अमृतानें ओथंबलें नाहीं अशा संकुचित वृत्तीच्या माणसाच्या हातीं तर्कशुद्ध बुद्धीचें कोलीत सांपडून काय लाभ होणार आहे ? अशा माणसाच्या हातीं हें हत्यार सांपडलें तर त्याचा उपयोग समाजविरोधी गुन्हे करण्याकरितां सुद्धा केला जाऊं शकतो. सांस्कृतिक उपकरणांसंबंधी व व्यक्तिनिरपेक्ष सामाजिक आदर्शांसंबंधी नितांत आदराची भावना निर्माण झाली असेल तरच तो माणूस सुशिक्षित आहे असें म्हणतां येईल. अशी भावना निर्माण करणें हाच सर्व पाठशाळांचा व विद्यालयांचा अंतिम उद्देश असला पाहिजे. **केर्श्चेनस्टीनरचें** नांव आतां आपल्या ओळखीचें झालें आहे. त्यानें आपल्या Begriff der Arbeitschule नामक ग्रंथांत नमूद केलें आहे कीं खऱ्याखुऱ्या सुशिक्षित माणसांत पुढील पांच खाणाखुणा प्रकट होतात. या खाणाखुणा मी माझ्या भाषेंत आपणासमोर मांडतों :

(१) वस्तूंची व व्यक्तींची किंमत ठरवितांना सुशिक्षित माणूस व्यापक बुद्धीनें विचार करतो. त्याच्या डोळयांवर कोणत्याहि प्रकारचीं झापडें लाविलेलीं नसतात.

(२) त्याच्या मनांत एक प्रकारचा जिवंत मोकळेपणा असतो. नवीन कल्पनांचें व मूल्यांचें स्वागत करण्यास तो तयार असतो. त्याच्या ठायीं सनातनी क्षुद्र वृत्ति वास करीत नाहीं.

(३) नैतिक विकासाची त्याला आंतरिक ओढ लागलेली असते. स्वत:ची

व सकल जगताची पूर्णत्वाच्या दिशेने प्रगति व्हावी असा प्रयत्न तो सतत करीत असतो. आपले हात स्वर्गाला पोहचले आहेत अशी स्वतःची फसवणूक तो कधीहि करून घेत नाहीं.

(४) धर्मवेड्या प्रचारकांत अगर निर्बुद्ध नोकरशहांत एक प्रकारचा ताठर हेकेखोरपणा असतो. उलटपक्षीं सुशिक्षित माणूस वस्तूंचें मूल्यमापन करतांना सर्व साधकबाधक गोष्टींचा चिकित्सकपणें विचार करतो. त्यानें आपल्या अंगावर गेंडयाचें कातडें पांघरलेलें नसतें.

(५) निःस्वार्थ सामाजिक मूल्यांच्या निकषावर तो प्रत्येक गोष्टीची किंमत ठरवीत असल्यामुळे त्याच्या सर्व आचार, विचार व भावनांतून एकाच आत्मिक चिंतनसूत्राचा आविष्कार सतत होत असतो. अनेक व्यसनांनी पोखरलेला, अनेक लटपटी-खटपटी करणारा माणूस सुशिक्षित आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

**केर्शेनस्टीनरने** अगदी सूत्रात्मक शब्दांत शिक्षणाची संक्षिप्त व्याख्या केली आहे. "शिक्षण म्हणजे सांस्कृतिक उपकरणांच्या साहाय्याने व्यक्तीच्या ठायीं जागृत झालेली निष्ठा-परंपरा" अशी त्याची व्याख्या आहे. या व्याख्येंत सांस्कृतिक उपकरणांवर मुख्य भर दिला आहे, ही गोष्ट आपल्या लक्षांत येईल. कारण सांस्कृतिक उपकरणांतच निःस्वार्थ सामाजिक मूल्यांचा संचार व संचय झालेला असतो. या सांस्कृतिक उपकरणांच्या द्वारें वाढत्या मनाला वस्तुनिष्ठ अथवा निःस्वार्थ सामाजिक मूल्यांचें दर्शन घडतें आणि समाजाच्या संस्कृतींत सुप्त रूपाने वास करणाऱ्या चैतन्याला व्यक्तीच्या हृदयांत वेगवान गति प्राप्त होते. आपल्या व्यक्तिगत सुखदुःखांना गौण समजून सामाजिक मूल्यांची सेवा करण्याच्या वृत्तीलाच वस्तुनिष्ठ अथवा निःस्वार्थ म्हणून गौरवितां येईल. तात्पर्य काय कीं "ज्या उद्योगांच्या द्वारें माणूस आपल्या हाताने अगर आपल्या मनाने कांही तरी सामाजिक उपयुक्ततेची वस्तु निर्माण करतो त्या सर्व उद्योगांना शैक्षणिक उद्योग म्हणून संबोधतां येईल." वस्तुनिष्ठा अथवा निःस्वार्थता हीच नैतिकता आहे, असें म्हटलें जातें तें योग्यच आहे. आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी बाजूस सारून सामाजिक आदर्शांना शिरोधार्य मानणाऱ्या माणसालाच सच्चरित्र समजलें जातें ना ? या वस्तुनिष्ठ वृत्तींतूनच सामाजिक मूल्यांच्या संपूर्ण आविष्काराची अविरत तळमळ प्रकट होते. वस्तुनिष्ठा म्हणजेच व्यक्तिनिरपेक्षता होय.

ही वस्तुनिष्ठ क्रियाशीलता अथवा निष्काम कर्मवृत्ति माणसाच्या अंगीं कशी बाणते ? खऱ्याखुऱ्या शिक्षणाचा आरंभ कसा होतो ? आपणांस कदाचित आठवत असेल की प्रस्तुत चर्चेच्या सुरुवातीला आपण क्रियाशीलतेचे चार प्रकार पाहिले होते. क्रीड़ा, खेळ, नैमित्तिक व्यवसाय आणि नित्याचा उद्योग. या प्रत्येक प्रकारांत माणसाला बरे-वाईट अनुभव येतात, आणि त्याच्या अंगांतील कांही गुणांचा विकास होतो. परंतु या चार प्रकारांचें सविस्तर वर्णन आपणांस आठवत असेल तर आपण माझें म्हणणें मान्य कराल कीं यांपैकी केवळ नित्याच्या उद्योगाचा उपयोग कांहीं विशिष्ट परिस्थितींत शिक्षणाकरितां केला जाऊं शकतो. कारण नित्याच्या उद्योगांतच माणूस जास्तींत जास्त पारंगत होण्याचा प्रयत्न करतो. अर्धवट, निष्काळजी व अव्यवस्थित उद्योगांपासून इतर लाभ कांहीहि असले तरी त्यांचा उपयोग शिक्षणाकरितां केला जाऊं शकत नाहीं. निर्दोष कर्म, प्रावीण्य अथवा पूर्णता हा सुद्धा एक उच्च आदर्श आहे. कांहीं उद्योगांत आदर्श आचरण्यास अधिक वाव असतो. ज्या उद्योगांच्या फलांची तुलना व चिकित्सा करणें सुलभ असतें त्या उद्योगांत पूर्णता प्राप्त करण्याला अधिक वाव असतो. उदाहरणार्थ, हस्तकौशल्याच्या उद्योगांत असा वाव भरपूर असतो.

उद्योगाद्वारें शिक्षण देऊं पाहणाऱ्या शाळेनें विद्यार्थ्यांना स्वकर्मात जास्तींत जास्त प्रावीण्य संपादन करण्यास अनिर्बंध अवसर दिला पाहिजे. एखादें काम कितीहि मामुली असलें तरी तें जास्तींत जास्त निर्दोष होईपर्यंत अविश्रांत श्रम करण्यांत एक निराळाच आनंद व उत्साह सामाविला असतो. प्रावीण्यसंपादनाची अथवा पूर्णतेला पोचण्याची प्रेरणा सुरुवातीला स्वार्थी स्वरूपाची असणें शक्य आहे; प्रारंभीं तिच्यांत निःस्वार्थ अथवा निष्काम वस्तुनिष्ठा आढळणार नाही. परन्तु पूर्णतेचा आनंद वारंवार चाखल्याने कार्यातील हेतु बदलूं लागतो. असें परिवर्तन घडलें म्हणजे पूर्णता प्राप्त करून देणाऱ्या साधनांच्या स्वरूपाचा बारकाईने अभ्यास करण्याचा ध्यास विद्यार्थ्याच्या मनाला लागतो. हीं साधनें म्हणजेच समाजांतील विविध सांस्कृतिक उपकरणें होत. एखाद्या विद्यार्थ्याला आपल्या विषयांत प्रावीण्य संपादण्याकरता यंत्रविद्येचा अभ्यास करणें आवश्यक वाटेल तर कोणाला विदेशी भाषा शिकण्याचा छंद लागेल; कोणी एखाद्या महाकवीच्या रचनांचा खोल अभ्यास करूं लागेल. विद्यार्थ्याच्या मनांत एखाद्या विषयांत प्रावीण्य संपादन करण्याची आकांक्षा

निर्माण झाली म्हणजे कोणत्या ना कोणत्या सांस्कृतिक उपकरणाचा छंद त्याच्या मनाला व्यापून टाकील. या छंदाची अवीट गोडी चाखतांना त्याच्या मनांतील सुप्त शक्तींना चैतन्य प्राप्त होईल; आणि आपल्या कार्यांत पूर्णता प्राप्त करण्याच्या प्रयत्नांत तो स्वतःची अशी नवीन भर घालील. उच्च आदर्शांची किमयाच अशी विलक्षण आहे कीं अत्यंत तल्लीनतेने त्यांची उपासना केल्याविना माणसाला चैन पडत नाही; पूर्णत्वाला पोंचण्याचा ध्यास लागतो, आणि त्यांतूनच एक निराळा आनंद प्राप्त होतो. माणसाचें मन एकदां या उच्च आदर्शांनी व त्यांत पूर्णत्व प्राप्त करण्याच्या आकांक्षेने भारावून गेलें म्हणजे त्याच्या क्षुद्र व स्वार्थी हेतूंचा लोप होऊं लागतो.

या चवथ्या शैक्षणिक तत्त्वाची चर्चा करतांना मी बरीच लांबण लावली कीं काय अशी मला शंका येते. सुरुवातीलाच शिक्षणाची आपण जी व्याख्या केली आहे तिच्यांतून क्रियाशीलतेचें हें तत्त्व ओघाने प्राप्त होतें असें मला वाटतें. गेलीं वीस वर्षें आम्ही या उद्योगप्रधान शिक्षणाच्या कल्पनेशी खेळत आहोंत. आमचें राष्ट्रीय शिक्षण उद्योगप्रधान शाळेवर आधारलें जावें असें आम्ही म्हणत आलों आहोत. परंतु मला आजकाल असें वाटूं लागलें आहे कीं उद्योगप्रधानतेच्या या कल्पनेचा अधिक बारकाईने विचार होणें अगत्याचें आहे. त्यामुळे थातुरमातुर व अंधुक समजुती दूर होतील आणि आपली शक्ति वायफळ खटपटींत खर्च होणार नाहीं. त्याचप्रमाणें ही शिक्षणसमस्या सोडवितांना आपल्या आचार-विचारांत अधिक स्थिरता निर्माण होईल. या समस्येवर गंभीर विचार केला तर मी सुरुवातीलाच केलेलें विधान आपणांस पटेल असें मला वाटतें. मी म्हटलें होतें कीं उद्योग हें शिक्षणाचें सर्वांत महत्त्वाचें साधन आहे. शारीरिक उद्योगांतील बौद्धिक अंश शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. बौद्धिक अंशाकडे दुर्लक्ष केलें तर उद्योगाचें शैक्षणिक महत्त्व नष्ट होईल. उद्योगामुळे सूक्ष्म व तर्कशुद्ध विचार करण्याचें वळण लागतें म्हणून उद्योगाला शैक्षणिक महत्त्व आहे. उद्योग निष्काम व वस्तुनिष्ठ असेल आणि त्यांत प्रावीण्य संपादण्याची आकांक्षा असेल तरच तो शैक्षणिक दृष्टीने उपयुक्त ठरेल. त्या उद्योगाच्या फळाची तुलना व चिकित्सा करून आत्मपरीक्षण करतां येत असेल तर त्याच्या शैक्षणिक उपयुक्ततेंत अधिक भर पडेल. या दृष्टीने शारीरिक अथवा हस्तकौशल्याचीं कामें फार उपयोगी आहेत.

आता मी शिक्षणाच्या आणखी दोन तत्त्वांचा उच्चार करून त्यांच्यावर

थोडा प्रकाश टाकतों. हीं दोन्हीं तत्त्वें सर्व प्रकारच्या शिक्षणाला लागूं पडतात. पहिलें तत्त्व असें कीं शिक्षणामुळें समाजाविषयीं जिव्हाळा उत्पन्न झाला पाहिजे. आतांपर्यंत आपण ज्या तत्त्वांची चर्चा केली त्यांत मुख्यत: व्यक्तीचा विचार केला होता; तिचा समाजाशीं किती जिव्हाळ्याचा संबंध असतो या गोष्टीवर फारसा भर दिला नव्हता. अर्थात व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास समाजांत उपलब्ध असलेल्या सांस्कृतिक उपकरणांच्या साहाय्यानें होतो असें गृहीत धरतांना आपण व्यक्ति व समाज यांचे दरम्यान वसणाऱ्या नाजुक संबंधाची जाणीव दाखविली आहे. परंतु त्या सर्व चर्चेत मुख्य भर व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर आणि स्वयंप्रज्ञ नैतिकतेच्या वाढीवर होता हें नाकारतां येणार नाहीं. आता मी ज्या तत्त्वाचा उच्चार केला आहे त्याचा मतितार्थ असा कीं समृद्धीच्या, न्यायाच्या अन् सौंदर्याच्या रोखाने होणाऱ्या मानवी समाजाच्या उत्क्रांतीला हातभार लावणें हा सुद्धा शिक्षणाचा उद्देश आहे. सर्व समाजाची उन्नति झाली नसेल तर एकट दुकट व्यक्तीचा परिपूर्ण विकास होऊं शकणार नाही, ही गोष्ट आपण तावडतोब कबूल केली पाहिजे. व्यक्तीचा परिपूर्ण विकास होण्याकरितां समाजाची सर्वांगीण उन्नति होणें अपरिहार्य आहे. प्लेटोसारख्या महान तत्त्वबेत्याला सुद्धां वैयक्तिक सद्‌गुणांची व्याख्या करण्याकरितां सर्व समाजाच्या धारणेचा व विकासाचा विचार करावा लागला. समाज आपल्या संग्रहांत पूर्वजांनी निर्मिलेली सांस्कृतिक उपकरणें जतन करून ठेवतो. या उपकरणांचा उपयोग अनेक प्रकारें केला जातो. नवीन पिढ्यांच्या शिक्षणाकरितांहि या उपकरणांचा उपयोग होतो. या सांस्कृतिक संग्रहांतील जुनीं उपकरणें वापरणें, त्यांना घासून पुसून साफ करणें, त्यांचें रक्षण करणें व त्यांत नवीन उपकरणांची भर घालणें ही जबाबदारी समाजाच्या सर्व घटकांवर असते.

जर माणूस फक्त स्वत:पुरतेंच पाहूं लागला, स्वत:चा मानसिक, नैतिक व आध्यात्मिक विकास करण्यांतच गढून गेला, स्वत:च्या मन:पटलावरच संस्कृतीचीं लेणीं कोरूं लागला आणि समाजांत या सांस्कृतिक मूल्यांचा बोज राखिला जात आहे किंवा नाहीं याबद्दल उदासीन राहूं लागला तर कदाचित त्याचें एकट्याचें आध्यात्मिक जीवन पूर्णत्वाला पोंचेलहि; परंतु सर्वच लोक अशा माणसाचें अनुकरण करूं लागले तर काय परिणाम होईल ? संस्कृतीचे व शिक्षणाचे सर्व मार्ग उजाड बनतील व तेथें काळोख पसरेल. अशा ओसाड बाळवंटांतील एखाद्या गुहेत कोणी आत्मानंदांत दंग असलेला मुक्त तपस्वी

आढळला तरी त्याला आपल्या नाकाच्या शेंडयाखेरीज इतर कोणत्याहि श्रेष्ठ वस्तूचें ध्यान करतां येणार नाहीं. निरनिराळ्या समाजांत अशा प्रकारच्या निस्संग व निष्फल सत्पुरुषांना वाव मिळतो. लोकशाही समाजांत सुद्धा त्यांना वाव मिळतो. अगदीच विपन्नावस्थेला न पोंचलेल्या समाजांत एककल्ली व निष्फल नैतिक उपासनेचा हा विलास खपून जाऊं शकतो; इतकेंच नव्हे तर तसल्या उपासनेला उत्तेजन सुद्धां मिळूं शकतें. कदाचित समाजाला असें वाटत असेल कीं नैतिकतेच्या या असल्या निस्संग नमुन्यांचें अस्तित्व देखील शिक्षणाच्या दृष्टीने उपयोगाचें आहे. असे फारसे नमुने पोसणें समाजाला जड जातें. ज्या समाजांतील मूठभर ऐतखाऊ लोक बहुसंख्य कष्टाळू जनतेच्या जोवावर चैन करीत असतात अशा समाजांत अनेक राजयोगी पोसले जाऊं शकतात; परंतु एकंदरीने समाजांत अशी राजयोग्यांची संख्या कमीच. विशेषतः लोकशाही समाजांत अशा राजयोग्यांचें वर्चस्व कमी झालें पाहिजे. कारण जो माणूस आपल्या शरीराच्या, मनाच्या व आत्म्याच्या पोषणाकरितां अन्य नागरिकांच्या सहकार्यावर अवलंबून आहे त्या प्रत्येक माणसाने समाजाच्या सांपत्तिक व सांस्कृतिक संग्रहांत कांही ना कांही भर टाकलीच पाहिजे. केवळ व्यक्तिगत जीवनांत उच्च आदर्शांची उपासना करून काम भागणार नाही, तर समाजांत त्यांची संघटित आराधना करविणें अगत्याचें आहे. व्यक्तीच्या ठायीं स्वतःच्या निष्ठा निर्माण करूं शकणाऱ्या प्रभावी सांस्कृतिक उपकरणांमध्यें न्यायपूर्ण व सुसंघटित समाज, निकोप राजकीय जीवन, आणि समाजाच्या कल्याणाकरितां अविरत झटणारे प्रामाणिक पुढारी यांचा सुद्धा समावेश होतो. या गोष्टींना फार मोठें शैक्षणिक महत्त्व आहे.

आपल्या शिक्षण-व्यवस्थेंत व्यक्ति व समाज यांच्या परस्परावलंबी संबंधाकडे क्वचितच लक्ष दिलें जातें. शाळा अन् इतर विद्यालयें बुद्धिविकासाच्या आपल्या तथाकथित कार्यांत इतकी कांहीं गढलेलीं असतात की समाजाशी संपर्क स्थापन करण्यासारख्या क्षुल्लक गोष्टीकडे लक्ष देण्यास त्यांना सवडच नसते. वस्तुतः विद्यार्थ्यांत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करायची असेल तर विद्यालयांना सामुदायिक जीवनाचीं केंद्रें बनाविलीं पाहिजेत. पाण्यांत उतरल्याशिवाय पोहणें शिकतां येत नाहीं. समाजाची सेवा केल्याशिवाय सेवाभाव अंगीं बाणत नाहीं. हें तत्त्व आमच्या शिक्षणसंस्थांच्या रोमरोमीं खिळल्याखेरीज सर्व शैक्षणिक सुधारणा कुचकामाच्या ठरतील. सुसंघटित

समूहाचा घटक म्हणून जगल्याशिवाय सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव कशी निर्माण होईल ?

केवळ भाषणांतून सुसंघटित समाज-जीवनाचें गुणगान केल्याने, अथवा समाजरचनेचें तात्त्विक निरूपण केल्याने, अथवा इतिहास, नागरिक शास्त्र, आदि विषयांचे पुस्तकी पाठ दिल्याने न्यायनिष्ठ व सुसंघटित समाजाचा घटक बनून जगण्यांतील आनंद समजावून सांगतां येत नाही. विद्यार्थ्याला विद्यालयांत सामूहिक जीवन जगायला लावूनच त्याच्या चित्तांत तो चैतन्यदायी अनुभव उत्पन्न केला जाऊं शकतो. हा सजीव अनुभव आला म्हणजे समाजांतील संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन करण्याकरिता झटण्याची नैतिक जबाबदारी विद्यार्थ्याला जाणवूं लागते. कुलीन कुटुंबांत, सुनियंत्रित विद्यालयांत, समान-शील सहकाऱ्यांच्या समूहांत, ज्याची वाढ झाली आहे असा विद्यार्थी उर्वरित आयुष्यांत आपल्या गांवाची, राज्याची, राष्ट्राची व अवघ्या मानवजातीची सेवा करण्याचें व्रत घेण्यास उद्युक्त होतो. समान आदर्श व समान संस्कृतीवर आधारलेलें सामुदायिक जीवन व्यतीत करणारीं विद्यालयें चालविण्याचा प्रयोग आजकाल अनेक ठिकाणीं केला जात आहे. इंग्लंडमधील पब्लिक स्कूल्स, युरोप, अमेरिका, पॅलेस्टाईन येथील प्रायोगिक व सामुदायिक शाळा, सोव्हिएट रशियांत अशाच प्रकारच्या शाळा निकट भविष्यांत स्थापन करण्याची योजना, इत्यादि घडामोडी हेंच दर्शवितात कीं निरनिराळ्या देशांत वेगळाल्या उद्देशानें शिक्षणांत सुधारणा करण्यासंबंधी जोराने विचार सुरू आहे. अर्थात् जगभर चालू असलेल्या ठराविक विद्यादानाच्या नगाऱ्यासमोर वरील प्रयोगांच्या टिम-कीचा आवाज अगदीं क्षीण आहे. परंतु व्यवहाराच्या धकाधकींत आत्म्याचा आंतला आवाज सुरुवातीला असाच क्षीण नसतो काय ? सामाजिक प्रगती-करतां आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याकरतां खुद्द विद्यालयांतील जीवनच सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वावर रचलें पाहिजे, ही जाणीव दिवसानुदिवस बळावत आहे. सर्व ठिकाणीं व सर्व विद्यार्थ्यांकरतां स्वतंत्र वसतिगृहें ताबडतोब स्थापन केलीं जावीत असा आग्रह धरणें अव्यवहार्य आहे. लहान मुलानें चांदोबाकारतां हट्ट धरावा तसलाच तो प्रकार होईल. परंतु देशभर वसतिगृहांचें एवढें प्रचंड जाळें न विणतांहि विद्यार्थ्यांना सामुदा-यिक जीवन जगण्याची संधि देण्यासाठीं कांहीं ना कांहीं व्यवस्था शोधून काढण्यांत माणसाला यश येईल अशी मला आशा आहे. ही व्यवस्था सोव्हिएट रशिया-

सारख्या सर्वाधिकारशाही देशांत प्रथमच व लवकरच केली जाईल असें मला वाटतें. लोकशाही देशांना नेहमीप्रमाणेच उशीरा जाग येईल. आपण काय गमावलें आहे याची त्यांना जाणीव होईल आणि ही वस्तु लोकशाही प्रथेच्या विकासाकरतां अधिक मोलाची आहे हेंहि त्यांच्या ध्यानांत येईल.

सर्वाधिकारशाही राष्ट्रें आपल्या जनतेवर सामुदायिक जीवन लादूं शकतात; परंतु लोकशाही राष्ट्रांत सामुदायिक जबाबदारीची सार्वत्रिक जाणीव स्वाभाविकपणें जागृत होईपर्यंत वाट पहावी लागते. ही जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न कांहीं अंशीं कुटुंबसंस्थेद्वारा केला जाऊं शकतो; परंतु आजच्या औद्योगिक युगांत कुटुंबसंस्थेचीच वाताहात होत आहे. सुसंघटित विद्यालयांच्या द्वारेंहि हा प्रयत्न पद्धतशीरपणें केला जाऊं शकतो. हा प्रयत्न अत्यंत निकराने करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. लोकशाही प्रथेच्या भवितव्याचा निर्णय तिच्या विद्यालयांत होणार आहे.

आजच्या व्याख्यानाच्या अखेरीस मी आपणांसमोर एक शेवटली समस्या मांडतों. ज्या प्रकारच्या शिक्षणाचें चित्र मी रेखाटिलें आहे त्या संदर्भांत ही समस्या सोडविणें तर अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणक्षेत्रांत सत्ता व स्वातंत्र्य यांचें स्थान काय असावें ? लोकशाही समाजांत हा प्रश्न जास्तच महत्त्वाचा आहे. खऱ्याखुऱ्या लोकशाहींत व्यक्तीचा मान राखला जातो; माणसाला साधन न समजतां साध्य मानिलें जातें; विद्यार्थ्यांत स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्त्व निर्माण करण्याकरतां सांस्कृतिक उपकरणांच्या द्वारें त्यांच्या ठायीं निष्ठा-उद्दिष्ट-छंद यांची स्वतंत्र त्रिमूर्ति घडविण्याचा प्रयत्न केला जातो. याचा अर्थ असा कीं लोकशाहींत व्यक्तीच्या उपजत गुणांचा अनिर्बंध विकास केल्यानेच समाजाची उन्नति होईल असें मानलें जातें. तेव्हा लोकशाही शिक्षणक्षेत्रांत विद्यार्थ्यांवर कोणतेंहि नियंत्रण नसावें व त्यांना अबाधित स्वातंत्र्य देण्यांत यावें असें एखाद्याला वाटेल. असें कोणाला वाटण्याचा नुसता संभवच नाही तर कित्येक शिक्षणतज्ज्ञांनी अगदीं गंभीरपणें या मताचा पुरस्कार केला आहे. "अबाधित वाढ होऊं द्या" अशी घोषणा करणारा एक पंथच शिक्षणक्षेत्रांत जन्मास आला आहे. विद्यार्थ्यांच्या स्वाभाविक विकासांत कोणतेहि अडथळे आणूं नयेत असा या पंथाचा अतिरेकी आग्रह आहे.

आपला देश परकीयांच्या चढाओढीपासून शतकानुशतकें सुरक्षित राहिला आहे. त्यामुळे आपल्या प्रश्नांचा पद्धतशीर विचार करण्याची वाईट

खोड आपल्याला लागलेली नाही. आपल्या पूर्वजांनी सर्व प्रश्नांचा सांगोपांग व गंभीर विचार पूर्वीच करून ठेवलेला आहे ही सुखकर आठवण आपण कधींच विसरूं शकत नाही. आजघटकेला सुद्धा या ज्वलंत प्रश्नाचा पुर्नविचार करण्याचें कंटाळवाणें काम पृथ्वीच्या पाठीवर कोणी ना कोणीतरी करीतच आहे व त्यांच्या चिंतनाचा लाभ आपल्याला झाल्याशिवाय राहणार नाहीं अशा ऊबदार व आत्मसंतुष्ट आनंदांत आपण निमग्न आहोंत. कोणत्याहि क्षेत्रांतील, अन् विशेषतः शिक्षणक्षेत्रांतील, मूलभूत समस्या सोडविण्याचा शीण वाहण्याची आपली तयारी नाहीं. अशा परिस्थितींत वरील सारी चर्चा अप्रस्तुत आहे असें वाटण्याचा संभव आहे. परंतु हा पळपुटेपणा मला पटत नाहीं. आज ना उद्या आपणांस या साऱ्या समस्यांना तोंड दिल्याशिवाय गत्यंतर नाही. या साऱ्या समस्या लौकरच आपणांसमोर आ वासून उभ्या राहणार आहेत. लढाईला तोंड लागलेलें आहे आणि परिस्थितीचा पूर्ण आढावा घेतल्याखेरीज आपणांस यश मिळणें कठीण आहे. आपल्या देशांतील सद्यःपरिस्थिति काय आहे ? बौद्धिक क्षेत्रांत आप्तवचनाला प्रमाण मानण्याची परंपरा कायम आहे; अंधश्रद्धेचा बोलबाला आहे, याच परंपरेला आजच्या शिक्षणपद्धतीमुळे बळकटी येत आहे. विनासायास मिळणाऱ्या पुस्तकी माहितीची देवाण घेवाण करणें म्हणजेंच शिक्षण अशी समजूत सर्वत्र पसरली आहे. वार्षिक परीक्षांत उत्तीर्ण होणें सुलभ जावें म्हणून टिपणांच्या चोपडयांचें पेंव फुटलें आहे. या चोपडयांना वेदग्रंथासारखा मान मिळत आहे. केवळ यांत्रिक अनुकरणाच्या कळसूत्री कलेला धंदेशिक्षण असें भडक नांव दिलें जात आहे. 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम' ही भावना अजून कायम आहे. विद्यार्थ्यांना बेदम मार दिला पाहिजे असेंच पुष्कळांना वाटत आहे. या साऱ्या परिस्थितीचा काय अर्थ आहे ? याचा अर्थ असा दिसतो की आमच्या शैक्षणिक क्षेत्रांत स्वातंत्र्याची गळचेपी करून सत्तेलाच अधिमान दिला जात आहे. हा झाला आमच्या समस्येचा एक पैलू. परंतु या प्रश्नाला दुसरीहि एक बाजू आहे. विद्यार्थी वर्ग स्वैराचारी बनला असून, नेमून दिलेल्या कर्तव्यांची हेळसांड करीत आहे व नकोत त्या माकडचेष्टा करीत आहे. अंधुक ध्येयांनी पछाडल्यामुळे, गोंधळलेल्या मनःस्थितिमुळे व शक्तीचा अपव्यय केल्यामुळे विद्यार्थ्यांचें वर्तन अत्यंत गैरशिस्त बनत आहे. याचे उलट शिक्षक वर्गांत करुणाजनक उदासीनता, बेपर्वाई व आत्मसंतुष्टता पसरलेली आहे. एका बाजूला असंतोषाने धुमस-

णारे तरुण व पेटलेलीं मुलें आणि दुसऱ्या बाजूला उदासीन, बेपर्वा, पराभूत व उद्विग्न शिक्षकवर्ग, असें हें चित्र आहे – आणि कधीकधी तर तरुण शिक्षक वर्गहि असंतुष्ट विद्यार्थ्यांच्या तुकडींत भरती होतो. या साऱ्या परिस्थितीचा काय अर्थ लावायचा ? याचा अर्थ असा दिसतो कीं आमच्या स्वतंत्र देशांत "अबाधित वाढ होऊं द्या" या घोषणेला भरपूर वाव देण्यांत येत आहे. मग या अबाधित वाढीमुळे त्यांना फळें-फुलें लागण्याऐवजीं काटाकुटयांचें रान माजलें तरी हरकत नाही.

अशी ही आजची चमत्कारिक परिस्थिति आहे. येथे भरीव राष्ट्रीय शिक्षणाची रचना करणें अशक्य आहे, असेंच कोणालाहि वाटेल. याविषयीं माझा दृष्टिकोण अगदीं थोडक्यांत मांडणेंच आतां मला शक्य आहे. शिक्षण-क्षेत्रांत स्वातंत्र्य व सत्ता यांच्यांत साप–मुंगुसासारखें हाडवैर आहे असें मला वाटत नाही. शिक्षणक्षेत्रांत स्वेच्छेने न स्वीकारलेली सत्ता असूं शकत नाही आणि शिस्त व नियंत्रण यांना न जुमानणारें स्वातंत्र्यहि असूं शकत नाही. सत्तेचा अर्थ सक्तीचें नियंत्रण असा केला आणि स्वातंत्र्य म्हणजे मनमुराद स्वैराचार असें समीकरण मांडलें तर मात्र सत्ता व स्वातंत्र्य या दोन कल्पना परस्पर विरोधी होतील. परंतु समाजाच्या कोणत्याहि घटकांत––मग तें कुटुंब असो, विद्यालय असो, वा राज्य असो––नीतिनियम व रीतिभाती या असणारच. बंधनकारक नियमाशिवाय स्वातंत्र्य वास करूं शकव नाहीं. माणसांतील स्वार्थी-पणाच्या पाशवी प्रवृत्तींना आळा घालणारीं नियंत्रणें समाजानें घातलीं नाहीत तर समाजांत स्वातंत्र्य नांदूं शकणार नाहीं आणि स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची कल्पनासुद्धा करतां येणार नाही. नियंत्रणें नसलीं तर समाजांत सावळा गोंधळ माजेल आणि माणूस जनावरांप्रमाणें आपल्या शारीरिक गर-जांचा गुलाम बनून जाईल.

माणसाला लहानपणापासून नीति-नियम व रीतिभाती शिकवल्या नाहीत तर कदाचित् मोठेपणीं त्याला त्या गोष्टींची आवश्यकता कळून येईल. असें होणें अशक्य नाहीं. परन्तु आपल्या अनुभवाने हा शहाणपणा शिकण्या-पूर्वी त्याला पुष्कळ ठेंचा खाव्या लागतील, आणि इतक्या उशीरा शिकलेल्या शहाणपणाचा पुढे उपयोग करण्यास फारसें आयुष्यहि उरणार नाहीं. म्हणूनच शहाणा व स्वयंप्रज्ञ माणूस घडविण्याकरतां समाज सुरुवातीला त्याच्यावर कांहीं नीतिनियम व रीतिभाती लादतो. नियंत्रणांचे पत्थर पसरूनच स्वातंत्र्याचा

मार्ग तयार होतो. नियंत्रणांना मूठमाती दिली तर स्वातंत्र्याचा मार्ग अवरुद्ध होईल. शिक्षणासमोरील खरी समस्या सत्ता कीं स्वातंत्र्य ही नसून स्वातंत्र्याच्या सर्वसंमत ध्येयाप्रत पोंचण्यापूर्वी किती काळ नियंत्रणांची आवश्यकता आहे ही आहे. सत्तेची सीमा ओलांडून स्वातंत्र्याचा अंमल केव्हां सुरू करावयाचा ? कारण स्वयंप्रज्ञ माणूस घडवावयाचा असेल तर त्याला स्वातंत्र्य हें मिळालेंच पाहिजे. शिक्षणाच्या आरंभीं आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर माणसाच्या आयुष्यावर कांहीं गोष्टींची सत्ता चालते. शिक्षणाच्या आरंभीं प्रौढ अन् अनुभवी माणसें त्याला वळण लावितात. प्रेमाने व सहानुभूतीने त्याचें मार्गदर्शन करतात. चांगल्या शाळांत शासनाची छडी कोपऱ्यांत लपवून ठेवण्याचा शक्य तों प्रयत्न करण्यांत येत असला तरी कधी कधी नाइलाजाने विद्यार्थ्याला कडक शासनहि केलें जातें. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्याच कांहीं गोष्टी माणसाच्या आयुष्यावर सत्ता गाजवूं लागतात. समाजांतील सांस्कृतिक उपकरणांच्या सहवासांत स्वच्छंदपणें अनुभवलेले अन् स्वेच्छेने स्वीकारलेले आदर्श सुशिक्षित माणसाच्या जीवनाची दिशा ठरवूं लागतात. असो. पद्धतशीर प्रयत्न केला तर लहान मूल शाळेंत दाखल होत असतांनाच त्याला शिस्तीचें व गुरुजनांची अवज्ञा न करण्याचें महत्त्व पटवून देणें शक्य आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाचें महत्त्व पटविणें आणि त्यांचें मनांत शिक्षण व शिक्षक यांचेंविषयीं आस्था निर्माण करणें महाकठीण काम आहे असें कोणाला वाटत असेल तर, तें काम केल्याखेरीज ख-या शिक्षणाची सुरुवातच होत नाही, ही गोष्ट त्यानें विसरूं नये. विद्यार्थ्यांच्या मनांत स्वतःच्या कृत्याबद्दल जाणीव आणि विद्यार्जनाची दुर्दमनीय आवड निर्माण करणें हें विद्यालयांचें व शिक्षकांचें कर्तव्य आहे. विद्यालयांत सामुदायिक जीवनाचें वातावरण निर्माण करून व विद्यार्थ्यांचें मार्गदर्शन करून त्याच्यांत वरील भावनांचें बीज पेरण्यांत शिक्षकांना धन्यता वाटली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनांत या भावना रुजूं लागल्या म्हणजे त्या प्रमाणांत त्याला अधिकाधिक स्वातंत्र्य दिलें पाहिजे. या गोष्टी बोलायला सोप्या आहेत. परन्तु त्या अमलांत आणतांना चांगल्या शिक्षकांना पिढयान् पिढ्या खपावें लागेल. मला आशा आहे आणि विश्वासहि आहे कीं असे शिक्षक भारतांत निर्माण होतील.

या मालेंतील पहिल्या दोन व्याख्यानांत मी आपणांसमोर व्यक्तीच्या मनाची जास्तींत जास्त वाढ करणाऱ्या शिक्षणाच्या स्वरूपासंबंधी माझी कल्पना मांडली, आणि शिक्षणविषयक योजना आंखतांना ज्या सहा तत्त्वांचा विचार करणें आवश्यक आहे त्यांचेंहि थोडक्यांत विवेचन केलें. हीं तत्त्वें सर्व प्रकारच्या शिक्षणाला लागू पडतात. कारण, माझ्या मतें, शिक्षणाच्या व्याख्येंतूनच या तत्त्वांचा उगम होतो. परंतु सर्व प्रकारचें शिक्षण सर्वांकरतां नसतें. सर्व प्रकारचें शिक्षण सरकार द्वारा नियंत्रित केलेलें नसतें. किंवा सर्व प्रकारच्या शिक्षणाचा खर्च सर्व नागरिकांकडून वसूल केला जात नाहीं. "सर्व प्रकारचें शिक्षण" ही फार व्यापक संज्ञा आहे आणि तिच्यांत अनेक शिक्षणविषयक चळवळींचा तद्वतच समाजांतील विविध व विवक्षित व्यक्तींना किंवा जातींना शिकविणाऱ्या संस्थांचा समावेश होतो. मनुष्यजातीला सुरुवातीपासूनच कांहीं ना कांहीं शिक्षण मिळत आलें आहे. अगदीं सुरुवातीच्या भटक्या अवस्थेंत हातातोंडाशी गांठ घालतां येण्यापुरतें शिक्षण मिळत असे. अन् त्याकरतां स्वतंत्र व्यवस्था केलेली नव्हती. त्या काळांतील शिक्षण काय तें सर्वांकरतां होतें असें म्हणतां येईल. अन्यथा मानवी इतिहासांत सार्वत्रिक शिक्षणाची व्यवस्था क्वचितच केली गेली असें मला वाटतें. आतांपर्यन्त कांहीं शेलक्या लोकांकरितां शिक्षणाची व्यवस्था केली जात असे. ज्यांच्याजवळ भरपूर वेळ आहे, पैसा आहे, सत्ता आहे, अशा कांहीं निवडक लोकांच्या शिक्षणाची समाजांत सोय होती. मानवी व्यवहारांत धार्मिक भावनांचें प्राबल्य वाढल्यानंतर आणि मानवतेच्या व विश्वबंधुत्वाच्या विचारांनी माणसाच्या मनाची पकड घेतल्यानंतर कांहीं लोकांनीं ज्ञानार्जनाचा व विद्याव्यासंगाचा पत्कर आपल्याकडे घेतला व त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय समाजातील इतर सधन व सुखवस्तु लोकांनी केली. त्या काळांतील शिक्षणाची समस्या मर्यादित होती. समाजांतील एका लहानशा वर्गाला-सत्ताधारी राजकुमारांना, महाजनांच्या मुलांना आणि स्वतःच्या उपजीविकेकरतां कांहींच श्रम

न करणा-या शास्त्रीपंडितांच्या मुलांना—शिकवून तयार करण्याची मर्यादित जबाबदारी तत्कालीन शिक्षणाला पार पाडायची होती. ही जबाबदारी जो तो वर्ग स्वतःची स्वतःच पार पाडीत असे. सर्व समाजाचा तिच्याशी बहुधा कांहीं सम्बन्ध नसे. परन्तु आधुनिक समाजासमोर व आजच्या सरकारांसमोर फार मोठी समस्या आहे. देशांतील सर्व नागरिकांना आपल्या सामाजिक कर्तव्यांची योग्य जाणीव करून देणा-या राष्ट्रीय शिक्षणाची व्यवस्था आज करावयाची आहे. काळ पालटला आहे. उद्योगधंद्याच्या वाढीमुळे समाजाचें जीवन गुंतागुंतीचें व विस्कळित बनलें आहे. या विस्कळित समाजांतील ऐक्य व कार्यक्षमता कायम राखण्याकरितां नवनवीन संस्था स्थापन करण्याची फार निकड आहे. सर्वांनाच शिक्षण द्यावयाचें आहे. सर्व वर्गांच्या सर्व मुलांना शिक्षण द्यावयाचें आहे. इतकेंच नव्हे तर प्रौढांना सुद्धा शिक्षण द्यावयाचें आहे. ही नवीन जबाबदारी खरोखर फार प्रचंड आहे. सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाचा इतिहास अगदी ताजा आहे. अदमासें २५० वर्षांचा हा इतिहास आहे. मला वाटतें, सक्तीचें सार्वत्रिक शिक्षण प्रथम जर्मनींत सुरू करण्यांत आलें. अमेरिकन संघराज्याच्या कांही घटकांत शंभर एक वर्षांपासून सक्तीच्या शिक्षणाचे कायदे अस्तित्वांत आले. इतर देशांत तर अगदी अलिकडे शिक्षणाची सक्ती सुरू झाली आहे. आपणांस गंमत वाटेल कीं १९व्या शतकाच्या उत्तरार्धांत अमेरिकेंतील कांहीं राज्यें सक्तीच्या शिक्षणाचे कायदे पास करीत असतांना कित्येक विरोधकांनी या कायद्यांना 'प्रशियन प्रणालीचे' व 'जुलमी स्वरूपाचे' म्हणून हिणविलें आणि स्वतंत्र राष्ट्राच्या संहितेमध्यें अशा कायद्यांना स्थान नसावें म्हणून प्रचार केला. आणि त्याहूनहि गंमतीची गोष्ट ही कीं कित्येक लोक या प्रचाराला बळी पडले.

माझा स्वतःचाच एक मजेशीर अनुभव सांगतों. मला एकदा एका प्रांताच्या शिक्षण-प्रमुखाशी चर्चा करण्याचा प्रसंग आला. १९३८–३९ सालच्या आसपासची ही गोष्ट आहे. सार्वत्रिक, सक्तीच्या व गोफत बुनियादी शिक्षणाच्या योजनेवर विचार करण्याकरितां या सद्गृहस्थांची एका समितीवर नेमणूक झाली होती. त्यांनी अकस्मात व रागावून पृच्छा केली : 'सार्वत्रिक कां म्हणून अन् सक्ती कशाला ?' मला व माझ्या सहका-यांना हा प्रश्न ऐकून धक्काच बसला. पुढे तर त्यांनी सात्त्विक संतापाने आमचेवर टीकेची सरबत्ती सुरू केली : "स्वातंत्र्यद्वाराशी उभ्या असलेल्या आमच्या या देशांत तुम्ही लोक

सर्वांवर सक्ती करण्याच्या योजना आखीत आहांत." मी त्यावेळीं पुष्कळ चर्चा केली. चर्चेंत दोघांचीहि बाजू लंगडी होती. माझी बाजू लंगडी होती, कारण माझी बुद्धि त्यांच्या पासंगालाहि पुरत नव्हती. त्यांची बाजू लंगडी होती, कारण समितींतील एकाहि सदस्याला त्यांच्या दृष्टिकोणाबद्दल सहानुभूति नव्हती. ते शिक्षणाधिकारी फार विद्वान होते. फार प्रामाणिक प्रशासक होते आणि हाडाचे कट्टर देशभक्त होते. परन्तु मला पक्कें स्मरण आहे की शेवटपर्यन्त त्या गृहस्थांचें मन बदललें नाहीं, उदासीनता हटली नाही व त्यांनी आपला एकाकी विरोध चालू ठेविला. त्यांच्या पिढींतील अनेक प्रगाढ विद्वानांना सर्व लोकांच्या सर्वच मुलांना शिक्षण देण्याचें हें आधुनिक वेड समजूं शकलें नाहीं. सर्वांना साक्षर करण्याचा विचार त्यांना कदाचित पटला असता; परंतु सर्वांना शिक्षण देण्यासंबंधीं त्यांच्या मनांत गंभीर शंकाकुशंका होत्या. सार्वत्रिक शिक्षणाची आवश्यकता आज आपणांस समजावून सांगण्याची गरज आहे, असें मला वाटत नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत जगाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रांत अक्षरशः उलथापालथ झाली आहे. आज आपल्या डोळ्यांसमोर अनेक बदल घडून येत आहेत अन् उद्यां याहूनहि प्रचंड घडामोडी घडतील असा दाट संभव आहे. अशा परिस्थितींत सर्व नागरिकांना कांही किमान शिक्षण देणें हें सरकारचें कर्तव्य बनलें आहे आणि असें किमान शिक्षण प्राप्त करून घेणें ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे. आपल्या देशांत आपण धर्मनिरपेक्ष कल्याणकारी राज्य स्थापून लोकशाही व्यवस्था कायम करण्यास बद्धपरिकर झालों आहोत. आपल्या विशिष्ट परिस्थितींत तर सार्वत्रिक शिक्षण लागू करणें अनिवार्य आहे. लोकशाही समाजांत इतरांनी आंखून दिलेल्या योजना व नेमून दिलेलीं कामें पार पाडून नागरिकांचें कर्तव्य संपत नाही. तर राष्ट्रीय जीवनाची भावी रूपरेषा ठरविण्यांतहि प्रत्येकाने भाग घ्यावा अशी अपेक्षा असतें. आपणांस माहितच आहे की लोकशाहीचें अधिष्ठान जनतेच्या पुढाकाराबर असते, पुढाऱ्यांच्या अरेरावीवर नाहीं. लोकशाहींतील शिस्त जबरदस्तीची नसून स्वयंप्रेरित असते. लोकशाहींतील सर्व निर्णय सहकार्याने, वादविवादाने व पद्धतशीर पुढाकाराने घेतले जातात. लोकशाहींत परस्पर सद्भाव, उदार अंतःकरण व परमतसहिष्णुता हे गुण अत्यन्त आवश्यक असतात. प्रत्येक नागरिकांत एका समान राष्ट्रीय संस्कृतीची भावना जागृत करणें हें आपल्या लोकशाही समोरील एक बिकट कार्य आहे. आपण

आपल्या राज्यघटनेंत ज्या मूलभूत तत्त्वांना मान्यता दिली आहे आणि ज्या प्रकारची समाजरचना घडविण्याची शपथ वाहिली आहे ती लक्षांत घेतां सार्वत्रिक शिक्षणाची जबाबदारी टाळणें अशक्य आहे. आपण स्वीकारलेलीं कांहीं मूलभूत तत्त्वें अशा स्वरूपाचीं आहेत कीं त्यामुळें आपल्या समाजांतील संकीर्ण घटकांतील फुटीर प्रवृतीला उत्तेजन मिळतें आणि आपल्या देशांतील लोकशाहीच्या वृक्षाच्या मुळावरच घाव पडेल की काय अशी भीति वाटूं लागते. हा धोका टाळण्याकरतां सरकारनें तांतडीचे उपाय योजणें अवश्य आहे. या कामीं सरकारजवळ शिक्षणासारखें दुसरें अमोघ साधन नाहीं. मात्र सरकारी घोरणें जुजबी स्वरूपाचीं असूं शकतात किंवा दूरदृष्टीचींहि असूं शकतात. त्यांच्यामुळें व्यक्तिगत स्वातंत्र्याची वाढ होऊं शकते किंवा गळचेपीहि होऊं शकते. असो.

एखाद्या अनियंत्रित राज्यसत्तेने लागू केलेल्या सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणांतील पाठचक्रमाची छाननी केल्याने वास्तविक शिक्षणाच्या समस्यांवर कांहीहि प्रकाश पडणार नाहीं. एका जिवंत व्यक्तीच्या मूळ स्वभावाचा कांहीं एक विचार न करतां त्याच्यावर जबरदस्तीने लादण्यांत आलेली कवायत कितीहि सफाईदार दिसली तरी तिला शिक्षण हें नांव देतां येणार नाहीं. उलटपक्षी खुद्द सरकारलाच आपल्या मर्यादांची जाणीव असेल, अजून आपण आदर्श समाजव्यवस्थेचा टप्पा गांठलेला नाहीं याची आठवण असेल, आपल्या नागरिकांत स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याकरतां तें अविरत झटत असेल, नागरिकाच्या संपूर्ण विकासांतून आणि त्यांच्या सक्रिय सहकार्याने आपल्या देशांत आदर्श समाजव्यवस्था स्थापन होणार आहे याची सरकारला कल्पना असेल तर तें सरकार आपल्या शिक्षण संस्थांचीं उद्दिष्टें निश्चित करण्यास पात्र आहे.

लोकशाहीच्या आदर्शाने प्रेरित झालेली राज्यव्यवस्था हाच समाजांतील श्रेष्ठ नैतिक जीवनाचा पाया आहे. तिच्या साहाय्यानें समाजांतील प्रत्येक नागरिक आपल्या स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्त्वाचा विकास जास्तींत जास्त करूं शकतो. अशा प्रकारें नागरिक व सरकार परस्परांच्या उत्कर्षास पोषक बनतात. आदर्श राज्यव्यवस्था निर्माण करण्याच्या प्रयत्नांतूनच नागरिक आपला व्यक्तिगत विकास साधूं शकतो. जगांत निरनिराळ्या स्वरूपाच्या राज्यव्यवस्था आहेत याची मला जाणीव आहे. सर्वच प्रकारच्या राज्यव्यवस्था नागरिकांच्या वैयक्तिक

विकासाला पोषक नाहींत याचीहि मला जाणीव आहे. कांहीं राज्यव्यवस्था तर स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला मारक आहेत. अशा राज्यव्यवस्थांना "सैतानी सत्ता" म्हणावें लागेल. कित्येक थोर विचारवंतांनी सरकारी सत्तेला सैतानी सत्ता हेंच नांव दिलें आहे, परंतु ही निराशावादी विचारसरणी आहे. माणसाला पक्षपातविरहित, न्यायपूर्ण, सुसंघटित व कल्याणकारी राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था स्थापन करतां येणारच नाहीं असें समजण्याचें कारण नाहीं. कर्तव्यदक्ष नागरिक निर्माण करणारें शिक्षण देऊन जनकल्याणकारी सरकार स्थापन करण्याचें उद्दिष्ट साधण्यास साहाय्य केलें जाऊं शकतें. उलटपक्षीं नागरिकांच्या शिक्षणाची हेळसांड केली तर काय होईल ? या निष्काळजीपणाने नागरिकांतील स्वकर्तव्याची जाणीव नष्ट होईल. अशा नागरिकांवर आधारलेली राज्यसत्ता स्वतःच्या आदर्शाविषयीं उदासीन बनेल व प्रगतिपराङ्मुख होईल. आपल्या राज्यघटनेंत स्वीकारलेल्या उच्च तत्त्वांचा तिला विसर पडेल आणि आपल्या दोषांवर पांघरूण घालण्याची वृत्ति बळावेल. सरतेशेवटीं तिच्यांतील सर्व कल्याणकारी अंश गळून पडेल आणि नागडी सैतानी सत्ता काय ती शिल्लक राहील.

आपल्या आदर्शासंबंधी जागरूक असलेली आस्थेवाइक राज्यसत्ता पुढील दोन उद्देश साधण्याचा प्रयत्न करते.

(१) अन्तर्गत शांति व सुरक्षितता, परचक्रापासून स्वतःचें संरक्षण करण्याची क्षमता आणि आपल्या नागरिकांच्या शारीरिक व नैतिक कल्याणाची व्यवस्था. हे उद्देश स्वहित-तत्पर आहेत. याशिवाय—

(२) वसुधैव कुटुंबकम् वृत्तीने स्वतःचा जास्तींत जास्त विकास करून समानशील समुदायांच्या सहकार्याने जागतिक संघराज्य स्थापन करण्यास हातभार लावणें हा आदर्श राज्यसत्तेचा दुसरा उद्देश आहे. हा उद्देश परमार्थी स्वरूपाचा आहे. अशा आदर्श राज्यसत्तेने आपल्या सर्व नागरिकांच्या मुलांना सुशिक्षित करण्याचा विडा उचलला तर प्रत्येक नागरिक आपल्या कुवतीप्रमाणें वरील उद्दिष्टांची सेवा करण्यास पात्र होईल. अन्यथा सार्वत्रिक शिक्षणाचा उपयोग काय ? वरील दोन उद्दिष्टांची सेवा करण्यास पात्र असलेले कार्यक्षम व कर्तव्यदक्ष नागरिक निर्माण करणें हाच शिक्षणाचा हेतु नाहीं काय ? स्वार्थी मानवाला परमार्थाची गोडी लावणें हाच आदर्श राज्यसत्तेच्या शैक्षणिक धोरणाचा हेतु आहे.

आदर्श राजसत्तेच्या वरील दुहेरी उद्दिष्टांकडे पाहतां, सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाद्वारें पुढील गोष्टी साधल्या पाहिजेत :

(१) शिक्षणाद्वारें प्रत्येक नागरिकांत त्याच्या आवडीनुसार व कुवतीनुसार कांही तरी सामाजिक उपयोगाचें काम करण्याची पात्रता निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थ्याला एखाद्या धंद्यांत अगर उद्योगांत वाकबगार करणें हा शिक्षणाचा पहिला उद्देश असला पाहिजे. अर्थात सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा लक्षांत घेऊनच धंदेशिक्षणाची पायरी ठरवावी लागेल. धंदेशिक्षणाचा उद्देश अगदी व्यवहारी स्वरूपाचा दिसला तरी त्यांतूनच पुढें बौद्धिक व नैतिक शिक्षण साधलें जातें.

(२) धंदेशिक्षण देत असतांनाच विद्यार्थ्याच्या अन्तःकरणावर ही जाणीव बिंबविली पाहिजे कीं त्याचा धंदा म्हणजे केवळ पोटपूजेचें साधन नसून सुसंघटित व सहकारी समाजांतील लोकसेवेचें दालन आहे. सर्व समाजाच्या भौतिक व आत्मिक उत्कर्षांकरतां आपल्या स्वार्थाला गौण स्थान देण्याची नैतिक कळकळ धंदेशिक्षणांतूनच निर्माण झाली पाहिजे.

(३) आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधून समाजाच्या सर्वंकष उत्कर्षाला साहाय्य करण्याच्या दीर्घ व आल्हाददायक मोहिमेकरतां आग़ेकूच करण्याची इच्छा व शक्ति विद्यार्थ्याच्या वाढत्या मनांत निर्माण करणें हा सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाचा तिसरा हेतु आहे. स्वतंत्र व स्वयंप्रज्ञ व्यक्तींच्या सुसंगत सहकार्यांतूनच आदर्श समाजजीवन आकारास येऊं शकतें, असा विश्वास विद्यार्थ्याच्या ठायीं निर्माण झाला पाहिजे.

ज्या शाळांच्या मार्फत आपणांस वरील सारे उद्देश हस्तगत करायचे आहेत त्या शाळांकडे आतां आपण आपला मोर्चा वळवूं या. विद्यार्थ्याला त्याच्या उदरनिर्वाहाचें साधन उपलब्ध करून देण्याचा पहिला उद्देश शाळा कशी पार पाडूं शकेल ? पेस्टालोझीच्या काळांतील स्वित्झर्लण्ड मधील समाज अथवा गांधीजींच्या स्वप्नांतील ग्रामीण समाज जितका बालबोध व साधासुधा होता तितकाच तो आज असता तर त्या समाजांतील विद्यार्थ्यांच्या धंदेशिक्षणाची शाळेंत सोय करणें सोपें झालें असतें. आपल्या देशांत उद्योगधंद्यांची बेसुमार वाढ झाली असल्यामुळें धंदेशिक्षणाचें काम गुंतागुंतीचें झालें आहे. परंतु त्यामुळें आपण गोंधळून जाण्याचें कारण नाहीं. आज घटकेला शाळेचा कालावधि जास्तींत जास्त म्हणजे सात किंवा आठ वर्षांचा धरतां येईल. एवढ्या काळांत

विद्यार्थ्याला उपजीविकेच्या उद्योगांत वाकबगार करणें शक्य नाही. तेव्हां या काळांत शाळेने प्रत्येक विद्यार्थ्यांत कांहीं किमान बुद्धिचापल्य व हस्तकौशल्य निर्माण केलें पाहिजे. या प्राथमिक तयारीच्या पायावर पुढे त्याला आपलें समाजांतील स्थान योग्य प्रकारें भूषवितां आलें पाहिजे. समाजांतील बहुतेक कामांत शारीरिक काबाडकष्ट अनिवार्य असतात, हें विसरून चालणार नाही.

समाजांतील बहुसंख्य मुलामुलींना त्यांच्या दैनंदिन जीवनाकरतां शिक्षण देण्याच्या कामीं पुस्तकी शाळा निरुपयोगी आहेत, ही गोष्ट उघड आहे. त्यांच्याकरतां ज्या शाळा काढायच्या त्यांत शारीरिक उद्योगाच्या द्वारा शिक्षण देण्याची व्यवस्था असली पाहिजे. समाजांत केवळ तात्त्विक व कागदी कामाची संख्या अगदी मोजकी आहे. ज्या मुलांना भावी आयुष्यांत अशी बैठी कामेंच करायचीं असतील त्यांचेकरितां वेगळया स्वरूपाच्या शाळा असाव्यात असें कोणी म्हणू शकेल. परंतु बुद्धिजीवी बापांचीं मुलें बुद्धिजीवीच झालीं पाहिजेत असें कोणी सांगितलें आहे ? आणि या मुलांत सुद्धा कित्येकदा क्रियाशील प्रवृत्तीचा भरपूर पुरावा मिळतो. मग मुलाची उपजत प्रवृत्ति उद्योगी आहे कीं पुस्तकी आहे हें तरी ओळखणार कसें ?

तेव्हां आपणाला ज्या शाळा काढायच्या आहेत त्या उद्योगप्रधान शाळाच हव्यात. जोंपर्यन्त एखाद्या विद्यार्थ्यांतील तात्त्विक व्यासंगाची उपजत प्रवृत्ति स्पष्टपणें प्रकट होत नाही तोंपर्यन्त सर्व विद्यार्थ्यांना उद्योगप्रधान शाळेंतच ठेवलें पाहिजे. मी आपल्या दुसऱ्या व्याख्यानांत अगदीं खणखणीत शब्दांत सांगितलें आहे कीं उद्योगाद्वारें दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत बौद्धिक पूर्वतयारी व बौद्धिक चिकित्सा यांना फार मोठें स्थान आहे. तेव्हां शारीरिक अथवा बौद्धिक व्यवसायाकरतां विद्यार्थी तयार करायचे असले तरी दोघांनाहि उद्योगप्रधान शाळेंत शिक्षण दिल्याने कांहीं नुकसान होणार नाहीं. उद्योगप्रधान शाळांची घडी नीट बसविण्यांत आली तर त्यांतून शहरें, खेडीं, शेतें, कारखाने, कचेऱ्या व प्रयोगशाळा या सर्व क्षेत्रांत सारख्याच कार्यक्षमतेने चमकणारे नागरिक निर्माण करणें शक्य आहे. या शाळांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अंगीं अनेक चांगल्या सवयी जडलेल्या आढळतील. त्यांचें अंगीं उद्योगीपणा राहील. आपल्या समोरील समस्या सोडविण्याकरतां तर्कशुद्ध विचार करण्याची प्रवृत्ति राहील. निवडलेल्या साधनांची साधकबाधक तुलना करण्याची तयारी राहील. स्वीकारलेलें काम जास्तींत जास्त कसोशीने पार पाडण्याची जिद्द राहील. सृष्टीच्या निष्ठुर

क्र. ७७५०९

नियमांसमोर आपल्या खाजगी लहरीवर पाणी सोडण्याचा शहाणपणा राहील. प्रयत्नांची पराकाष्ठा करून प्रावीण्य संपादन करण्याची हौस राहील व सरते-शेवटीं आपल्या कर्तबगारीचें कठोर आत्मपरीक्षण करून अधिक भरीव यश प्राप्त करण्याची गुरुकिल्ली त्यांच्या हातीं राहील. उद्योगप्रधान शाळेंत वरील सर्व सद्‌गुणांची जोपासना करण्याची तरतूद केली जाईल. आपल्यापैकी कित्ये-कांनी शालेय शिक्षणावर किती तरी जास्त वर्षें खर्ची घालवूनहि इतके सारे सद्‌गुण जोडले असतील कीं नाहीं याविषयीं मला शंकाच आहे. उद्योगप्रधान शाळांचें योग्य प्रकारें संघटन केलें तर वरील सर्व सद्‌गुणांची जोपासना करण्यांत त्यांना यश येईल याविषयीं मला मुळींच शंका नाहीं. आतापर्यन्त आपण ज्या बुनियादी शाळा स्थापन केल्या त्यांना भरीव यश आलें नसलें तर त्याचा अर्थ इतकाच कीं आपल्या पिढीला उद्योगाचें माहात्म्य कळलें असलें तरी वळलेलें नाही. आपल्या पिढीच्या शिक्षणाला उद्योगाची जोड मिळालेली नाहीं.

शारीरिक उद्योगाला शिक्षणांत प्रमुख स्थान दिल्याने सार्वत्रिक शिक्ष-णाचा उद्देश सफल होऊं शकेल ही गोष्ट मी अगदीं स्पष्ट केली आहे असें मला वाटतें. आपला धंदा म्हणजे केवळ पोटपूजेचें साधन नसून सुसंघटित व सहकारी समाजांतील लोकसेवेचें तें एक दालन आहे ही जाणीव विद्यार्थ्यांच्या अंतःकरणा-वर बिंबवून त्याला नैतिक पाठ व धडे देण्याचा दुसरा उद्देशहि उद्योगप्रधान शाळांत सफल होऊं शकतो असें माझें मत आहे. उद्योगप्रधान शाळांत विद्यार्थ्यां-च्या वयोमानानुसार सहकारी जीवनाचा मूर्तिमंत आदर्श उभा केला पाहिजे. शाळेंतील वातावरणांत दिलदार व खिलाडू वृतीचा व भ्रातृभावाचा आविष्कार झाला पाहिजे. गूढ भासणाऱ्या गोष्टींची चिकित्सा करून निसर्गांतील व इति-हासांतील सत्य शोधून काढण्याची जिज्ञासा जागी झाली पाहिजे. सौंदर्याच्या दर्शनानें प्रसन्न होऊन सुंदर वस्तु निर्माण करण्याची हौस वाढीस लागली पाहिजे. निर्मळतेची आवड अंगीं बाणली पाहिजे. दुर्बळांना साहाय्य करण्याची तत्परता प्रकट झाली पाहिजे. आपल्या मनांतील विचार निर्भीडपणें बोलण्याची संवय जडली पाहिजे. नेमून दिलेली कामगिरी उत्तम प्रकारें बजावण्यांत पुरुषार्थ वाटला पाहिजे. शाळेच्या सामुदायिक हिताकरतां कोणतेंहि काम करण्याची तयारी अथवा प्रसंग पडल्यास मागे हटण्याची तयारी, संघवृत्तीने खेळ खेळणें, इत्यादि अनेक सद्‌गुणांची जोपासना शाळेंतील सामुदायिक वाता-वरणांत जाणून बुजून केली जाऊं शकते. समुदायाकरतां केलेल्या श्रमांतून सेवा-

भाव जागृत होतो आणि चारित्र्याची घडण होते. चारित्र्य हा शब्द हल्लीं फार निष्काळजीपणें वापरला जातो. त्यांत वरील साऱ्या सद्‌गुणांचा समावेश आहे. श्रमावर आधारलेल्या या सामूहिक जीवनांत विद्यार्थ्यांचा अनेकांशी अनेक प्रकारचा सहेतुक संपर्क येतो आणि त्याच्या हृदयांत समाजाभिमुखता व सहानुभूतीच्या नाजुक भावना निर्माण होतात. या भावनाहि चारित्र्याच्या विकासाला पोषक आहेत. शाळेंतील सामुदायिक वातावरणांत कर्तव्यपरायणतेचा सद्‌गुणहि वाढीस लागतो.

शाळेंतील उद्योगशील वातावरणांत श्रमाचा आपला वाटा उचलतांना होणारें अनिर्वचनीय सुख व समाधान ज्यांनी एकदा लुटलें आहे असे विद्यार्थी मोठेपणीं आपल्या भोवतीं तसेंच वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. म्हणूनच साऱ्या जगांत अशा प्रकारच्या सामूहिक जीवन निर्माण करणाऱ्या शाळा स्थापन करण्याचे प्रयोग केले जात आहेत. आपल्या देशांतील शिक्षणाचा अधिक गंभीरपणें विचार करावयाचा असेल तर आपणांसहि असे प्रयोग करावे लागतील. असे प्रयोग सध्याच्या महागड्या पब्लिक स्कूलसमध्यें करून भागणार नाहीं. कारण आपल्याला सर्व लोकांच्या सर्व मुलांना आदर्श शिक्षण द्यायचें आहे. आपल्या देशांतील श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञांनी सक्तीच्या शिक्षणाच्या शाळांचें रूपांतर उद्योगप्रधान समुदायांत कसें करतां येईल याचा तांतडीने विचार केला पाहिजे.

आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधून समाजाच्या सर्वंकष उत्कर्षाला साहाय्य करण्याची हार्दिक इच्छा विद्यार्थ्यांच्या वाढत्या मनांत निर्माण करण्याचा तिसरा उद्देश सक्तीच्या शाळेंत सफल होईल काय ? सक्तीच्या शाळेंतील वयोमर्यादा लक्षांत घेतां त्या अवस्थेंतील विद्यार्थ्यांचें मन अगदीं कोवळें असतें आणि त्या अवस्थेंत वरील उद्देशाचें सूतोवाच तेवढें करतां येईल. चवदाव्यां वर्षीच विद्यार्थ्याला शाळेंतून सुटी द्यायची असेल तर तेवढें सूतोवाच सुद्धां करणें अशक्य आहे.

वर वर्णिलेल्या पद्धतीने व वर उल्लेखिलेल्या उद्देशांकरतां सक्तीचें व मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करायची असेल तर मुख्य प्रश्न असा पडतो कीं या शिक्षणाकरतां देशांतील समग्र लोकसंख्येपैकीं कोणत्या गटाची निवड करावी ?

शिक्षणाचे वरील उद्देश ध्यानीं घेतां, या शिक्षणाकरतां सातव्या वर्षापर्यन्तच्या बालकांची निवड करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. हें क्रीडेचें वय आहे.

क्रीडेला उद्देश माहीत नसतो हें मी आधीच सांगून चुकलों आहे. तेव्हां सातव्या वर्षापर्यंत शिक्षणाद्वारें वरील तीन उद्देश साधण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सक्तीच्या सहकारी शिक्षण संस्थांमध्यें कांही काल शिक्षण घेण्याकरतां २१ वर्षांवरील वयाच्या परिपक्व माणसांची निवड करणें इष्ट होईल काय ? ही गोष्ट प्रथमदर्शनीं जितकी विचित्र वाटते तितकी नवलाची ती खास नाही. परंतु जीवनांतील आर्थिक गरजांमुळें असें करणें कठीण आहे, तरी सुध्दा शहाण्या शिक्षकांच्या देखरेखीखाली श्रमशिबिरें चालविण्यांत आलीं आणि त्यांत प्रौढ लोकांना कांहीं काळ सक्तीने भरती करण्यांत आलें तर फार मोठा लाभ होण्याचा संभव आहे. त्यामुळें नुसतीच तोंडपाटीलकी करणाऱ्या लोकांना आपल्या अहर्निश बडबडीचा अर्थ थोडा फार तरी उमगेल. शिस्तबद्ध राष्ट्रीय जीवन व सुजाण नागरिक निर्माण करण्याच्या कार्यांत शिक्षण संस्थांना मदत करण्याकरतां कित्येक देशांत अशा प्रकारच्या श्रमिक अथवा सैनिक शिबिरांचा उपयोग केला जातो. परंतु आपल्या देशांतील आयुर्मर्यादा इतकी कमी आहे कीं २१ व्या वर्षानंतर सक्तीचें शिक्षण सुरू केलें तर बहुतेक लोकांना त्यापासून कांहीं लाभ होणार नाही. आणि झाला तरी अधिक काल त्याचा जनसेवेकरतां उपयोग करतां येणार नाही.

म्हणून आपल्याला ७ ते १४ वर्षांच्या व १४ ते २१ वर्षांच्या वय-गटाचाच विचार करणें भाग आहे. या दोन वय-गटांत कांहीं वेगळालीं स्वभाव-वैशिष्टचें दिसून येतात. १४ ते २१ वर्षांच्या वयांत सक्तीच्या शिक्षणांतील दुसरें व तिसरें उद्दिष्ट हस्तगत करणें अधिक सुकर होईल. याच वयांत पहिलें उद्दिष्ट हस्तगत करणेंहि अधिक सोपें ठरण्याचा संभव आहे. परंतु या वयोमर्यादेच्या बाबतींत तीन महत्त्वाच्या अडचणी आहेत. १४ ते २१ वर्षें वयाचीं कित्येक मुलें-मुली भाकरी कमविण्याच्या कामीं आपल्या कुटुंबाला हातभार लावीत असतात. त्या वयांतील कित्येक मुलींचें नुकतेंच लग्न होऊन मूलबाळ झालें असण्याचाहि संभव असतो. या वयांतील मुलामुलींच्या उपजत आवडीनिवडींचा व सहजप्रवृत्तींचा आढावा घेऊन त्यांच्याकरिता उपजीविकेचा सर्वोत्तम व्यवसाय निश्चित करण्याच्या बाबतींत फार विलंब झालेला असेल आणि या वयांत प्रकट होणाऱ्या विविध बहिर्मुख प्रवृत्तींना पोषक असलेल्या उद्योगांची तरतूद करणें फार गुंतागुंतीचे होऊन बसेल. शैक्षणिक दृष्टीने ही तिसरी अडचण तर सर्वांत बिकट आहे.

राहतां राहिला ७ ते १४ वर्षापर्यन्तचा काळ. सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाकरतां याच काळाची निवड करणें सयुक्तिक दिसतें. मात्र सुरुवातीलाच हें सांगून टाकणें अवश्य आहे कीं कांहीं झालें तरी वयाच्या १४ व्या वर्षापर्यन्त मुलाला शिकविलेंच पाहिजे. शिक्षणाचा आरंभ वाटेल तेव्हा करा. परन्तु १४ व्या वर्षांपूर्वी शिक्षणाचा शेवट होतां कामा नये. कांहीं लोकांच्या मतें शिक्षण जितक्या लौकर सुरू होईल तितकें चांगलें. या लोकांना खूष करण्याकरतां पाहिजे तर जन्मापासूनहि शिक्षणाची सोय करा, माझी ना नाही. सहाव्या वर्षी शिक्षणाला आरंभ करण्याचें धोरण आपल्या सरकारने स्वीकारलें आहे असें दिसतें. कांहीं हरकत नाही. मात्र जन्मतः शिक्षण देण्याचें ठरविलें तर १४ वर्षे शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे, व सहाव्या वर्षापासून शिक्षण देण्याचें ठरविलें तर ८ वर्षे शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. वयाच्या चवदाव्या वर्षापर्यंत शिक्षण देण्याची गोष्ट सर्वानुमतें मान्य झाली आहे, असें दिसतें. मी ज्या उद्देशाला अनिवार्य सार्वत्रिक शिक्षणाचा आत्मा समजतों त्या दृष्टीने शिक्षणाची सुरुवात लवकर करण्यापेक्षा त्याचा शेवट उशीरा करणें अधिक महत्त्वाचें आहे, असें मला वाटतें. माझें स्वतःचें तर स्पष्ट मत आहे कीं आपण जर एकूण ८ वर्षे सक्तीचें सार्वत्रिक शिक्षण देण्याचें ठरविणार असलों तर ६ ते १४ पेक्षा ७ ते १५ वर्षापर्यन्त शिक्षण देणें अधिक लाभदायक होईल. असो. शिक्षणाची सुरुवात तुम्ही कोठेहि करा, मात्र चवदाव्या वर्षापूर्वीच जर शिक्षण संपुष्टांत आलें तर स्वतंत्र समाजांत ज्या हेतुकरतां सक्तीचें शिक्षण द्यायचें त्या हेतूचीच हानि होईल.

आपण दिलेलीं आश्वासनें कितीहि गैरसोयीचीं असलीं तरी त्यांची आठवण ठेवणं इष्ट आहे. आपणांस आठवत असेल कीं स्वतंत्र भारताची राज्यघटना लागू झाल्यानंतर दहा वर्षाच्या आंत देशांतील मुलांमुलींना वयाच्या चवदाव्या वर्षापर्यन्त सक्तीचें मोफत शिक्षण देण्यांत यावें, असा निर्देश भारतीय राज्यघटनेंत दिला आहे. या निर्देशांत सक्तीचें शिक्षण सुरू केव्हा करण्यांत यावें याचा उल्लेख दूरदर्शीपणाने व समंजसपणाने गाळला आहे; मात्र किती वयापर्यन्त हें शिक्षण दिलें–घेतलें जाईल याचा उल्लेख स्पष्ट आहे. या निर्देशाचें पालन करण्याच्या बाबतींत आपण कांहींहि प्रगति केलेली नाही हें आपण जाणतांच. राज्यघटनेंत कोरलेल्या या वचनाची पूर्ति कधी ना कधी तरी होईल असें चिन्हहि कोठें दिसत नाही. हें वचन पाळण्याकरतां पाहिजे तेवढा

अनुक्रम ३३०५२ वि: १७/५
२३०५ नों दि:



पैसा आमच्या जवळ नाही असें सांगण्यांत येतें. या खुलाशाविरुध्द मी आज वाद घालीत नाहीं. परन्तु मला हा खुलासा पटत नाही. एवढें मात्र सांगून ठेवतों—ज्या गोष्टी करण्यासंबंधी राज्यघटनेंत कोठेंहि आदेश दिलेला नाही अशा गोष्टी करण्याकरतां आमच्याजवळ भरपूर पैसा होता व आहेहि. लोकशाहींतील योजना लोकांच्या इच्छेनुसार आंखली गेली पाहिजे. लोकांची इच्छा त्यांनी स्वीकारलेल्या राज्यघटनेंत स्पष्टपणें व निर्णायक शब्दांत प्रकट झाली आहे. जनतेचा पैसा राज्य-घटनेंत सांगितलेल्या कामाऐवजीं इतर गोष्टींवर खर्च करण्याच्या योजना आखतांना राज्यकर्त्यांनी शंभरदा विचार केला पाहिजे. परंतु मी आधीच म्हटल्याप्रमाणें, सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाकरतां आमच्याजवळ पैसाच नव्हता या खुलाशाविरुध्द वाद घालण्याचा माझा इरादा नाही. ६ ते १४ किंवा ७ ते १४ वर्षें वयाच्या गटांतील सर्व मुलांना शिक्षण देण्याकरतां आमच्याजवळ पैसा नव्हता ही गोष्ट मी घटकाभर मान्य करतों. परन्तु सक्तीच्या शिक्षणाची नवीन वयोमर्यादा ६ ते ११ कां करण्यांत आली, अन् ९ ते १४ कां करण्यांत आली नाही, हें कोडें मला उलगडूं शकत नाहीं. ज्या देशांत शिक्षणाला यथायोग्य महत्त्व दिलें जातें अशा कोणत्याहि देशांतील सक्तीच्या शिक्षणाचे कायदे पहा. सहसा कोठेंहि विद्यार्थ्यांना चवदाव्या वर्षापूर्वीं सक्तीच्या शाळेंतून बाहेर पडूं देत नाहींत. उलट हें वय आणखी वाढविण्याची खटपट तेथें चालू आहे. कांही देशांत तर तें १५,१६ व १८ पर्यन्तहि वाढविण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें या निरनिराळ्या देशांत सक्तीच्या शिक्षणाची सुरुवात उशीरा होते असें आपणांस आढळून येईल. बहुधा ७ व्या वर्षीं, कित्येकदा ८ व्या वर्षीं आणि कधी कधी तर ९ व्या वर्षीं शिक्षणाला सुरुवात होते. झाड छाटायचें झालें तर शेंडा कापतात, त्याच यांत्रिक त-हेने आपल्या देशांत सक्तीच्या शिक्षणाच्या वयाची काटछाट केली आहे कीं काय न कळे. कदाचित् कोवळें वय शिक्षणाला अधिक अनुकूल असतें या कल्पनेने पछाडल्यामुळें ६ ते ११ हें वय निवडण्यांत आले असेल. किंवा सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाचे खरे उद्देश काय आहेत याचा थांगपत्ता नसल्यामुळें हें असें घडलें असावें. फक्त ५ वर्ष सक्तीचें मोफत शिक्षण देण्याइतपतच आमची ऐपत असेल तर तें शिक्षण ९ ते १४ वय-गटांतील मुला-मुलींना देण्यांत यावें, असें माझें स्पष्ट मत आहे.

आपल्या देशांत आतांपर्यन्त उद्योगप्रधान शाळा स्थापन करण्याचे जे

प्रयत्न झाले आहेत त्यांसंबंधी मी कांही बोलणें अवश्य आहे असें मला वाटतें. याच शाळांना बुनियादी शाळा म्हणून ओळखलें जातें. मी अनेक बुनियादी शाळा पाहिल्या आहेत आणि त्या अनुभवाचे आधारावरच बोलणार आहें. मी या विषयाचें शास्त्रशुद्ध व सांगोपांग अध्ययन केलेलें नाहीं, किंवा संपूर्ण भारतांतील सर्व बुनियादी शाळांचें निरीक्षणहि केलेलें नाहीं. परंतु बुनियादी शाळांच्या आशा-आकांक्षा काय असाव्यात याची थोड़ी फार कल्पना असल्यामुळें व बुनियादी शाळांचे प्रत्यक्ष नमुने बरेचसे पाहिले असल्यामुळे मी माझी भावना आपणाजवळ बोलून दाखविणार आहे. मला असें वाटतें की व्यवस्थित चालविलेल्या उद्योगप्रधान शाळेच्या द्वारें जे उद्देश सहज साध्य होतात ते साधण्यांत आम्हांला यश आलें नाहीं असेंच म्हणावें लागेल. याला अनेक कारणें आहेत. शाळा खात्याच्या व्यवस्थेंत बरेच दोष आहेत. सामग्रीच्या जुळवाजुळवींतील त्रुटीहि अनेक ठिकाणीं अनेक प्रकारें प्रकट होतात. परन्तु आमच्या अपयशाचें आणखी एक महत्त्वाचें कारण आहे. मी पहिल्या व्याख्यानांत शैक्षणिक उद्योगाला बौद्धिक पूर्वतयारीची व चिकित्सेची जोड कशी द्यावी लागते हें सविस्तर सांगितलें आहे. आमच्या बुनियादी शाळांतून या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें. आज आपल्या देशांत पुस्तकी ज्ञान देणाया हजारों शाळा आहेत. आमच्या शहाणपणामुळे आम्ही या शाळाचें रूपांतर घोकंपट्टी करविणाया पाठशाळांत करून टाकलें आहे. हें रूपांतर होत असतांना कोणी बिरोधाचा सूर सुध्दां काढला नाहीं. उलट या शाळांची संख्या फुलतच गेली. बुनियादी शाळांचें असेंच कांहीसें विपरीत रूपांतर झालें आहे. उद्योगांतील बौद्धिक अंशाकडे दुर्लक्ष केल्यामुळे आमच्या कित्येक बुनियादी शाळांतील उद्योग केवळ यांत्रिकपणें केले जातात. विद्यार्थ्यांवर ठराविक काम लादलें जातें. स्वयं-प्रेरणेचा मागमूसहि कोठें आढळत नाहीं. आपल्या उद्योगाच्या सामाजिक व वैयक्तिक हेतुसंबंधी विद्यार्थ्याला कसलीहि जाणीव नसते. कामाला सुरुवात करतांना त्याच्या मनांत कदाचित् थोडी फार जिज्ञासा असेल आणि हातपाय हलविण्याची हौस असेल. बस्स, याखेरीज त्या कामासंबंधी आणखी कांहीं रुचि विद्यार्थ्याच्या मनांत नसते. तो केवळ सांगकामेपणाने काम करतो. त्याच्या समोर कोणत्याहि समस्या नसतात. अर्थात् त्यामुळें त्या सोडविण्याकरतां बुद्धीला शीण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. नसलेली समस्या सोडविण्याकरतां निरनिराळया उपायांची

तुलना करण्याचा प्रसंगहि येऊं शकत नाहीं. निदान शिक्षक व विद्यार्थी यांचे दरम्यान तरी संयुक्त प्रयोगाची भूमिका असावी, परन्तु तेंहि नाही. शिक्षक विद्यार्थ्यांला नेमून दिलेलें काम अमुक अमुक प्रकारें कर म्हणून फर्मावितात. संशोधनाची नुसती बतावणी सुद्धा केली जात नाही. मग त्या कामांतून आनंद कसचा मिळणार ? नित्य नेमाने नसलें तरी बहुधा विद्यार्थ्याला कांहीं ना कांही काम करायला लावण्यांत येतें. परन्तु या कामांतून निष्पन्न होणाऱ्या फळाची चांचणी कोणी करीत नाही. हा तर नैमित्तिक व्यवसायाचा प्रकार झाला, कसोशीच्या उद्योगाचा नव्हे. शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांतील क्रियाशील प्रवृत्तीला नित्याच्या उद्योगाप्रत प्रगत करण्याचा असला पाहिजे. नित्याच्या उद्योगांत वाकबगारी अवश्य असते. जो माल तयार करायचा तो चांगला असला पाहिजे, अगदीं सर्वोत्कृष्ट असला पाहिजे, आशी धडपड तेथें दिसली पाहिजे. जेव्हां एखादा शाळाधिकारी अथवा 'मोठा माणूस शाळेला भेट देणार असतो तेव्हाच शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांच्या कामाकडे थोडे फार लक्ष देतो. या पाहुण्यांचें वर्गीकरण कसें करायचें हें शिक्षकांना चांगलें समजते. कोणचा पाहुणा बुनियादी शाळेला वायफळ वेड समजतो आणि कोण तिच्याकडे जरा बारकाईने पाहील हें त्यांना माहीत असतें. पहिल्या प्रकारच्या पाहुण्यांना कामबीम कांहीं दाखविलें जात नाहीं. शाळेची सभा भरवून पाहुण्यांना हार घालण्यांत येतो, स्वागतगीत होतें व पाहुण्याचें भाषण होतें. नंतर नकळत ते चहाच्या पेल्याकडे चालूं लागतात. मात्र बुनियादी शिक्षण-वाला पाहुणा असला तर साहजिकच त्याला कांहीं काम दाखवावें लागतें आणि तसें तें रीतसर दाखविलेंहि जातें. टकळया व चरखे घरघरत असतात. टकळयांवर व चात्यांवर बारीक सुताचे लट्ठ गुंडे आधीच लपेटलेले असतात. परन्तु प्रत्यक्ष सूतकताई करणाऱ्या विद्यार्थ्याचें सूत मात्र जाडेंभरडें असते आणि तुमच्यासमोर वारंवार तुटत असतें. या विद्यार्थ्यांचा हा नित्याचा उद्योग नसून नैमित्तिक व्यवसाय आहे ही गोष्ट उघड असते. शिक्षकांनी अथवा कुशल विद्यार्थ्यांनी आधीच काढून ठेविलेलें चांगलें सूत चातीवर गुंडाळल्यानें सत्य झांकलें जात नाहीं. आलेला पाहुणा कामाच्या दर्जाऐवजीं कामाचा ढीग पाहूनच खूश होणारा आहे असें शिक्षकांनी हेरलें तर ते त्याला कोपऱ्यांतील एका घडवंचीवर घाणेरड्या परदेशी कपड्याखाली झांकलेल्या ढिगाऱ्याकडे घेऊन जातात. हुशार शिक्षक हा अगदी मनकवडा असतो 'मोठ्या माणसांचें

मानसशास्त्र तो बरोबर हेरतो. आजकाल मोठ्या माणसांच्या भेटींचे प्रमाणहि फार वाढलें आहे. कारण मोठ्या माणासांच्या मागे दुसरी कांहीं कामें नसतातच. असो. पाहुण्याला जिज्ञासा वाटली अगर आपल्याला जिज्ञासा आहे असा आव आणावासा वाटला आणि त्याच्या स्वच्छतेच्या कल्पना फार नाजुक नसल्या तर तो त्या ढिगाऱ्यावरील जादूचा कपडा उचलून पाहील. तेथे त्याला काय दिसेल ? पीळ सुटलेल्या, मळक्या, तुटक्या सुताचीं गुंतलेलीं भेंडोळीं त्याला तेथें आढळून येतील. या जुन्यापुराण्या धाग्यांना सूत म्हणणें सुद्धां शोभत नाहीं. एखाद्या शापभ्रष्ट देवदूतानें कांहीं काळ नरक यातना भोगून पुन्हा स्वर्गांत प्रवेश करावा त्याप्रमाणें तीं सुताचीं भेंडोळीं पुन्हा शुद्ध कापसाचें रूप धारण करीत आहेत, असा भास निर्माण होतो. त्या निष्पाप धाग्यांना तर निश्चित असें वाटत असेल कीं कांहीं दुष्ट व गर्विष्ट मुलामुलींनी आपल्या शिक्षकांच्या सांगण्यावरून आपल्याला आपल्या स्वर्गीय नैसर्गिक अवस्थेंतून विनाकारण खेचून काढलें. आणि हा सारा खटाटोप कशाकरतां ? कापसाला धुनकून, पिंजून, कातून, वळून, गुंडाळून व उलगडून त्याचें कापड विणण्यांत आलें असतें व एखाद्या माणसाचें उघडें शरीर झांकण्यासाठीं त्याचा उपयोग करण्यांत आला असता तर त्या धाग्यांना समाधान लाभलें असतें. त्यामुळें मुलांच्या सर्व खटाटोपाला कांही अर्थ प्राप्त झाला असता. परन्तु बुनियादी शाळांतून उद्योगाची जी फरफट केली जाते त्यांतून कोणताच लाभ पदरीं पडत नाहीं.

बुद्धीला शीण न देतां केवळ यांत्रिकपणें थातुरमातुर काम केल्याने कामाचें फळ सर्वोत्कृष्ट बनावे अशी जिद्द न बाळगतां काम केल्याने, आणि काम सुधारण्याकरतां स्वतः च आपल्या कामाची कठोर आत्मचिकित्सा न केल्याने, त्या कामाची शैक्षणिक उपयुक्तता नाहींशी होते. ज्या शाळांत अशा प्रकारचें बिगारी काम केलें जातें त्या शाळांना उद्योगप्रधान अथवा बुनियादी शाळा म्हणतां येणार नाहीं.

याशिवाय बुनियादी शाळांच्या मार्गांत शाळाखात्याने निर्माण केलेल्या अडचणी आहेत. त्यांतील दोन अडचणींचा मी उल्लेख करतों. बुनियादी शाळा भारतीय शिक्षणाच्या शांत प्रवाहांत आगंतुक व निष्कारण लुडबुड करीत आहेत अशी पुष्कळांची भावना आहे. बुनियादी शाळांतून बाहेर पडणाऱ्या मुला-मुलींना पुढे माध्यमिक शाळांत प्रवेश मिळणें जड जातें किंवा कधी कधी

तर अशक्य होतें. म्हणून त्यांच्या सोयीकरता उत्तर-बुनियादी शाळा स्थापन केल्या आहेत. पण त्यांची संख्या फार कमी आहे. उत्तर–बुनियादी शाळांतील अभ्यासक्रम पार केल्यानंतर विद्यार्थ्याला विश्वविद्यालयाचें दार बंद आढळतें. त्यानें आपल्या आयुष्यांतील बारा वर्षें सरकार-संचालित बुनियादी शिक्षणांत घालविलीं असतात. आणि भावी भारतांतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बुनियादी धर्तीवर रचलें जाणार आहे अशी घोषणा अहर्निश केली जात असते. पण हें बुनियादी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षणाचीं दारें बंद आहेत. कारण विश्वविद्यालयें स्वायत्त आहेत ना ! त्यांना सरकार हुकूम देऊं शकत नाही. विश्वविद्यालयांना खरीखुरी स्वायत्तता असावी असें माझें सुद्धां मत आहे. परंतु विद्यार्थी नालायक आहे म्हणून त्याला प्रवेश नाकारण्याचें धैर्य दाखविणारें विश्वविद्यालय माझ्या पाहण्यांत आलेलें नाही. शिक्षण खात्याच्या सेकंडरी व इंटरमीजिएट बोर्डाच्या सहीशिक्क्यांचें प्रमाण-पत्र घेऊन लाखो विद्यार्थी विश्वविद्यालयांच्या दारांशी रांग लावतात. खुद्द विश्वविद्यालयांतील विद्वानांनाहि माहीत असते कीं त्यांपैकी कित्येक विद्यार्थ्यांत आजचें विश्वविद्यालयीन शिक्षण पचविण्याची पात्रता नाही. तरीहि त्यांना रीतसर प्रवेश दिला जातो. परंतु उत्तर-बुनियादीपर्यन्त शिकलेल्या व शालेय शिक्षणांत इतरांपेक्षा १-२ वर्षें अधिक वेंचलेल्या विद्यार्थ्याला मात्र विश्वविद्या-लयांत प्रवेश नाही. आमच्या शिक्षणव्यवस्थेंत सध्या कसा सावळा गोंधळ माजला आहे याचें हें उदाहरण आहे. यावर ताबडतोब कांहीं इलाज केला पाहिजे.

आजसुद्धा कित्येक बुनियादी शाळा इतर पुस्तकी शाळांपेक्षा सरस विद्यादान करीत आहेत. कारण भोंवतालच्या समाजजीवनाशी त्यांचा अधिक घनिष्ट संबंध आहे व समान आदर्शांवर आधारलेल्या सहकारी समूहांचें स्वरूप त्यांना प्राप्त झालें आहे. तेथील उद्योगांत कांहीहि दोष असले तरी विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार त्यांच्या क्रियाशीलतेला तेथें वाव मिळतो. त्यामुळें या शाळेंतील विद्यार्थ्यांत कांही भरीव गुणाचा विकास होतो. परंतु एवढ्यानें संतोष मानणें योग्य नव्हे. बुनियादी शाळा शैक्षणिक उद्योगाद्वारें विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास करणारी आदर्श विद्यामंदिरें बनेपर्यंत आपणांस चैन पडतां कामा नये. याकरतां दृढ निश्चयाची व कठोर परिश्रमांची गरज आहे. बुनियादी शिक्षणांतील उद्योगाला जो नियम लागू आहे तोच नियम शिक्षण-शास्त्रांतील

या प्रयोगालाहि लागू आहे. **"विचार करून काम करा, आणि काम करतां करतां विचार करा"** हाच तो बहुमूल्य नियम आहे. गांधीजींसारख्या थोर पुरुषाने बुनियादी शिक्षणाची कल्पना बीस वर्षापूर्वी आपणासमोर ठेवली आणि आज इतक्या वर्षांनंतरहि बुनियादी शिक्षणाचें घोंगडें भिजतच पडलें आहे ही शरमेची गोष्ट नाहीं काय ? शाळाखात्याचीं धोरणें ठरविणाऱ्या, त्याच-प्रमाणे तीं अंमलांत आणणाऱ्या मोठमोठ्या अधिकारी व्यक्तींचे उद्गार ऐकिले म्हणजे अशी शंका येते कीं आपणांस उद्योगप्रधान शाळा हव्या आहेत कीं नाहीं. ही जबाबदार माणसें सभासमारंभांतून कांहीं बोलणार नाहींत. पण खाजगी गप्पांतून त्यांची मनॉतली भावना प्रकट होते. आज बुनियादी शिक्षणाची फर-फट चालली आहे व त्यामुळें तें अयशस्वी ठरत आहे. ही परिस्थिति सुधारायची असेल तर कांहीं उपाययोजना करणें अवश्य आहे.

उद्योगप्रधान शिक्षण निरुपयोगी व अव्यवहार्य आहे असें सर्वांचें मत असेल तर तसें स्पष्ट जाहीर करा आणि या साऱ्या योजनेला मूठमाती द्या. यांत तुमचा प्रामाणिकपणा दिसेल. तसें केलें तर निकट भविष्यांत उद्योगप्रधान शिक्षणाची कल्पना भारतांत पुन्हा अवतार घेईल, आणि नवीन स्फूर्तीने, नवीन जोमानें व अधिक पक्केपणाने तिची अंमलबजावणी होईल असा मला विश्वास आहे. उद्योगप्रधान शिक्षणाला खरा धोका कोणाकडून असेल तर मनांत शेंकडो शंकाकुशंका ठेवून वरपांगी त्या कल्पनेला पाठिंवा देणाऱ्या आणि बिगारी वृत्तीने तिचा प्रयोग करून तिची बदनामी करणाऱ्या लोकांकडून आहे.

बुनियादी शिक्षण कमींत कमी ७ किंवा ८ वर्षें देण्यांत यावें असें माझें मत आहे. यांत बचत करायची असेल तर ती सुरुवातीस करावी. सक्तीच्या शिक्षणाचा उद्देश थोडा फार सफल व्हायचा असेल तर वयाच्या चवदाव्या वर्षांपर्यन्त तरी शिक्षण चालू असलें पाहिजे. याहून अधिक शिक्षणाची सुद्धा अत्यंत गरज आहे. वयाच्या सहाव्या वर्षापासून चवदाव्या वर्षापर्यन्त सक्तीचें शिक्षण दिल्याने विद्यार्थी आपल्या भावी उद्योगांत पारंगत होत नाही आणि नागरिकाचीं सर्व कर्तव्यें पार पाडण्यास लायक बनत नाही याची जाणीव शिक्षणाची किंमत ओळखणाऱ्या सर्व देशांना आहे. त्यामुळे उदरनिर्वाहाच्या उद्योगाला जोडूनच त्याचें शिक्षण पुढे चालू ठेवण्याचा विचार तेथे होत आहे. वाकबगार कारागिरांच्या हाताखाली उमेदवारी करून कामधंदा शिकण्याची प्रथा तेथे लोप पावत आहे. मोलमजूरी करणाऱ्या तरुण नागरिकांचें शिक्षण

व मार्गदर्शन करण्याची जबाबदारी समाजाची आहे ही स्पष्ट जाणीव तेथें निर्माण झाली आहे. मोलमजूरी करणारे अशिक्षित व अर्धशिक्षित तरुण नागरिकत्वाच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडूं शकत नाहींत. नुकतीच मिसरूड फुटूं लागलेला तरणाबांड फार अवखळ व अवघड असतो. तो धकाधकीच्या जीवनांत प्रवेश करीत असतांना त्याचें योग्य मार्गदर्शन करणें फार अगत्याचें आहे. जगांतील जवळपास तीस देशांत सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा उलटून गेल्यानंतरहि कोणत्या ना कोणत्या प्रकारें शिक्षण चालू ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. माझी माहिती अगदी आजतागायतची नाही. कदाचित आणखी कांहीं देशांनीहि एवढ्यांत तशी व्यवस्था केली असेल. मात्र भारताचा त्यांत समावेश नाही. जर्मनींत कित्येक वर्षांपासून अशी व्यवस्था आहे. जॉर्ज केश्र्चेनस्टीनरने म्युनिच येथे केलेल्या प्रयोगामुळें जर्मनींत प्रथम फोरबिल्डुंछुलेन व नंतर बेरूस्क्षुलेन या नांवांनी ओळखल्या जाणाऱ्या संस्था विद्येचीं माहेरघरें बनल्या. त्याने घालून दिलेला कित्ता युरोपांतील व अमेरिकेतील कित्येक राज्यांनी गिरविला. सुरुवातीला या संस्था उद्योग-व्यापारांत गुंतलेल्या तरुण मंडळींना शिक्षण देत असत. आतां त्यांचा प्रसार शेतीवाडी, खाणी, घरकाम, वगैरे करणाऱ्या तरुणाकरतां झालेला आहे. सुरुवातीला या शाळा रात्रीं चालत असत. पण आतां आठवड्यांतील कांहीं तास दिवसासुद्धा या चालविण्यांत येतात. या शाळांत खर्च झालेला वेळ नोकरीच्या कामांत गणला जातो.

भारतीय शिक्षणांत अनेक सुधारणा करणें जरूर आहे. परंतु कमी अधिक महत्त्वानुसार त्यांचा क्रम लावावाच लागेल. कांहीं किमान शिक्षण सर्वच मुलांना द्यायला हवें. ही जबाबदारी पार पाडणें हें सरकारचें पहिलें कर्तव्य आहे. कमींत कमी सात वर्षांचें सक्तीचें उद्योगप्रधान शिक्षण, शाळेंत सहकारी व सामूहिक वातावरण, शिक्षणाच्या तिहेरी उद्दिष्टांचें अनुष्ठान, एकांड्या बौद्धिक शिक्षणाचें बहुरंगी, सहृदय द व्यवहारी ज्ञानांत परिवर्तन, पुस्तकी घोकंपट्टीच्या जागीं अक्कलहुशारीने आंखलेल्या, नेकीने पार पाडलेल्या, कठोरपणें पारखलेल्या व मुक्तपणें गौरविलेल्या शारीरिक परिश्रमाची स्थापना, चवदाव्या वर्षी संपणाऱ्या सक्तीच्या शिक्षणानंतर अठराव्या वर्षापर्यन्त धंदेशिक्षणाच्या संस्थेंत कांही वेळ अनिवार्य शिक्षणाची व्यवस्था, या साऱ्या गोष्टी अंमलांत आल्या तर भारतांत केवळ शुद्ध शिक्षणाचाच नव्हे तर शुद्ध व प्रगति-

शील लोकशाहीचा पाया घातला जाईल.

या कामाचा आरंभ सरकारलाच करायला हवा. परंतु या कामाचें यशापयश पुष्कळ अंशीं शिक्षकांवर व जनतेवर अवलंबून आहे.

आज माझ्या श्रोतयांमध्यें कांहीं शिक्षक हजर असणें शक्य आहे. परंतु त्यांत प्राथमिक अथवा बुनियादी शिक्षक फार थोडे असतील अशी मला शंका आहे. कारण ते लोक सहसा विज्ञानभवनाकडे फिरकत नाहींत. भारतीय नभोवाणीच्या कृपेने माझे शब्द या भवनाच्या बाहेर असलेल्या शिक्षकांच्या कानीं पडतील. परंतु त्यांतहि प्राथमिक व बुनियादी शिक्षकांची संख्या कमीच. ते इंग्रजी भाषणें बहुधा ऐकत नाहींत. मी आयुष्यांतील बहुतेक वर्षे शिक्षक म्हणून काम केलें आहे. माझ्या आयुष्यांत असे विचित्र योगायोग आलेत कीं बाल-विहारांपासून तों तहत विश्वविद्यालयांपर्यंतच्या सर्वच शैक्षणिक कार्यांशी माझा घनिष्ट संबध आला. शिक्षकाचा पेशा हा खालपासून वरपर्यन्त एकच आहे, अशी माझी भावना बनली आहे. आपल्या समाजांत जातीयता इतकी बोकाळली आहे कीं शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रांतून सुद्धा श्रेष्ठकनिष्ठाच्या कल्पना वावरूं लागतात. एखाद्या जादूने या कल्पनांचा बीमोड करून शिक्षणाच्या नाजुक कार्यांत गुंतलेल्या सर्व शिक्षकांमध्यें ऐक्याची व समानतेची भावना निर्माण करण्यांत मला यश आलें तर माझी जीवनयात्रा सफल झाली असें मला वाटेल. परंतु दारुण परिस्थितीला तोंड दिलेंच पाहिजे. कारण अशी जादूची कांडी कोठे मिळणार आहे ?

तरीहि मी येथे बसलेल्या शिक्षक-बंधूंना, आणि त्यांच्या मार्फत आपल्या विशाल देशभर पसरलेल्या सर्व शिक्षकबंधूंना उद्देशून चार शब्द बोलूं इच्छितों. मी त्यांना नवीन कांहीं सांगूं शकत नाही. तीस वर्षांपेक्षाहि अधिक काळापासून शिक्षकांना मी तीच गोष्ट सांगत आलों आहे. मला त्यांना त्यांच्या अवाढव्य उत्तरदायित्वाची आठवण करून द्यायची आहे. आपल्या देशानें अनंत हाल-अपेष्टा सोसून स्वातंत्र्य मिळविलें आहे. या स्वातंत्र्याच्या पायावर राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याचें मंदिर उभारण्याचा प्रयत्न भारतीय जनता करीत आहे. शिक्षक वर्ग स्वतः सुशिक्षित आहे. त्यांच्यांतील स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्त्वाचा व चारित्र्याचा विकास झालेला आहे. ज्या जनतेला ते शिक्षण देत आहेत तिच्या नैतिक विकासाबद्दल त्यांना कळकळ वाटली पाहिजे. आपल्या देशांतील सर्व-श्रेष्ठ आदर्शांचें संरक्षण करण्याचा भार शिक्षकांच्या शिरावर आहे. मानवाच्या

संस्कृतीने जीं जीं सुन्दर उपकरणें निर्माण केलीं आहेत त्या सर्वांचें प्रतिबिंब शिक्षक वर्गांत पाहवयास मिळतें. स्वतःला शिक्षक म्हणविणाऱ्या एखाद्या माणसाला या सांस्कृतिक आदर्शांच्या आकर्षणामुळे होणाऱ्या सर्वस्पर्शी मनस्तापाचा स्वर्गीय अनुभव कधीच आला नसेल तर त्यानें शिक्षकाचा पेशा सोडून द्यावा. ज्याचें अंतःकरण कधीच ढवळून निघालें नाहीं. श्रेष्ठ आदर्शांच्या आकर्षणाने जो क्षणभरहि भारावून गेला नाही, सांस्कृतिक निष्ठांसंबंधीं जो उदासीन राहिला व आपल्या क्षुद्र प्रापंचिक स्वार्थापलीकडील कोणत्याहि गोष्टीबद्दल ज्याला उत्साहच वाटूं शक्त नाहीं, अशा माणसाने शिक्षक बनण्याच्या फंदांत पडूं नये, व आधींच ती चूक केली असेल तर त्याने आपल्या जागेचा राजीनामा द्यावा. श्रेष्ठ आदर्शांचें अमृत स्वतःच्या हृदयरूपी कलशांत भरून विद्यार्थ्यांच्या अंतःकरणावर त्याचा अभिषेक करण्याचें कार्य शिक्षकाला करायचें असतें. या कार्याकरतां त्याला विविध सांस्कृतिक उपकरणांचा उपयोग करायचा असतो. त्याला स्वतःलाच जर या गोष्टींची तोंडओळख नसेल आणि त्यांचें आकर्षण वाटत नसेल तर विद्यार्थ्यांच्या हृदयावर तो कसचे संस्कार करणार ? शिवाय आदर्श शिक्षकाच्या अंगीं समाजप्रियतेचा गुण हवा. विद्यार्थ्यांच्या गरजा व कल ओळखून व त्यांच्याबद्दल सहानुभूति राखून त्यांच्या जीवनांत श्रेष्ठ संस्कार ओतण्याचा प्रयत्न त्याला करायचा असतो. त्याचा संबंध सदैव कोवळ्या जीवांशी अथवा व्यक्तिमत्त्वाच्या कळ्यांशी येणार. शिक्षकाला शिष्याचीं व्यक्तिवैशिष्ट्यें ओळखून त्यांच्यावर योग्य ते संस्कार करावयाचे असतात. शिक्षकाचें काम कळ्यांना पूर्णपणे उमलविण्याचें असतें. आपल्या लहरीस येतील तशीं कागदी फुलें बनविण्याचें नसतें. स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्त्वाचा विकास हें त्यांच्या परिश्रमाचें उद्दिष्ट असतें. सांस्कृतिक उपकरणें हींच त्याचीं साधनें होत. हीं साधनें कोणावर जबरदस्तीने लादून त्याला पोपटपंची करायला लावण्यांत कांहीं लाभ नाहीं. खरा शिक्षक हा आपल्या शिष्यांतील उपजत गुणांना मार्गदर्शन करून शिष्याच्या स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्त्वाला जागृत करूं इच्छितो. एकमेकांना साहाय्य करून सर्वांनी समाजाच्या उन्नतीचा सुपंथ धरावा, हीच त्याची हार्दिक कळकळ असते. लोकशाही समाजाने शिक्षकाची ही कळकळ मान्य करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. या आपल्या अनिवार्य नैतिक कर्तव्यानुसार आचरण करीत असतांना लोकांनी धोंडे मारून जीव घेतला तरी खरा शिक्षक आपल्या मार्गापासून विचलित होत नाही. सॉक्रेटीस आणि येशू ख्रिस्त, गांधी

आणि हुसेन, यांच्या जीवनाचा व बलिदानाचा खऱ्या शिक्षकाच्या चारित्र्यावर चांगलाच प्रभाव पडलेला असतो. हुकूम चालविणें अगर सत्ता गाजवणें हें शिक्षकाचें कार्य नसून साहाय्य अन् सेवा, सहानुभूति अन् संस्कार, आदर, प्रेम आणि श्रद्धा हीं त्याचीं ब्रीदें आहेत. व्यक्ति आणि समूह यांच्यांतील संघर्ष टाळून तेथे खेळीमेळीचें वातावरण निर्माण करण्याकरतां शिक्षकाच्या अंगीं असीम प्रेम व अमर्याद चिकाटी पाहिजे. कधी व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर अधिक भर दिला जातो तर कधी समूहाच्या हितावर अधिक जोर दिला जातो, याचा आपणाँस नित्य अनुभव येत असेल. शिक्षक या दोंहोंचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न करतो. इतर लोक आवेशाने बोलतात, पण शिक्षक वस्तुस्थिति जाणतो. कोणतीहि व्यक्ति म्हणजे गणितांतील एक अंक नव्हे, अथवा यंत्रांतील एक खिळा नव्हे, हें तो जाणून असतो. शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या उद्योगांतून, विद्यार्जनांतून अन् अनुभवांतून विकसित झालेले विद्यार्थी आपापल्या स्वभावधर्मानुसार अधिक व्यापक ज्ञानाची अन् अधिक संतोषदायक जीवनाची अपेक्षा करीनासे झाले तर मानवी जीवनाला कांहीं अर्थच नाही असें म्हणावें लागेल. शिक्षकाला याहि गोष्टीची जाणीव असते कीं समाज अथवा समूह म्हणजे चार माणसांची बेरीज नव्हे अथवा चार ठोकळयांची मांडणी नव्हे. जिवंत समूहांत राहिल्यानेच माणसाला जीवनाचा अर्थ आकलन होतो आणि जीवनांत अधिक अर्थ ओतण्याची शक्ति प्राप्त होते. परन्तु समूहाच्या हिताला प्रमाणाबाहेर महत्त्व दिल्याने व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी सहज होऊं शकते, याचीहि त्याला आठवण असते. प्रसन्न व चपळ सोबत्यांची तालबद्ध चाल आणि आक्रमक सैनिकांची अनिष्ट पायपीट या दोहोंमध्ये तसा भेद फार थोडा असतो. परंतु शिक्षकाच्या दृष्टीने हा थोडा भेदच फार महत्त्वाचा असतो. स्वार्थ-निरपेक्ष उद्दिष्टांकरतां इतर सोबत्यांच्या बरोबरीने अविश्रांत उत्साहाने झटणारीं आणि त्याकरतां जगणारीं माणसें निर्माण करण्याची संधि मिळाल्यास खऱ्या शिक्षकाला कृतकृत्यता वाटते.

शिक्षक बंधूंनो ! आपणांस बंधू म्हणून संबोधण्याचा मला हक्क आहे. वरकरणी कांहीहि फरक पडला असला तरी अंतःकरणाने मी अजूनहि शिक्षकच आहे. शिक्षणाची सेवा केल्याच्या आठवणीमुळे आणि शिक्षणाच्या उद्दिष्टांशी एकरूप झाल्यामुळेंच मी अजून कार्यशील राहूं शकलों आहे असें मला वाटतें. तेव्हां शिक्षक बंधूंनो, आपण धैर्याने पुढे होऊं या. इतरांनी साधक बाधक विचार

करून योजना आखाव्यात आणि आपण निर्बुध्दपणें व निरुत्साहाने त्या अंमलांत आणाव्यात असें समजून आपण सदा वाट पहात राहण्याचें कारण नाही. आपण शिक्षक वर्गाचें जागृत लोकमत तयार करूं या. आपल्या देशांतील कोटयवधि जनतेला निर्बुद्धपणें काम करावें लागतें, काबाडकष्टांच्या गोण्या उचलाव्या लागतात, स्वार्थाशी अगर परमार्थाशी कांहीं एक संबंध नसलेलीं ओझीं वहावीं लागतात. सुदैवाने आपलें काम त्यांच्यासारखें नाही. आपण कांहीं केवळ पोटोबाच्या पूजेकरतां कांहीतरी काम करणारे कोणाचे पगारी ताबेदार नाही. आपण शरीरश्रमांच्या जोडीला बौद्धिक, नैतिक व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचें आणि बौद्धिक ज्ञानाला भरीव सहेतुक उद्योगाची जोड देण्याचें व्रत घेतलें आहे.

सरतेशेवटीं भारतीय शाळांच्या वतीनें सर्वसाधारण नागरिकांना उद्देशून मी चार शब्द सांगूं इच्छितों. मित्रहो, आपल्या शाळांच्या भोंवती योग्य तें वातावरण निर्माण करा अशी माझी आपणांस कळकळीची विनंति आहे. शाळा वायुशून्य पोकळींत नांदत नाहीं. शाळा हा समाजाचाच एक अविच्छिन्न व नाजुक अवयव आहे. भोंवतालच्या समाजांत आढळणा-या दाखल्याचें अनुकरण शाळेंत केलें जातें. तेव्हां आपण सर्वांनी आपल्या जीवनांत परस्पर साहाय्याची व सहकार्याची वृत्ति प्रकट करावी म्हणजे शालेय जीवनांत तशी भावना दिसली नाहीं तर शिक्षकविद्यार्थ्यांना स्वतःलाच स्वतःची लाज वाटेल. आपण परस्परांशी वागतांना सहिष्णुता दाखवा. म्हणजे आपलीं मतें मांडतांना अगर आपली मागणी मांडताना आपणावर कोणाचे उपकार होंत आहेत अशी ओशाळवाणी भावना तरुणांमध्ये निर्माण होणार नाहीं. धर्म, भाषा, जाति अथवा तत्सम समान सामूहिक हितसंबंधांवर आधारलेल्या लहानमोठ्या गटांमध्ये सुसंगत सहकार्य नांदूं द्या अशी माझी आपणांस आग्रहाची विनंती आहे. एखाद्या शाळेंतील विद्यार्थी व शिक्षक शाळेच्या हिताकरतां परस्परांशी सहकार्य करतील किंवा आपल्या वैयक्तिक उपयोगाकरतां कांहीं कलाकौशल्य हस्तगत करतील; परन्तु ज्या समाजानें त्यांना सर्व प्रकारें साहाय्य केलें त्याची कांहीं परतफेड करण्याऐवजी त्यापासून अलिप्त राहतील तर तसल्या शाळांची आम्हांला मुळींच गरज नाहीं. दुसऱ्या एखाद्या शाळेंतील मुलें-मुली कदाचित आपापल्या विषयांत चांगलीं पारंगत होत असलीं तरी पुढे आपल्या आयुष्यांत सर्व समाजाचे हितसंबंधी दृष्टिआड करून कळत नकळत एखाद्या लहान वर्गाच्या

हितांचीच जपणूक करीत असतील तर तसल्याहि शाळांची आम्हांला मुळींच गरज नाही. आम्ही व्यापक निष्ठांच्या ऐवजीं संकुचित निष्ठांना उत्तेजन देऊं इच्छित नाही. जेथील विद्यार्थी शाळेंतील कामाकरतां स्वतःवर अवश्य ती शिस्त स्वखुषीने लादून घेतात आणि ज्या शाळेंत राष्ट्राची, अखिल मानव-जातीची आणि ईश्वराची सेवा करण्याची भावना वास करते, अशीच शाळा आम्हांला हवीशी वाटेल. ही अंतिम आणि सर्वव्यापी निष्ठाच आमच्या समोरील पहिला व सर्वश्रेष्ठ आदर्श असला पाहिजे. जनतेची, शेजाऱ्याची आणि मानवाची सेवा हीच इश्वराची सेवा आहे, ही निष्ठा विद्यार्थ्यांच्या अंतःकरणावर ठसविण्याकरतां शाळेला आपणां सर्वांची मदत लागेल. आपण जर कसोटीला उतरलों नाहींत, आपण जर आपल्या आचरणाने विद्यार्थ्यांना हें दाखवून दिलें नाहीं कीं आपल्या प्रेमाला, सेवेला, सहानुभूतीला व ध्येयनिष्ठेला वैयक्तिक, कौटुंबिक अगर जातीय सीमा माहीत नाहींत, तर शाळेंतील सर्व शैक्षणिक धडपड वाया जाईल. आपल्या राष्ट्राच्या भवितव्याची चिंता आपण वाहता ना ? आपल्या मुलांवर आपलें अत्युत्कट प्रेम आहे ना ? तर मग मी हांत जोडून आपल्याला विनंती करतों कीं शाळेच्या अवतीभोंवती निरागस वातावरण निर्माण करा. हें वातावरण निर्माण करण्यांत आपल्यापैकीं प्रत्येकाचा कांहीं ना कांहीं हात असतो. आपण जर परस्पर साहाय्याचे, सहकार्याचे, सत्यप्रियतेचे, सेवेचे आणि श्रेष्ठ ध्येयनिष्ठेचे आदर्श आचरणांत आणलेत तरच त्या वातावरणांत शाळेचा उत्कर्ष होऊं शकेल. मानवतेच्या उत्कर्षासहि अशाच वातावरणाची गरज असते. भारतांतील शैक्षणिक कार्याची पुनर्रचना आणि भारतीय जनतेचें नैतिक पुनरुत्थान या दोन गोष्टी परस्परावर पूर्णपणें अवलंबून आहेत. या दोन्ही कार्यांना आपण धैर्याने हात घालूं या.

## परिशिष्ट

**(व्याख्यानांच्या शेवटीं विचारण्यांत आलेल्या कांहीं प्रश्नांचीं डॉ० झकीर हुसेन यांनी दिलेलीं उत्तरें)**

**प्रश्न :** मला वाटतें कीं मोठ्या माणसांच्या व्यक्तित्वांचें वर्गीकरण करणें शक्य आहे. परंतु लहान मुलांचें बाबतींत तें कठीण आहे. लहान मुलांची बहुधा कोणतीहि विशिष्ट प्रवृत्ति स्पष्टपणें प्रकट होत नाहीं. खरें पाहिलें असतां एकाच दिवसांत त्यांचा नूर अनेक प्रकारें पालटत जातो. अशा परिस्थितींत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें वर्गीकरण करून त्यानुसार त्यांच्याकरतां पाठ्यक्रम आंखणें हितकर होईल काय ?

**उत्तर :** वाढीस लागलेल्या व्यक्तिमत्त्वाचें विशिष्ट स्वरूप प्रकट होण्याकरतां कांहीं काळ लोटावा लागतो; आणि त्यापूर्वी त्याचें वर्गीकरण करण्याची घाई केल्यानें शैक्षणिक हानी होईल ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु त्यामुळें व्यक्तिमत्त्वाच्या विविध प्रकारांची चर्चा निरर्थक ठरत नाहीं. लहान मुलांच्या बाबतींतहि या वर्गीकरणाचा फार मोठा उपयोग होत आहे. कारण त्यामुळें शिक्षकांचें लक्ष शिक्षणाच्या प्राथमिक उद्देशांकडे वेधिलें जाऊं शकतें. ज्या मनाचा त्यांच्या स्वयंभू गुणांनुसार विकास करावयाचा आहे त्या मनांत आणि त्या विकासाकरतां सभोंवतीच्या ज्या सांस्कृतिक साधनांचा उपयोग करावयाचा आहे त्या सांस्कृतिक साधनांत समरसता निर्माण करण्याचा प्रयत्न शिक्षकानें केला पाहिजे. या कामावरील वर्गीकरणाचा शिक्षकाला उपयोग होईल. माझ्या एका व्याख्यानांत मी व्यक्तिमत्त्वांचें अनेक पोटभेद पाडले आहेत. लहान मुलांच्या स्वभावाचें बारीक सारिक पोटभेद ओळखणें कठीण असलें तरी शाळेंत नव्यानेच प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांतील एक प्रबळ प्रवृत्ति शिक्षकाच्या नजरेंतून सुटणार नाहीं. लहान मुलांत स्वतःच्या हातानें कांहींना कांहीं तरी जोडतोड करण्याची प्रबळ प्रवृत्ति वास करीत असते. सर्वच लहान मुलांत वसणाऱ्या या प्रवृत्तीचा शिक्षकानें उपयोग करून घेतला पाहिजे. परंतु तसें होत नाहीं. ७ ते १४ वर्षें वयाच्या अवधींत लहान मुलांत प्रत्यक्ष क्रियेची प्रबळ प्रवृत्ति असते ही गोष्ट

वरवर पाहणाराला सुद्धां दिसून येईल. या प्रवृत्तीचा उपयोग शिक्षणाकरतां करून घेणें हितकर आहे. या वयांतील मुलें हातापायांनींच विचार करतात असें म्हटलें तरी वावगें होणार नाहीं. मनुष्यप्राण्याच्या इतिहासाकडे पाहिलें तरी हेंच आढळून येतें. शारीरिक हालचालींतून मानवी बुद्धीचा विकास झाला. याच इतिहासाची पुनरावृत्ति बालवयांत होत असते. बालवयांतील या प्रबळ प्रवृत्तीची चाड राखणे म्हणजेच बालकाच्या व्यक्तिमत्त्वाची चाड राखणें होय. बालवयांत व्यक्तिमत्त्वाचे विविध पोटभेद प्रकट होत नाहींत ही गोष्ट शिक्षकाच्या दृष्टीने भाग्याचीच म्हटली पाहिजे.

केर्श्चेनस्टीनरने केलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या वर्गीकरणाचा कांहीसा विस्तृत सारांश मी माझ्या व्याख्यानांत दिला होता. प्रस्तुत प्रश्न विचारणारे सज्जन तो सारांश ऐकतां ऐकतां कंटाळले असावेत अशी मला शंका येते. कारण व्यक्ति-मत्त्वाच्या तत्त्वांची चर्चा केल्यानंतर त्याच्या मागोमाग मी दुसऱ्या एका तत्त्वाचें प्रतिपादन केलें होतें. या दुसऱ्या तत्त्वाकडे प्रस्तुत प्रश्नकर्त्यानें लक्ष दिलेलें नाहीं. व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची विशिष्ट अवस्थाहि शिक्षकानें ध्यानांत बाळगली पाहिजे. अस्पष्ट व निराकार दिसणाऱ्या बालमनाची वाढ होतां होतां शेवटीं वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्त्व प्रकट होतें. ७ ते १४ वर्षांच्या वयोमर्यादेंतील मुला-मुलींत प्रत्यक्ष क्रियेची प्रवृत्ति प्रबळ असते आणि त्या काळांतील शिक्षणक्रमांत या प्रवृत्तीची चाड राखली पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमिक कालावधींत व्यक्ति-मत्त्वाचे विविध पैलू प्रकट होऊं लागतात.

**प्रश्न** : व्यक्तिमत्त्वाचा जास्तींत जास्त विकास करणारें शिक्षण देण्याचा निश्चय भारतानें निदान कागदोपत्रीं तरी केला आहे. जीवनाच्या लोकशाही प्रथेवर आपली श्रद्धा आहे. अर्थात लोकशाहीनिष्ठ, उद्योगी आणि विचारी नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी शाळांवर येऊन पडते. आपणांस शिक्षण-विषयक विचारांची स्फूर्ति ज्या जर्मनीपासून मिळाली असावी असें वाटतें त्या जर्मनीसकट जगांतील बहुतेक राष्ट्रांतील शिक्षणव्यवस्था आदर्श नागरिक निर्माण करण्याच्या बाबतींत कुचकामाची ठरली आहे. आदर्श नागरिकांत विश्व-बन्धुत्व, राष्ट्राभिमान आणि शेजारधर्म या सद्‌गुणांचा परिपोष झाला पाहिजे. व्यक्तिमत्त्वाच्या तत्त्वावर अधिक जोर दिल्याने अहंकाराच्या प्रवृत्तीला पुष्टि मिळते असें आपणांस वाटत नाहीं काय ? आपण व्यक्तीच्या सामाजिक उपयुक्त-तेचा कांहीं हिशोब करीत आहोंत काय ?

**उत्तर :** पहिल्या प्रश्नाला मी जें लांबलचक उत्तर दिलें त्याचें प्रायश्चित्त म्हणून माझ्यावर या दीर्घ प्रश्नाचा भडिमार झाला आहे. मला त्याचा खंडशः समाचार घ्यावा लागेल.

प्रश्नाच्या पहिल्या भागांत एक कांहीसें गैरवाजवी विधान केलें आहे असें मला वाटतें. "निदान कागदोपत्रीं तरी" हे शब्द आपल्या निश्चयापासून विन्मुख होण्याकरतां ठेवलेली पळवाट म्हणून योजलेले नसतील तर त्या साध्या-सुध्या शब्दांचा अर्थ सर्वघातक आहे. त्याप्रमाणें "लोकशाहीनिष्ठ, उद्योगी आणि विचारी नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी शाळांवर येऊन पडते" अशी घोषणा करण्याचें साहस, माझा भारतांतील शाळांचा अनुभव लक्षांत घेतां, मी करूं शकत नाहीं. वस्तुस्थिति तशी असती तर माझ्या व्याख्यानांत मी ज्या शिक्षणाचे गुण गायिले आणि शिक्षणाचें सार म्हणून ज्या तत्त्वांचा पाल्हाळीक-पणें उदो उदो केला तें शिक्षण व तीं तत्त्वें भारतांत साकार झालीं असें म्हणावे लागेल. तसें झालें तर माझ्याइतका आनंद कोणालाच होणार नाहीं. परंतु आपण आपल्या ध्येयापासून फार फार दूर आहोंत.

प्रश्नाच्या दुसऱ्या भागांत जगांतील बहुतेक राष्ट्राची शिक्षणव्यवस्था कुचकामी ठरल्याचा उल्लेख आहे. प्रश्नांत जर्मनीचा मुद्दाम उल्लेख केलेला आहे. कारण जर्मनी हें माझें स्फूर्तिस्थान आहे, अशी प्रश्नकर्त्याची समजूत आहे. "विश्वबंधुत्व, राष्ट्राभिमान व शेजारधर्म या सद्गुणांचा परिपोष करण्याच्या कामीं जगांतील शिक्षणव्यवस्था कुचकामाची ठरली आहे," हें विधान सरसकट व निष्काळजीपणानें केलें आहे असें मला वाटतें. जगांतील पुष्कळ देशांनी आपल्या शिक्षणव्यवस्थेच्या साहाय्याने नुसतें "कागदोपत्रींच" नव्हे तर खऱ्याखुऱ्या चांगल्या नागरिकांच्या अनेक पिढ्या निर्माण केल्या आहेत. आपल्या नागरिकांत विश्वबंधुत्वाची भावना दृढमूल करण्यांत कोणालाच यश आलेलें नाही, ही गोष्ट खरी आहे. एक गोष्ट आपण सदैव लक्षांत ठेवली पाहिजे कीं शिक्षण हें माणसाच्या वागणुकीवर परिणाम करणारें केवळ एक कारण आहे. आणि तें सर्वांत महत्त्वाचें कारण आहे असें सुद्धां म्हणतां येणार नाहीं. कोणाला यश आलें आणि कोण कुचकामाचा ठरला याची चर्चाच अनाठायीं आहे. आप-णांस कसें शिक्षण पाहिजे, शिक्षणाद्वारें आपणांस काय साधावयाचे आहे आणि आपण तें कसें साधणार आहोंत, याची आपणांस फोड करावयाची आहे. मग त्या कामीं सारें जग कुचकामाचें ठरलें असो अथवा आपण आपल्या कल्पनेच्या

राज्यांत "निदान कागदोपत्रीं तरी" यश मिळवलेलें असो.

मला जर्मनीपासून स्फूर्ति मिळाली आहे हा आरोप मला मान्य आहे. जर्मनींतील शिक्षणतज्ज्ञांकडून आणि विचारवंतांकडून मी पुष्कळ गोष्टी शिकलों आहे. आणि त्याचें ऋण मी आनंदानें मान्य करतों. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं माझ्या विचारांच्या विकासास इतर कोणाचा हातभार लागलेला नाही. मी जर्मनीइतकाच भारतीय, स्विस, इंग्रज व अमेरिकन शिक्षणतज्ज्ञांचाहि ऋणी आहे. सत्य आणि ज्ञान या माझ्याच हरवलेल्या वस्तु आहेत असें मला वाटतें. आणि जेथे जेथे मला त्या सांपडतील तेथून मी त्या उचलून घेतों.

प्रश्नाच्या तिसऱ्या भागांत, व्यक्तिमत्त्वावर अधिक जोर दिल्यानें अहंकाराला पुष्टि मिळण्याची भीति व्यक्त केली आहे. "व्यक्तिमत्त्व" ह्या शब्दामुळें प्रश्नकर्त्याची दिशाभूल झाली आहे असें मला वाटतें. सर्वच मानवी प्राणी व्यक्ति आहेत. मानवी मन हें व्यक्तीचें मन होय. अहंकारी व्यक्तिप्रमाणेंच समाजाभिमुख व्यक्ति, तटस्थ व्यक्ति आणि बहिर्मुख व्यक्ति हे सारे व्यक्तिमत्त्वाचेच प्रकार आहेत. प्रश्नांत "अधिक जोर दिल्याने" असे शब्द योजिले आहेत. स्वयंप्रज्ञ मानवी मनाची निर्मिति व्यक्तित्वाचें आधारेंच होऊं शकतें असें मान्य करणें म्हणजे व्यक्तिमत्वावार अधिक जोर देणें आहे, असें मला वाटत नाहीं. उलटपक्षीं एका उघड परंतु उपेक्षित तत्त्वाची मी वाजवी वाखाणणी केली आहे. शिक्षणाचे संस्कार अखेरीस एका जिवंत व्यक्तिमत्त्वावर करावयाचे असतात. व्यक्तीच्या स्वयंभू प्रेरणा ओळखण्याने शिक्षणाची क्रिया सुलभ व सफल होऊं शकते. आणि त्या प्रेरणांशी अनुकूल प्रकृति असलेल्या सांस्कृतिक साधनांच्याद्वारें शैक्षणिक प्रगति साधली जाऊं शकते. व्यक्तिमत्त्वाचा योग्य विकास सभोवतालच्या समाजांत उपलब्ध असलेल्या सांस्कृतिक साधनांवर पूर्णपणें आधारलेला असतो. यामुळें व्यक्ति व समाज यांची अविच्छिन्न सांगड पडली आहे. शिक्षणांत क्रियाशीलतेच्या तत्त्वाचें महत्त्व वर्णन करतांना मी सांगितलें होतें कीं समाजापासून कलाकौशल्य आत्मसात करण्याच्या क्रियेला शिक्षण असे नांव तेव्हांच देतां येईल कीं जेव्हां त्या कलाकौशल्याचा उपयोग व्यक्तिनिरपेक्ष उद्दिष्टांकरतां केला जाईल. माझ्या प्रतिपादनाचा मतितार्थ असा आहे कीं शिक्षण म्हणजे समाजांतील सांस्कृतिक साधनांच्या साहाय्यानें व्यक्तिनिरपेक्ष उद्दिष्टांबद्दल व्यक्तीच्या ठायीं जागृत झालेली निष्ठा. ही निष्ठा सामाजिक कार्याद्वारें प्रकट होते.

शिक्षणाचा समाजाशी असलेला संबंध मी केवळ दूरान्वयाने ध्वनित करीत आहे असा समज होऊं नये म्हणून मी पांचव्या शैक्षणिक तत्त्वाचें प्रतिपादन केलें होतें. 'शिक्षणाचा सामाजिक संदर्भ' या नांवानें मी या तत्त्वाचा निर्देश केला होता. आणि माझ्या मतें सर्वच शिक्षणाला हें तत्त्व लागू पडतें. अधिक संपन्न, न्यायपूर्ण आणि सौंदर्यपूर्ण जीवनाच्या दिशेने होणाऱ्या सामाजिक प्रगतीला हातभार लावणें हें शिक्षणाचें उद्दिष्ट आहे असा या तत्त्वाचा अर्थ आहे. व्यक्तीच्या मनाचा संपूर्ण विकास आणि समग्र सामाजिक जीवनांतील नैतिक उत्कर्ष परस्परांवर अवलंबून असतात. शिक्षणप्रणालि ठरवितांना व्यक्ति आणि समाज यांच्यामधील परस्परावलंबी संबंध दृष्टिआड केला जातो अशी तक्रार मी माझ्या दुसऱ्या व्याख्यानांत खणखणीत शब्दांत केली होती. त्याच उद्देशाने मी आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें होतें कीं आपल्या शिक्षणसंस्थांची रचना सामुदायिक जीवनातील घटकांप्रमाणे केली गेली पाहिजे. तेथे सामुदायिक पद्धतीनें शारीरिक व बौद्धिक परिश्रम केले गेले पाहिजेत आणि सर्वमान्य निष्ठांची आणि सर्वमान्य पुरुषार्थांची उपासना परस्पर सहकार्यानें केली गेली पाहिजे. हा मुद्दा मी अत्यंत असंदिग्ध शब्दांत मांडला होता. "हें तत्त्व आपल्या शिक्षणसंस्थांच्या अंगीं बाणल्याशिवाय इतर सर्व सुधारणा जुजबी स्वरूपाच्या ठरतील," अशा शब्दांत मी या तत्त्वाची महति गायिली होती.

माझ्या व्याख्यानांतील या मुद्द्यांची चर्चा प्रश्नकर्त्याच्या नजरेंत भरली नाही याचें मला आश्चर्य वाटतें. मी आतां केलेल्या खुलाशाने त्यांचें समाधान होईल अशी मला आशा आहे.

**प्रश्न :** शिक्षणांतील आरंभींच्या वर्षांत कला, गायन, वादन, नृत्य आणि इतर सांस्कृतिक कार्याला स्थान देणें इष्ट आहे काय ? जर असेल तर त्यांचा प्रचार कसा करावा ?

**उत्तर :** अलबत; शाळेंत कला, गायन, वादन, नृत्य आदि कार्यांना स्थान असलें पाहिजे. शैक्षणिक क्रियेच्या स्वरूपासंबंधीं मी जे सिद्धांत मांडले आहेत त्यांवरूनच ही गोष्ट सिद्ध होते. व्यक्ति-मनाच्या विकासास साहाय्य करणारीं कांहीं प्रमुख सांस्कृतिक साधनें आहेत, त्यांत त्यांचा समावेश होतो. त्यांचा प्रभाव बालमनावर अवश्य पडला पाहिजे. माझी कळकळीची विनंती एवढीच आहे कीं आरंभींच्या काळांत मुलामुलींची ओळख मुख्यत्वेंकरून भारतीय जीवनांतील कलावस्तूंशीच करून दिली पाहिजे. व्यक्तीच्या उपजत

आवडीनिवडींशी सुसंगत असलेल्या सांस्कृतिक साधनांच्या द्वारेच त्या व्यक्तीचें खरेंखुरें शिक्षण होऊं शकतें असें मी म्हटलेंच आहे. अर्थात ज्या समाजांत आपण लहानाचे मोठे होतों त्या समाजांतील कलावस्तूच बालमनावर प्रभावी संस्कार करूं शकतील. भारतीयांनी निर्माण केलेल्या नृत्य, कला, संगीत, आदि-पासून विन्मुख असलेले विद्यार्थी निर्माण करण्याचा खटाटोप अनिष्ट आहे. मात्र विद्यार्थ्याचें मन आणि त्याच्या विकासाकरतां वापरावयाचीं सांस्कृतिक साधनें या दोहोंमध्यें सुसंगति व सुसंवादिता असणें अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा आंधळ्या माणसाला चित्रकलेच्या द्वारें आणि बहिऱ्या माणसाला संगीताच्या द्वारें शिक्षण देण्याचा हास्यास्पद प्रकार व्हायचा.

खरें पाहतां आतां मी जें सांगितलें तें आधीच समजण्याजोगें स्पष्ट आहे; परंतु उद्योग आणि कला यांतील द्वंद्व स्पष्ट करण्याच्या उद्देशानें हा प्रश्न विचारला आहे असें मला वाटतें. हें द्वंद्व मला मान्य नाहीं. चांगली घडवंची तयार करणें, टिकाऊ कपडा विणणें, उत्तम सतार वाजविणें, गणितांतील प्रमेय सोडविणें सदसद्‌विवेक करणें अथवा सुस्वर आलाप घेणें, या साऱ्या क्रिया सांस्कृतिक स्वरूपाच्या आहेत असें मला वाटतें; आणि आपआपल्या परीनें त्यांचा उपयोग शिक्षणाकरतां केला जाऊं शकतो. शाळेंत कला व संगीताची उपासना करण्यास माझा मुळींच विरोध नाहीं; उलटपक्षीं मी त्याचें स्वागत करतों. मात्र शाळेंत उपयुक्त उद्योगांचा प्रचार करण्याला इतरांनी विरोध करूं नये. उपयुक्त उद्योगाची नीट योजना आंखून तिची अंमलबजावणी मनापासून केली पाहिजे; आणि अवश्य तेथे कडक टीका व योग्य असेल तेथें भरपूर प्रशंसाहि केली पाहिजे.

**प्रश्न :** बुनियादी शिक्षण अयशस्वी ठरलें असेल तर तें ताबडतोब बंद कां करूं नये ? अनुभवापासून धडा घेण्यांतच शहाणपणा नाहीं काय ?

**उत्तर :** अनुभवापासून धडा घेणें शहाणपणाचें आहे हें मी कसें नाकारूं ? परंतु अनुभव न घेतांच धडा शिकण्याचें शहाणपण मात्र मला मान्य नाही. मी एखाद्या गोष्टीचा अनुभव घेतला नसेल तर तिच्या संबंधीं मत ठोकून देण्याची घाई मी सहसा करीत नाहीं आणि तिचा आंधळेपणाने प्रतिकार करणें तर मला मुळींच पटत नाहीं. एखाद्या योजनेंतील मूळ कल्पना सयुक्तिक आहे असें मला दिसलें आणि अल्पशा अनुभवावरूनहि जर ती सयुक्तिकता सिद्ध झाली तर त्या योजनेचा सांगोपांग व अनिर्बन्ध प्रयोग करून तिची इष्टा-

अनुक्रम ................ वि: ..........
क्रमांक ................ नों दि: ..........


निष्टता पारखून पहावी असा मी आग्रह धरेन. हाच खरा प्रगतीचा मार्ग आहे. या मार्गाने जाण्याकरतां कळकळ, सचोटी आणि चिकाटी अवश्य आहे.

बुनियादी शिक्षणाच्या मूळ योजनेसंबंधी माझी धारणा अजूनहि अशीच आहे कीं तात्त्विक दृष्टच्या ती पूर्णपणें निर्दोष आहे. तिच्यांत अव्यवहारी बाब कोणतीच नाही असें मला वाटतें. तिच्या तत्त्वांचा प्रयोग सफल होतो असा माझा स्वतःचा अनुभव आहे. मात्र प्राथमिक शिक्षणाची प्रथा म्हणून देशभर मोठचा प्रमाणावर तिचा वापर करण्यासंबंधीं मला जो कांही थोडासा अनुभव आला आहे त्यावरून मी म्हणेन की या योजनेला न्यायोचित संधि बहुधा मिळालेलीच नाही. या योजनेंतील मूलभूत सिद्धांताचा विस्तारपूर्वक विचार केला गेलेला नाही. ही योजना लागू करण्याकरतां आवश्यक असलेली जुळवा-जुळव केली गेली नाही. ही योजना लागू करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोंपविण्यांत आली त्यांच्यांतील कित्येकांनी कळकळीने मन लावून काम केलें नाही; शिक्षकांना व निरीक्षकांना अवश्य तें प्रशिक्षण देण्यांत आलें नाहीं; प्राथमिक शिक्षणांत बुनियादी व गैरबुनियादी असा भेद एकाच वेळीं कायम ठेवून शिक्षणाधिका-यांनी आपली द्विधा मनःस्थिति जगजाहीर केली आहे, निदान त्यांच्या धोरणाचा तसा अर्थ लावण्यांत आला आहे; बुनियादी शिक्षणाचा मेळ माध्यमिक व उच्च विद्यालयांशी योग्य प्रकारें न घालण्यांत आल्यामुळें अनेक ठिकाणीं अनेक कटकटी निर्माण झाल्या आहेत आणि प्राथमिक शिक्षणाच्या शांत क्षेत्रांत बुनियादी योजना निष्कारण लुडबुड करीत आहे अशी भावना बळावत आहे. या आणि असल्याच कारणांमुळे बुनियादी योजनेचा योग्य प्रयोग झालेला नाही. सर्व प्रकारें सयुक्तिक अशा शैक्षणिक, मनोवैज्ञानिक आणि सामाजिक सिद्धांतावर आधारलेल्या मूलभागी व व्यापक शिक्षण योजनेचा नीट प्रयोग करण्यापूर्वीच ती टाकाऊ ठरविणें योग्य आहे काय ? या योजनेकरतां कांहींच प्रयत्न केला गेला नाही असें मला म्हणावयाचें नाहीं. पुष्कळ प्रयत्न झालेले आहेत आणि याविषयीचें वैचारिक गोंधळ व गैरसमज जसे दूर होतील तसे अधिकाधिक प्रयत्न केले जातील. या प्रयत्नांना वाढतें यश येईल अशी मला आशा आहे. शिक्षणाचें रोपटें हळूहळू मूळ धरतें. बुनियादी शिक्षणाच्या रोपटचाला ताबडतोब व मुळासकट उपटून टाकण्याची घाई प्रश्न-कर्तीनें करूं नये. शिक्षण क्षेत्रांत जी रोपटीं हानिकारक सिद्ध झालीं आहेत त्यांना ताबडतोब उपटून फेकणेंहि आपणांस साधलें नाही ही गोष्ट प्रश्नकर्तीनें

नजरेआड करूं नये. बुनियादी शिक्षण कसोटीवर उतरलें नाही असें म्हणतां येणार नाही. त्याला अजून योग्य कसोटी लाविली गेलेलीच नाही.

**प्रश्न :** आजच्या विद्यार्थ्यांचा नैतिक व बौद्धिक ऱ्हास होत आहे ही गोष्ट वर्तमानपत्रांतील बातम्यांवरून उघड दिसते. हा कशाचा परिणाम आहे ?

**उत्तर :** विद्यार्थ्यांच्या तथाकथित नैतिक व बौद्धिक-ऱ्हासासंबंधी वर्तमानपत्रांतील बातम्या वाचून घाबरून जाऊं नये. नेहमीच्या घटना रटाळ वाटतात व असामान्य घटना खळबळकारक असतात म्हणून वर्तमानपत्रवाले सामान्याकडे दुर्लक्ष करून असामान्य बातम्या देण्यास टपलेले असतात. वर्तमानपत्रांत येणाऱ्या असामान्य घटना शिक्षण संस्थांत रोजच घडूं लागल्या आहेत असा प्रश्नकर्त्याचा स्वतःचा अनुभव असेल तर मात्र परिस्थिति खरोखरच काळजी करण्यासारखी आहे. आपल्या शैक्षणिक कार्याचें वर्तमानपत्रांत जें उदासवाणें वर्णन केलें जातें तें बरोबर नसलें तरी मला प्रश्नकर्त्यानें प्रकट केलेली काळजी समजूं शकते. नैतिक आणि बौद्धिक विकासाच्या दृष्टीनें आमच्या शिक्षण संस्था असाव्यात तितक्या प्रभावी नाहीत. आपला नैतिक व बौद्धिक स्तर खालावत आहे ही गोष्ट सर्वजण मान्य करतात. याच्या कारणांची मीमांसा करूं लागलों तर आपणांस साऱ्या शिक्षणप्रणालीचें परीक्षण करावें लागेल. तसें करण्याचा आजचा प्रसंग नाही. मात्र कांहीं कारणें तत्क्षणींच प्रकट होतात.

१. अलीकडच्या कांहीं वर्षांत सर्व पातळयांवरील शिक्षण संस्थांच्या संख्येंत वारेमाप भर पडली आहे. परंतु शिक्षणाचा दर्जा सांभाळण्याकरतां जी तयारी करायला पाहिजे ती मात्र केली गेली नाही. परिणाम असा झाला की आजच्या संक्रमणाच्या काळांत तुटपुंज्या सामग्रीवर उभारलेल्या शाळाकॉलेजांत दाखल होणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांच्या वाढत्या लोंढ्याला वळण लावण्याचें काम भोंगळपणें भरती करण्यांत आलेल्या अर्धकच्च्या व अर्धपोटी शिक्षकांवर सोंपविण्यांत आलें आहे.

२. विद्यार्थ्याच्या विकासाची अवस्था आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टयें यांची आजच्या शिक्षणांत पूर्ण उपेक्षा केली जाते. त्यामुळें शिक्षण हा एक पोकळ बाह्योपचार बनतो.

३. मुलांचा कल क्रियात्मक शिक्षणाकडे आहे हें स्पष्ट दिसत असूनहि पुस्तकी शिक्षणावर एकांगी भर दिला जात आहे.

४. मनाच्या समाजाभिमुख व वस्तुनिष्ठ प्रवृत्तींचा विकास करण्याची व्यवस्था शिक्षण संस्थांत नाही.

पाठ्यक्रमांतील विषय वाढत असले तरी त्यांच्या अभ्यासाचा प्रकार तोच आहे. बौद्धिक विकासाला त्या विषयाची कितपत मदत होते याचा कांही एक विचार न करतां, केवळ पाठ्य पुस्तकांत दिलेली माहिती विद्यार्थ्यांच्या डोक्यांत कोंबण्यांत येते आणि निबंधवजा लेखी परीक्षांची गोणी त्यांच्या डोक्यांवर लादण्यांत येते. यामुळें विद्यार्थ्यांतील स्वयंस्फूर्तीला वाव मिळत नाही व स्वतः कांही तरी निर्माण करण्याची हौस खुरटते.

६. सक्रिय अनुभवाऐवजीं निष्क्रिय श्रवणभक्तीवर भर देण्यांत येतो.

७. शाळा-कॉलेजें म्हणजे शिकवणीचीं दुकानें, ही समजूत सर्वत्र बोकाळली आहे व आश्चर्याची गोष्ट म्हणजे या समजुतीला कोणी विरोध करीत नाही. समान आदर्शांच्या आराधनेकरतां सहवास व सहकार्य करणाऱ्या सदस्यांचा समुदाय म्हणजे विद्यालय ही भावना प्रचलित नाहीं. विद्यालयें कोणत्याहि कार्याकरतां बद्धपरिकर नाहींत वा कोणीहि त्यांचें मार्गदर्शन करीत नाहीं. विद्यालयांतील शिस्त जबरीने लादलेली असते, जबाबदारीच्या जाणीवेने व आपखुषीनें स्वीकारलेली नसते.

या यादींत मी आणखीं कारणें घालूं शकतों, परंतु परिस्थिति सुधारण्याकरतां काय केलें पाहिजे याचा योग्य दिशेने विचार करण्याकरतां मी दिलेलीं कारणें पुरेशी आहेत. केवळ कांही जुजबी सुधारणा केल्याने परिस्थिति बदलणार नाहीं हें उघड आहे. म्हणूनच मी माझ्या व्याख्यानाकरतां 'शैक्षणिक पुनर्रचनेचे सिद्धान्त' हा विषय निवडला. ज्या गुणांमुळें शिक्षकाला कृतार्थता वाटावी असें मी वर्णन केलें ते कोणतेच गुण आजच्या शिक्षणप्रणालींत नाहीत असें मला वाटतें. आपल्या शिक्षणप्रणालीचें प्रामाणिक व कठोर परीक्षण करून त्यांतून निष्पन्न होणाऱ्या मार्गावर धैर्यानें व चिकाटीने आगेकूच करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. तसे केल्यानंतरहि वर्तमानपत्रांत अधनमधून अप्रिय बातम्या येतीलच; पण मग त्या वाचतांना आपलें मन आपल्याला टोचणार नाही.

**प्रश्न** : आजच्या क्षणीं प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाची उद्दिष्टें वयोमर्यादा, पाठ्यक्रम, माध्यम, आदींमध्यें आमूलाग्र बदल होत आहे हें पाहून पालक या नात्याने माझी गाळण उडाली आहे. संशोधनात्मक प्रयोगांतून

जरी शैक्षणिक पुनर्रचनेची निकड सिद्ध होत असली तरी आज शिक्षणावर मोठ्या प्रमाणांत जे प्रयोग चालू आहेत ते पोरखेळासारखे वाटतात व त्यामुळें मनांत चिंता उत्पन्न होते.

**उत्तर :** मला आपली भावना समजूं शकते आणि आपलें म्हणणें अजिबात चूक आहे असें मला वाटत नाहीं. कोणताहि प्रयोग अथवा बदल करण्यास आपण तयार नसतां तर मी आपल्या पदरांत चुकीचें माप घातलें असतें. कारण माणूस हा स्वभावानेच प्रयोगशील प्राणी आहे व प्रयोगाखेरीज प्रगति अशक्य आहे. परंतु आपला प्रयोगाला विरोध नाहीं हें मला दिसत आहे. शिक्षण क्षेत्रांत ज्या घिसाडघाईने नवनवीन कल्पना घुसडण्यांत येत आहेत त्या पाहून आपण बेचैन झालां आहांत. या नवीन कल्पनांचा सांगोपांग विचार केला गेला आहे व त्यांची अंमलबजावणी करण्याकरतां आवश्यक ती पूर्वतयारी केली गेली आहे अशी माझी खात्री झाली तर मी स्वत: नुसती घाई पाहून घाबरणार नाहीं. कित्येक शतकांपासून भारतांतील शिक्षणप्रवाह तुंबलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्या प्रवाहाला वाट फुटली आहे. नवनवीन कल्पनांचीं वलयें त्यांत उमटत आहेत. हीं वलयें एकमेकांत मिसळून गुंतागुंतीचीं जाळीं निर्माण होत आहेत. आपणांस कोणी नवीन कल्पनांचा विरोधक म्हणेल, या पापाला शिक्षण क्षेत्रांतील जबाबदार लोक भितात. एखादी नवीन कल्पना मनापासून अमलांत आणायची नसेल तर तिला तोंडी पाठिंबा देणें हा सोपा उपाय आहे. त्यामुळें तुमची वर्तमानपत्रांतून भडक जाहिरात होऊं शकते आणि कांही तरी भरीव कार्य होत आहे अशी आपली भावना बळावते. परंतु ही भावना बहुधा भ्रामक आत्मवंचनाच ठरते. आज भारतीय शिक्षणक्षेत्रांत अनेक सुपीक कल्पनांचें पेंव फुटलें आहे असें मला वाटतें. परंतु त्यापैकी अगदी एकाहि कल्पनेच्या मागे तिला मूर्त स्वरूप देण्याकरतां लागणारी स्फूर्ति, तडफ, तयारी, निकड व तळमळ नाही. केवळ बोलण्याने अथवा लिहिण्याने कोणतीहि कल्पना अमलांत येत नाहीं; किंवा तिच्या पायीं पुष्कळसा पैसा खर्च केल्यानेहि ती साकार होत नाहीं. जेव्हा ती कल्पना तनमनधनाने उचलून धरण्याकरतां असंख्य लोक पुढे सरसावतात तेव्हांच ती मूळ धरतें. नवीन कल्पनेच्या पाठीराख्यांना डोळयांत तेल घालून जागें राहावें लागतें. आपल्या नवीन स्वातंत्र्याची जाणीव जसजशी स्थिर होत जाईल आणि स्वातंत्र्याची जबाबदारी योग्य प्रकारें पार पाडण्याची आपली पात्रता जसजशी वाढत जाईल त्या प्रमाणांत त्या काळजीचें कारण

कमी होत जाईल. आजच्या संक्रमणाच्या काळांत आपणांस बराच धीर धरायला हवा.

**प्रश्न :** सांस्कृतिक उपकरणांच्या द्वारें तरुणांना स्वतःच्या निष्ठा बनविण्यास मदत करणें हें शिक्षणाचें कार्य आहे असें आपण म्हणतो. परंतु सत्ताधारी लोक आपल्या सोयीनुसार संस्कृतींतील स्वतःला पोषक असलेला अंश विद्यार्थ्यांना शिकवून त्यांचा विकास विकृत करूं शकतात. अशा विकृतीवर कांहीं स्वाभाविक इलाज आहे काय ? अथवा सत्ताधारी लोकांना दूर करणें हाच त्यावरील एकमेव अवघड इलाज आहे ?

**उत्तर :** सामाजिक प्रकृतीच्या माणसांनी आपल्या जीवननिष्ठांना साकार रूप देण्याकरतां निर्माण केलेल्या सांस्कृतिक उपकरणांच्या सक्रिय परिशीलनाने स्वतःच्या जीवननिष्ठा निर्माण करणें हाच स्वतंत्र बौद्धिक व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा एकमेव मार्ग आहे, असा माझा आग्रह आहे हें खरें. ज्या समाजांत मानवी व्यक्तित्वाला मान दिला जातो, माणसाला साधन न समजतां साध्य मानिले जातें, आणि प्रत्येकाच्या विशिष्ट स्वभावानुसार त्याचा जास्तींत जास्त विकास होऊं देण्यांतच अवघ्यांचें अंतिम कल्याण आहे असें समजले जातें, तेथेच अशा प्रकारचें शिक्षण दिलें जाऊं शकतें. हेंच खरेंखुरें लोकशाही शिक्षण होय आणि याचेंच आधारभूत सिद्धांत समजावून सांगण्याचा प्रयत्न मी केला आहे. परंतु शिक्षणाच्या नांवावर खपणारी आणखीहि एक प्रणाली असूं शकते. या प्रणालीचा उद्देश प्रत्येक विद्यार्थ्याच्या विशिष्ट स्वभावानुसार त्याचा जास्तींत जास्त विकास होऊं देणें हा नसून, सर्वच विद्यार्थ्यांना एका ठराविक साच्यांत आकार देऊन बाहेर काढणें हा असतो. याचा अर्थ एवढाच कीं स्वतंत्र मानव व शृंखलाबद्ध मानव यांच्या विविध कथांनी इतिहासाची गुंफण झालेली आहे. मानवी समाज कित्येकदा शृंखलांत जखडला गेला आहे, आणि नागड्या व निर्लज्ज सत्ताधाऱ्यांनी त्याच्या जीवनावर, त्याच्या निष्ठांवर आणि त्याच्या आवडीनिवडींवर स्वतःचें नियंत्रण लादलें आहे. त्याचप्रमाणें मानवी समाजाने अनेकदां या शृंखला तोडण्यांत यश मिळविलें आहे आणि विद्यार्थ्यांच्या वेगळेपणाला चारित्र्याची जोड देऊन त्याच्या व्यक्तिमत्त्वांस आकार देणाऱ्या शिक्षणपथावर आनंदाने व आत्मविश्वासाने आगेकूच केलें आहे. अविवेकी व निरंकुश सत्ताधाऱ्यांच्या हातीं जर शिक्षणाचें शस्त्र सांपडलें तर मानवी प्रगतीला मोठाच धक्का बसण्याचा संभव असतो. अशा सत्ताधाऱ्यांना

पदच्युत कसें करावें हा प्रश्न शिक्षणशास्त्राच्या आवाक्यांतील नाहीं. तो एक अत्यंत व्यापक व महत्त्वाचा सामाजिक व राजकीय निर्णय आहे.

होय, आपण ज्या विकृतीचें वर्णन केलें तशा विकृतीवर एक स्वाभाविक इलाज आहे. परंतु हा इलाज फार मंद गतीनें लागू पडतो आणि त्याकरतां फार खडतर पथ्यपाणी करावें लागतें. क्रूर सत्ताधाऱ्यांनी लादलेल्या गुलामी शिक्षणाविरुद्ध माणसाच्या हृदयांत वास करणाऱ्या स्वयंप्रज्ञेचा दिव्य अंश उफाळून उठतो. त्याला अनेकदा दडपण्यांत आलें तरी अखेरीस यश मिळेपर्यन्त त्याच्या प्रतिकारांत खंड पडत नाहीं. प्रत्येक व्यक्तीच्या ठायीं वास करणाऱ्या सद्गुणांचा विकास करण्याचें, असंभव भासणारें, स्वप्न साकार करण्याचा ध्यास त्याला लागलेला असतो. अखेरीस शृंखला गळून पडतात, माणसाची वाढ अनिर्बन्धपणें होऊं शकते आणि खऱ्याखुऱ्या शिक्षणाची वाट पुन्हा मोकळी होते.

दा. क्र. ११५०९

REFBK-0011509

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थलप्रत.
अनुक्रम ३६३०० वि: ...
क्रमांक ९३९५ नों. दि: ८।५।७२